इचलकरंजी R.N.I. Regi. No. 63119/94 ■ पोस्टल रजि.नं. KLR/78/2024-2026 ■ अंक - ३१ ■ वर्ष - ४२

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव

सोमवार,ता.१ जून २०२६ | अधिक ज्येष्ठ कृ.१ ज्येष्ठा | www.emahasatta.com | E-mail : mahasatta@gmail.com | पाने १२ | किंमत ₹ ५.००

## पाच मजली इमारत कोसळून सहाजणांचा मृत्यू

नवी दिल्ली,ता.३१-

दक्षिण दिल्लीतील महरौली परिसरात रात्री उशिरा पाच मजली व्यावसायिक इमारत कोसळली. या दुर्घटनेत अनेक जण ढिगाऱ्याखाली अडकले असून ६ जणांचा मृत्यू झाला आहे.दरम्यान, एनडीआरएफ, अग्निशमन दल, पोलीस आणि अन्य यंत्रणांकडून युद्धपातळीवर बचावकार्य तातडीने सुरू करण्यात आले होते. संबंधित इमारत व्यावसायिक वापरासाठी होती. ढिगाऱ्यातून आतापर्यंत काही जणांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले आहे. मात्र, ढिगाऱ्याखाली आणखी काही जण अडकल्याची शक्यता असल्याने शोधमोहीम सुरू ठेवण्यात आली.इमारत कोसळल्यानंतर तिचा मोठा भाग शेजारच्या इमारतींवर आणि परिसरातील एका कँटीनवर पडल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे त्या ठिकाणीही काही जण अडकल्याची भीती व्यक्त होत आहे. इमारत कोसळण्याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून बचावकार्य पूर्ण झाल्यानंतर चौकशी करण्यात येणार आहे.

# महायुतीचा जागा वाटपाचा तिढा सुटला

## भाजप ११, शिवसेना ४ तर राष्ट्रवादी २ जागांवर निवडणूक लढवणार

मुंबई,ता.३१-

**स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांमधील विधान परिषदेच्या जागावाटपावरून महायुतीतील सुरू असलेला तिढा अखेर सुटला. राज्य आणि केंद्रातील वरिष्ठ नेत्यांमध्ये झालेल्या चर्चेनंतर १७ जागांसाठीचा अंतिम फॉर्म्युला निश्चित करण्यात आला असून, त्यानुसार भाजप ११, शिवसेना ४ आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्ष २ जागांवर निवडणूक लढवणार आहे.**

> प्रदेश आणि केंद्रातील नेत्यांच्या चर्चेनंतर जागांवर शिक्कामोर्तब करण्यात आल्याची माहिती आहे. अतिरिक्त एक जागा पदरात पाडून घेण्यात राष्ट्रवादी यशस्वी झाली. तर ७ जागांवर अडून बसलेल्या शिवसेनेला ४ जागांवर समाधान मानावे लागणार आहे तसेच १४ जागांवर वर्चस्व असतानाही युती धर्म पाळत भाजपने ११ जागा लढवण्यावर तयारी दर्शवली.



अनेक वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्याने या मतदारसंघातील विधान परिषदेच्या जागा रिक्त होत्या. गेल्या दोन-अडीच वर्षांपासून अनेक जागांवर प्रतिनिधित्व नसल्याने या निवडणुकांकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले होते. निवडणुकीची घोषणा होताच महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये जागावाटपाच्या चर्चांना वेग आला होता.

महायुतीत सर्वाधिक चर्चा शिवसेनेच्या दाव्यांवर झाली. शिवसेनेने आपली ताकद असलेल्या सहा पारंपरिक जागांवर दावा केला होता. मात्र अंतिम चर्चेनंतर त्यापैकी चार जागांवरच शिवसेनेला समाधान मानावे लागले. रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघावर शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांनी दावा केला होता. अखेर रायगडच्या पालकमंत्रीपदासह विधान परिषदेची जागा राष्ट्रवादीला देण्याच्या सूत्रावर तोडगा काढण्यात आल्याची माहिती आहे.नाशिक तसेच छत्रपती संभाजीनगर-जालना या जागांबाबतही मोठी रस्सीखेच पहायला मिळाली. भाजपने या दोनपैकी एका जागेची मागणी केली होती.अखेर नाशिकची जागा (पान २ वर)

> पुण्याच्या जागेसंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपमध्ये रस्सीखेच सुरू होती.मात्र राष्ट्रवादी काँग्रेसला देण्यात येणाऱ्या दोन जागांमध्ये पुण्याची जागा त्यासोबतच कोकणातील जागा राष्ट्रवादी काँग्रेसच्या पारड्यात पडली.

# बंगळुरू सलग दुसऱ्यांदा चॅम्पियन

## गुजरातला लोळवत आयपीएल ट्रॉफीवर कोरले नाव

अहमदाबाद,ता.३१-

**रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने आयपीएल २०२६ च्या अंतिम सामन्यात गुजरात टायटन्सचा पराभव करत सलग दुसऱ्यांदा आयपीएल ट्रॉफीवर आपले नाव कोरले. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळवल्या गेलेल्या या अटीतटीच्या सामन्यात आरसीबीने गुजरातचा त्यांच्याच घरच्या मैदानावर दारुण पराभव केला.आरसीबीचा माजी कर्णधार विराट कोहली या ऐतिहासिक विजयाचा शिल्पकार ठरला.**

सामन्यात गुजरात टायटन्सने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ८ बाद १५५ धावा केल्या. संघासाठी वॉशिंग्टन सुंदरने सर्वाधिक झुंज देत ३७ चेंडूत ५० धावांची खेळी केली. मात्र त्याला इतर फलंदाजांची साथ मिळाली नाही. शुभमन गिल (१०), साई सुदर्शन (१२) आणि जोस बटलरही कमी धावा करून बाद झाल्याने गुजरातला मोठी धावसंख्या उभारता आली नाही. (पान २ वर)





## मुसळधार पावसाने केदारनाथ यात्रा तात्पुरती स्थगित

डेहराडून,ता.३१-

**जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे आणि हवामान विभागाने जारी केलेल्या ऑरेंज अलर्टच्या पार्श्वभूमीवर, प्रशासनाने केदारनाथ यात्रा तात्पुरती स्थगित केली आहे.**

यात्रेकरूंची सुरक्षा लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे.हवामान विभागाने जिल्ह्यात मुसळधार पाऊस, जोरदार वादळ आणि भूस्खलनाची दाट शक्यता (पान २ वर)

# आयात शुल्क माफीनंतर सूत दरात घसरण

## कापड मागणीवर परिणाम; बाजारपेठेतील उलाढाल थंडावली

इचलकरंजी,ता.३१-

**केंद्र शासनाने कापसावरील आयात शुल्क माफ केल्याने सूत दरवाढीला ब्रेक लागला आहे. सूत दरापाठोपाठ कापड दरात देखील काहीशी घट झाली असून मागणीवर देखील याचा परिणाम झाला आहे. त्यामुळे उलाढाल थंडावली असून सूत स्थिरता आल्यावरच बाजारपेठेत पुन्हा उलाढाल वाढणार असल्याचे संकेत मिळत आहेत.**

देशांतर्गत कापूस उत्पादन कमी झाल्याने कापूस आणि सूत दरात दिवसेंदिवस भरमसाठ दरवाढ होत चालली होती. या दरवाढीमुळे सूतगिरण्यांबरोबरच यंत्रमागधारकांना देखील संकटाचा सामना करावा लागत होता. सतत वाढणाऱ्या दरामुळे उत्पादन खर्चाचा ताळमेळ घालणे अवघड बनू लागले होते. त्यामुळे कापडाला मागणी असूनही म्हणावा तितका उठाव होताना दिसत नव्हता. यामुळे एकप्रकारे वस्त्रोद्योगावर कापूस टंचाईचे संकट निर्माण झाले होते.



कापूस टंचाईमुळे तसेच दरवाढीमुळे गेल्या महिनाभरात सूत दराचा आलेख दिवसेंदिवस वाढतच गेला होता. याकाळात सूत दरात प्रति किलो सुमारे शंभर रुपयांपासून ते सव्वाशे रुपयांपर्यंत दरवाढ झाली होती. मात्र त्यामानाने कापड दरात वाढ झाल्याचे दिसून आले नाही. उत्पादन खर्च आणि नफा याचे गणित कोलमडून जाऊ लागल्याने उद्योग बंद पडण्याची भीती व्यक्त केली जात होती. दरम्यान अनेक संस्था, संघटनांनी कापूस आयातीवरील शुल्क माफ करावे, अशी मागणी केंद्र शासनाकडे केली होती. या मागणीकडे केंद्र सरकारने गांभीर्याने लक्ष दिल्याने १ जून २०२६ पासून ३० ऑक्टोबर २०२६ अखेर सहा महिने आयात शुल्क माफ करण्यात आले आहे. यामुळे देशातील अनेक सूतगिरण्या मोठ्या प्रमाणात कापूस आयात करण्याची शक्यता आहे. कापूस आयात झाल्यास त्याचा फायदा सूतगिरण्यांसह गारमेंट आणि यंत्रमाग उद्योगाला होणार आहे.

दुसरीकडे केंद्र शासनाच्या या निर्णयाचा बाजारपेठेवर परिणाम झाल्याचे दिसून आले. सूत दरामध्ये प्रति किलो ३० रुपयांनी घट झाली आहे. त्याचबरोबर कापड दरातही तीन रुपयांची घसरण झाली आहे. सुतापाठोपाठ कापड दरातही घसरण होऊ लागल्याने सध्या मागणी काहीअंशी ठप्प झाली आहे. सूत दर आणखी खाली येतील या अपेक्षेने बाजारपेठेतील उलाढाल काहीप्रमाणात थंडावली (पान २ वर)

# करार न झाल्यास दुसरा मार्ग अवलंबू - ट्रम्प

वॉशिंग्टन,ता.३१ -

**अमेरिका आणि इराण यांच्यात अत्यंत महत्त्वाच्या कराराच्या दिशेने सकारात्मक पाऊल पडत आहे.आम्ही एका अतिशय चांगल्या कराराच्या जवळ आहोत. घाई केली तर चांगला करार होत नाही. हळूहळू पण निश्चितपणे आम्हाला जे हवे आहे ते मिळत आहे. जर आम्हाला अपेक्षित परिणाम मिळाला नाही, तर आम्ही हा प्रश्न दुसऱ्या मार्गाने सोडवू,असा इशारा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एका मुलाखतीद्वारे दिला.**



ट्रम्प पुढे म्हणाले की, इराणी प्रतिनिधी हे कुशल वाटाघाटीकार आहेत, मात्र सध्या सर्व बाजू अमेरिकेच्या हातात आहेत, कारण इराणला लष्करीदृष्ट्या मोठा फटका बसला आहे. आम्ही एका चांगल्या कराराच्या जवळ आहोत. तो झाला तर उत्तमच. अन्यथा आम्ही थेट युद्ध विभागाला पुढे आणू (पान २ वर)



### पाकमध्ये उष्णतेचा कहर

## दादूमध्ये तापमान ५१.५ अंशावर

इस्लामाबाद,ता.३१-

**पाकिस्तानच्या सिंध प्रांतातील मोठ्या भागात सध्या तीव्र उष्णतेची लाट कायम आहे. या पार्श्वभूमीवर दादू येथे तब्बल ५१.५ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली, जी शहराच्या इतिहासातील सर्वाधिक तापमानाची नोंद ठरली आहे.**

पाकिस्तान (पान २ वर)

## शेतकऱ्यांना १० दिवसात कर्जमाफी

(सविस्तर वृत्त २ वर)


**वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!**



श्री. मौलाली बंदगीसाहेब बागवान



श्री. मुरग्याप्पा भिमू पाटील

बागवान कन्स्ट्रक्शनचे मालक श्री. मौलाली बंदगीसाहेब बागवान व पाटील कन्स्ट्रक्शनचे मालक श्री. मुरग्याप्पा भिमू पाटील यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

फिरोज बागवान * शहारुख बागवान
बागवान परिवार, इचलकरंजी.

बागवान कन्स्ट्रक्शन, इचलकरंजी.





श्री. रमेश बापू पाटील (दादा)

वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा

आमचे परममित्र, कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सह. बँकेचे संचालक श्री. रमेश बापू पाटील (दादा) यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

दिलीप पांडूरंग पाटील (दादा) | नितीन परशराम कोकणे
भालचंद्र महादेव उगळे | बंडू धोंडिबा उगळे (आण्णा)
विनायक सुर्यवंशी (बंडू) | मंकाळी भाऊसो देशिंगे

* शहापूर-इचलकरंजी *






मा.श्री. सुरेशरावजी हाळवणकर

वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष, मा. आमदार श्री. सुरेशरावजी हाळवणकर साहेब यांच्या मंगळवार, दि. २/०६/२०२६ रोजी होणाऱ्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!

माजी उपनगराध्यक्ष



श्री. मिश्रीलाल जाजु

मदन मुरगुडे * दिपक कडोलकर * पांडुरंग पांढरपट्टे
किरण मठपती * अशोक मगदूम * लालचंद पारीक


# गणेशवाडीत पार्किंगच्या वादातून हाणामारी

## अकरा जणांविरुध्द गुन्हा दाखल

बुबनाळ, ता.३१ वार्ताहर-

**गणेशवाडी (ता.शिरोळ)येथे दवाखान्यासमोर मोटारसायकल लावण्याच्या कारणावरून दोन गटात हाणामारी झाली. याप्रकरणी दोन्ही बाजूनी परस्परविरोधी फिर्यादी दिल्याने एकूण ११ जणांविरुध्द कुरुंदवाड पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.**

याबाबत डॉ. संजय चवगोंडा पाटील ( वय ४७)यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार,अरिहंत हॉस्पिटलच्या पार्कींगमध्ये लावलेली दूचाकी बाहेर काढण्यास सांगितल्याचा राग मनात धरुन फिरोज अल्लानुर जमादार व फैयाज नुर जमादार (दोघे रा. शेडशाळ) यांनी डॉ.उदगावे यांना शिवीगाळ करीत त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.तसेच ते हॉस्पिटलमध्ये गेल्यानतंर तिथेही घुसून मारहाण केली.यावेळी त्यांना सोडविण्यासाठी आलेल्या पत्नी डॉ. मीनल उदगावे यांनाही धक्काबुक्की केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.यामुळे या दोघांविरुध्द गुन्हा (पान २ वर)







# बंगळुरू सलग दुसऱ्यांदा चॅम्पियन

(पान १ वरून)

आरसीबीच्या गोलंदाजांनी सुरुवातीपासूनच वर्चस्व राखले. जोश हेजलवूड आणि भुवनेश्वर कुमार यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले, तर रसिख सलाम डारने तीन विकेट्स घेत गुजरातच्या फलंदाजीला खिंडार पाडले. कृणाल पंड्यानेही एक महत्त्वाचा बळी घेतला.

१५६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना आरसीबीला विराट कोहलीने दमदार सुरुवात करून अर्धशतक ठोकले. विशेष म्हणजे, कारकिर्दीतील हे त्याचे सर्वात वेगवान अर्धशतक ठरले. आपल्या १९ व्या हंगामात, तेही अंतिम सामन्यासारख्या दबावाच्या क्षणी, विराटने युवा टी-२० फलंदाजांनाही लाजवेल अशी फलंदाजी केली.

कोहलीने अवघ्या ११.२ षटकांत संघाला ११३ धावांपर्यंत पोहोचवण्यात मोठी भूमिका बजावली. या हंगामात त्याने ६४८ धावा करत १६७.०१ च्या स्ट्राइक रेटने खेळ केला आहे.२०२६ मध्ये ६०० हून अधिक धावा करणाऱ्या फलंदाजांमध्ये वैभव सूर्यवंशी आणि ईशान किशन यांच्यानंतर सर्वाधिक वेगाने धावा करणारा फलंदाज म्हणूनही त्याने आपली छाप सोडली.या विजयासहआरसीबीने सलग दुसरे विजेतेपद जिंकत इतिहासात आणखी एक सुवर्ण अध्याय लिहिला.

यापूर्वी २०२३ मध्ये चेन्नई सुपर किंग्जने याच मैदानावर ४ षटकांत पन्नास धावा पूर्ण केल्या होत्या.

**या विजयासोबतच आरसीबीने आयपीएलच्या इतिहासात भीम पराक्रम केला आहे. मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्जनंतर सलग दोन आयपीएल ट्रॉफी जिंकणारा आरसीबी फक्त तिसरा संघ ठरला आहे. आयपीएलच्या इतिहासात आतापर्यंत केवळ एम.एस. धोनी आणि रोहित शर्मा या दिग्गज कर्णधारांनाच आपल्या संघाला सलग दोनदा विजेतेपद मिळवून देता आले होते. आता या एलिट क्लबमध्ये आरसीबीचा कर्णधार रजत पाटीदारचा समावेश झाला आहे.**

मोहम्मद सिराजने पाचव्या षटकात ६२ धावांची ही भागीदारी तोडली. वेंकटेश १६ चेंडूंत ४ चौकार व २ षटकारांसह ३२ धावांवर झेलबाद झाला. त्यानंतर आलेल्या देवदत्त पडिक्कलला (१) कागिसो रबाडाने माघार पाठवले, परंतु दुसऱ्या बाजूने विराटने सुसाट फटकेबाजी सुरू ठेवली होती. विराटने २५ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले आणि हे त्याचे आयपीएलमधील वेगवान अर्धशतक ठरले. त्याने २०१८ मध्ये आरआरविरुद्ध २६ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले होते.आयपीएल फायनलमधील ही दुसरी वेगवान फिफ्टी ठरली. सुरेश रैना ( २०१०), डेव्हिड वॉर्नर ( २०१६)व वेंकटेश अय्यर (२०२४) यांनी २४ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले होते. विराटने रोहित शर्मा ( २०१५) व ख्रिस गेल (२०१६) यांच्याशी बरोबरी केली.

टीम डेव्हिडची ( २४) विराटला चांगली साथ मिळाली आणि त्याने ३१ चेंडूंत ४१ धावा जोडल्या. विजयासाठी ११ धावा हव्या असताना विराटचा शुभमनने झेल घेतला, परंतु तो ग्राह्य धरला गेला नाही. विराट ४२ चेंडूंत ९ चौकार व ३ षटकारांसह ७५ धावांची नाबाद खेळी केली.

**सूर्यवंशीला ऑरेंज कॅप**

वैभव सूर्यवंशीला ऑरेंज कॅप मिळाली. त्याने १६ सामन्यांमध्ये ७७६ धावा केल्या, ज्या या हंगामातील कोणत्याही फलंदाजाने

## विषारी दारू बळींची संख्या २४ वर

**पुणे,ता.३१–**

**पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसराला हादरवून सोडणाऱ्या विषारी दारू प्रकरणातील मृतांचा आकडा आता २४ वर पोहोचला आहे. हडपसरमधील काळेपडळ परिसरात आणखी दोघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याने प्रशासनाची चिंता वाढली आहे. विकास किसन केदारी (वय ६०) आणि निलेश घोलप (वय ४५) अशी मृतांची नावे आहेत.**

या नव्या मृत्यूंमुळे पुणे शहरातील मृतांची संख्या २४ वर पोहोचली असून फुगेवाडी, उरुळी कांचन आणि इतर भागातही मृत्यूंची नोंद झाल्याने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत राज्य सरकारने तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे (सीआयडी) सोपवला आहे. तपासासाठी सीआयडीची पाच विशेष पथके नियुक्त करण्यात आली आहेत.

दरम्यान, कर्तव्यात निष्काळजीपणा आणि पर्यवेक्षणाचा अभाव असल्याचा ठपका ठेवत पोलीस व राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार ही कारवाई करण्यात आली.

(पान १ वरून)

## जागा वाटपाचा तिढा सुटला

शिवसेनेकडे तर छत्रपती संभाजीनगर-जालना मतदारसंघ भाजपकडे देण्याचा निर्णय झाला. राष्ट्रवादी काँग्रेसने पुणे, परभणी-हिंगोली आणि कोकणातील जागांवर दावा केला होता. अंतिम वाटाघाटींमध्ये पुण्यासह कोकणातील एक जागा राष्ट्रवादीच्या वाट्याला आली. त्यामुळे आता महायुतीत जागावाटपाचा प्रश्न निकाली निघाला आहे.

## केदारनाथ यात्रा स्थगित

वर्तवली आहे. रुद्रप्रयागचे जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांच्या निर्देशानुसार, केदारनाथ ट्रेकींग मार्गावरून प्रवास करणाऱ्या सर्व यात्रेकरूंना तात्काळ जवळच्या होल्डिंग पॉईंट आणि सुरक्षित ठिकाणी थांबण्याचे आदेश देण्यात आले आहेत. हवामान सामान्य होईपर्यंत कोणत्याही यात्रेकरूंना पुढे जाण्याची परवानगी दिली जाणार नाही, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. सर्व क्षेत्रीय अधिकारी, पोलीस अधिकारी आणि संबंधित विभागांना यात्रेकरूंची सुरक्षा सुनिश्चित करण्याचे आणि सतत दक्षता ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

याव्यतिरिक्त, पोलीस आणि इतर आपत्ती निवारण यंत्रणांना आपापल्या भागात पूर्ण दक्षता ठेवण्यास सांगण्यात आले आहे. कोणतीही आपत्ती, भूस्खलन, रस्ता अडथळा किंवा अपघात झाल्यास तात्काळ जिल्हा आपत्कालीन कार्य संचालन केंद्राला कळवावे आणि ११२ डायल करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. हा निर्णय केवळ यात्रेकरूंच्या सुरक्षेचा विचार करून घेण्यात आला असून, प्रशासनाने त्यांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.रविवारी चारधामसह गढवालच्या बहुतांश भागात पाऊस पडला. मसुरी,उत्तरकाशी,कोटद्वार,श्रीनगर गढवाल, चमोली, न्यू टिहरी आणि रुद्रप्रयाग येथे पाऊस झाला.

## पाकमध्ये उष्णतेचा कहर

हवामान विभागाच्या आकडेवारीनुसार, दादूमधील यापूर्वीचे सर्वोच्च तापमान १८ मे २०१६ रोजी ५१.४ अंश सेल्सियस नोंदवले गेले होते. शनिवारी दुपारपर्यंत जेकबाबाद येथेही ५१ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. तसेच शहीद बेनझीराबाद (नवाबशाह), लरकाना आणि मोहेनजोदडो या ठिकाणी पारा ५० अंश सेल्सियसपर्यंत पोहोचला.दादूमध्ये ५१.५ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली असून, हा शहरासाठी नवा उच्चांक आहे. मात्र, सिंध प्रांतासाठी इतके उच्च तापमान नवीन नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.सिंधमध्ये यापूर्वीही याहून अधिक तापमानाची नोंद झाली आहे. २०२४ मध्ये प्राचीन मोहेनजोदडोचे अवशेष परिसरात तापमान तब्बल ५३ अंश सेल्सियसपर्यंत पोहोचले होते.

## सूत दरात घसरण

आहे. दुसरीकडे कापडाला मागणी असली तरी कापड व्यापारी मार्केटमधील परिस्थिती अंदाज घेऊन सौदा करताना दिसत आहेत. तर यापूर्वी झालेले कापड खरेदी सौदे यावरही काही प्रमाणात परिणाम झाल्याचे दिसून येत आहे. कापूस आयात झाल्यास सूत दर आणखी खाली येणार असल्याचा अंदाज काही अभ्यासकातून बांधला जात आहे. त्यामुळे कापड व्यापारी आणि कारखानदार वर्ग बाजारपेठेतील परिस्थितीवर लक्ष ठेऊन असल्याचे दिसते.

## पार्किंगच्या वादातून हाणामारी

दाखल झाला आहे. फिरोज अल्लानुर जमादार (वय ३९, रा. माळभाग, शेडशाळ) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार ,डॉ. संजय उदगावे, सुनिल धनपाल गोरवाडे, वृषभ महावीर गोरवाडे, सम्मेद चंद्रकांत कोगनोळे, धीरज चतुर उदगावे, जयदीप महावीर बिरनाळे, ओंकार बिराजे, गुड्डू उदगावे, रुपेश कोगनोळे (सर्व रा. गणेशवाडी) यांनी गणेशवाडी येथे अरिहंत दवाखान्यासमोर मोटारसायकल पार्क केल्याच्या कारणावरून फिरोज जमादार व त्यांचे चुलत भाऊ फैय्याज जमादार यांच्याशी वाद घातला.त्यानंतर या सर्वांनी दर्गा चौकात बेकायदेशीर जमाव करून शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.तसेच जवळच असलेल्या एका मंडळाच्या खोलीत नेऊन कमरेच्या कातडी पट्ट्याने मारहाण करून जखमी केले. भांडण सोडविण्यासाठी आलेल्या जमादार यांच्या आईलाही शिवीगाळ केली. असे फिर्यादीत म्हटले आहे.यामुळे या नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेमुळे दवाखान्यासमोर दोन्ही बाजूच्या लोकांची गर्दी झाल्याने वातावरण तणावपूर्ण बनले होते. अखेर पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्याने तणाव निवळून वाद आटोक्यात आला. तसेच जमावालाही पांगवण्यात आले.

## दुसरा मार्ग अवलंबू- ट्रम्प

इराणने आपण अण्वस्त्र विकसित करत नसल्याचे सांगितले आहे. मात्र, इराण भविष्यात अशी शस्त्रे विकत घेतल्यास काय होईल. आता करारात असे नमूद करण्यात आले आहे की आम्ही अण्वस्त्रे विकसित करणार नाही आणि कोणत्याही प्रकारे ती खरेदीही करणार नाही. या दोन गोष्टींमध्ये मोठा फरक आहे.

अमेरिकेने इराणची संपूर्ण लष्करी क्षमता नष्ट केलेली नाही, कारण तेथील काही नेते तुलनेने मवाळ भूमिका घेणारे आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार, अमेरिकेने इराणमधील कट्टरपंथी गट आणि महत्त्वाच्या नेतृत्वावर लक्ष केंद्रित केले. दरम्यान,शुक्रवारी ट्रम्प यांनी व्हाईट हाऊसमधील सिच्युएशन रूममध्ये आपल्या मंत्रिमंडळातील सदस्य आणि वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. मात्र, पुढील रणनीतीबाबत कोणताही स्पष्ट निर्णय जाहीर करण्यात आला नाही.

## शेतकऱ्यांना १० दिवसांत कर्जमाफी

### कृषीमंत्री भरणे

**अहिल्यानगर,ता.३१–**

**महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना येत्या १० दिवसांत कर्जमाफी देण्यात येणार असल्याची घोषणा कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केली.**

चौंढी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त कार्यक्रम झाला. २ लाखांपर्यंत थकीत खातेदार तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजारांपर्यंत प्रोत्साहन अनुदान अशी ही कर्जमाफी मिळणार आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावे असणारी कर्जमाफी येत्या ८ ते १० दिवसांत करु,अशी ग्वाही त्यानी दिली. कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार उपस्थित होते. यावेळी कृषीमंत्री भरणे यांनी, मुख्यमंत्री फडणवीस तसेच दोन्ही उपमुख्यमंत्र्यांची परवानगी घेऊन मी घोषणा करत आहे. असे सांगत येत्या दहा दिवसात कर्जमाफी केली जाईल, असे सांगितले.तसेच अहिल्यादेवी होळकर यांचे जलसंधारणचे काम आजही मार्गदर्शक आहे. तसेच या चौंडी गावाच्या विकासासाठी बाराशे कोटीचा आराखडा तयार करण्यात आला आहे.कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार राज्य सरकारने आर्थिक अडचणीत सापडलेल्या आणि बँकेचे कर्ज थकलेल्या शेतकऱ्यांना दोन लाख रुपयां पर्यंतची संपूर्ण कर्जमाफीची घोषणा केली आहे. तसेच बँकेचे कर्ज नियमितपणे फेडणाऱ्या शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान जमा केले जाणार आहे. यापूर्वीच मुख्यमंत्री फडणवीस यांनी कर्ज माफीचे संकेत दिले होते. ३० जूनपर्यंत कर्जमाफी होण्याची शक्यता होती. राज्य सरकारची कर्जमाफी योजना अंतिम टप्प्यात पोहोचली असून पात्र शेतकऱ्यांना थेट लाभ देण्यासाठी प्रशासनिक हालचाली वेगाने सुरू असल्याचे त्यांनी सांगितले होते. कृषीमंत्री भरणे यांनी यावर शिक्कामोर्तब केले.

## मालेत युवकाची आत्महत्या

**वारणानगर,ता.३१ (प्रतिनिधी)–**



**माले (ता.पन्हाळा) येथील दिग्विजय शिवाजी पाटील (वय ३३) याने राहत्या घरी दोरीने गळफास घेवून आत्महत्या केली.तो कॉम्प्युटर सेंटर चालवत होता व विमा एजंट होता. त्याच्या पश्चात आई,वडील,पत्नी,सहा वर्षाची मुलगी, अविवाहित भाऊ असा परिवार आहे.**

याबाबत इंद्रजित पाटील याने कोडोली पोलीस ठाण्यात वर्दी दिली.

जिल्हा उपरूग्णालयात शवविच्छेदनानंतर मृतदेह ताब्यात देण्यात आला. सहाय्यक पोलीस निरीक्षक चेतन मसुटगे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

## लीलावती खोबरे यांचे निधन

**तारदाळ,ता.३१ (वार्ताहर)**



**तारदाळ येथील माजी सरपंच, पंचगंगा सहकारी साखर कारखान्याचे संचालक प्रकाश खोबरे यांच्या पत्नी लीलावती प्रकाश खोबरे यांचे निधन झाले.**

निधनासमयी त्या ७० वर्षांच्या होत्या.त्यांच्या अंत्ययात्रेस सामाजिक शैक्षणिक राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पती,पाच मुली, नातवंडे असा परिवार आहे.

## सोनाळीत महिलेची छेड; मारहाणीत चौघे जखमी

**मुरगूड, ता. ३१ प्रतिनिधी )–**

**सोनाळी (ता.कागल) येथे एका महिलेची छेड काढल्याच्या रागातून जाब विचारण्यास गेल्यावर झालेल्या मारहाणीत चौघेजण जखमी झाले. यामध्ये समाधान रघुनाथ माने व मनोज रघुनाथ माने, (दोघे रा. सोनाळी पैकी मानेवाडी, ता. कागल) यांच्यावर गुन्हा नोंद झाला आहे. या मारामारीत लाकूड कापण्याचे कटर मशिन व गाडीचा लोखंडी पाटा याचा वापर करण्यात आला.**

पीडित महिला शेताकडे पायी जात असताना संशयीत आरोपी समाधान माने हा पाठीमागून येवून पीडितेच्या आडवी गाडी लावून तिचा उजवा हात पकडून लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करू लागला. सदर महिलेने ही माहिती घरी सांगितल्यावर त्याच्या घरी जाब विचारायला गेल्यावर संशयीत आरोपी मनोज माने याने लाकूड कापायच्या कटरने युवराज माने, सतिश माने तसेच शालन माने, रणजीत जयसिंग माने यांच्या हातावर, कंबरेवर, छातीवर व गालावर चालवून त्यांना जखमी केले तसेच गाडीच्या लोखंडी पाट्यानेही मारहाण केली.अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक अनिकेत कुडले करीत आहेत.

## वसंत पुजारी यांचे निधन

**मिरज,ता.३१–**



**येथील प्रसिध्द सर्जन कै. डॉ. बिंदूमाधव पुजारी यांचे कनिष्ठ बंधू व डॉ.प्रसाद पुजारी यांचे वडील वसंत पुजारी यांचे निधन झाले.**

इचलकरंजी येथील श्रीकांत पुजारी व प्रा.मोहन पुजारी यांचे ते जेष्ठ बंधू होत.

## ज्येष्ठ गायिका सुमन कल्याणपूर यांचे निधन

**मुंबई,ता.३१ –**



**आपल्या मधुर आणि सुश्राव्य आवाजाने रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या ज्येष्ठ गायिका सुमन कल्याणपूर यांचे निधन झाले. वयाच्या ८९ व्या वर्षी मुंबईतील राहत्या घरी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने भारतीय संगीत क्षेत्रातील एका सुवर्ण युगाचा अंत झाला असून संगीत विश्वावर शोककळा पसरली आहे.**

मराठी भावगीत, भक्तीगीत आणि हिंदी चित्रपट संगीतात त्यांनी दिलेले योगदान कधीही न विसरता येणारे आहे. कला क्षेत्रातील त्यांच्या अफाट कामगिरीची दखल घेऊन केंद्र सरकारने २०२३ साली त्यांना पद्मभूषण या नागरी पुरस्काराने सन्मानित केले होते. सुमन कल्याणपूर यांचा जन्म २८ जानेवारी १९३७ रोजी बांगलादेशातील (तत्कालीन अविभाजित भारत) भवानीपूर येथे झाला होता. लहानपणापासूनच त्यांना संगीताची प्रचंड आवड होती. त्यांनी संगीताचा अतिशय कसून आणि सखोल अभ्यास केला होता. सुमन यांचे माहेरचे आडनाव हेमाडी असे होते. त्यामुळे लग्नापूर्वी त्या सिनेसृष्टीत सुमन हेमाडी या नावानेच गाणी गात असत आणि याच नावाने त्यांची सुरुवातीची गाणी लोकप्रिय झाली. रुपेरी पडद्यावरचं सुमन कल्याणपूर यांचे पहिलं गाणे कोई पुकारे धीरेसे तुझे आँख के तारे हे होते. या गाण्याने रसिकांना त्यांच्या आवाजाची भुरळ पाडली.जरी त्या शुद्ध शास्त्रीय संगीत आणि नाट्यसंगीताकडे फारशा वळल्या नाहीत, तरी त्यांच्या गाण्यांमध्ये कमालीची शास्त्रीय बैठक होती. त्यांनी गायलेल्या मन मोहन मन मे हो तुम्ही या अजरामर गीताला मानाचा तानसेन पुरस्कार लाभला होता.

सुमन कल्याणपूर यांचा सिनेसृष्टीतील प्रवेश अत्यंत रंजक होता. त्यांच्या संगीताच्या प्रवासाची सुरुवात गझलसम्राट तलत महमूद यांच्यामुळे झाली होती. एका जाहीर कार्यक्रमात गाणे गात असताना तलत महमूद यांनी सुमनताईंचा दैवी आवाज ऐकला.

त्या आवाजाने प्रभावित होऊन तलत महमूद यांनी स्वतःच्या एका आगामी चित्रपटासाठी सुमनताईंना गाण्याची विचारणा केली. सुमनताईंनीही या सुवर्णसंधीला होकार दिला आणि तिथूनच त्यांचा चित्रपटसृष्टीतील यशस्वी प्रवास सुरू झाला. तर मराठी भावगीत गायनाची त्यांची सुरुवात आधुनिक वाल्मिकी ग.दि. माडगुळकर यांच्या अजरामर गीतांनी झाली होती.मराठी संगीत क्षेत्रात सुमनताईंचे बहुमूल्य योगदान आहे. जुन्या पिढीतील मंडळी असो वा नवोदित युवक, आजही त्यांची गाणी प्रत्येकाच्या ओठांवर रेंगाळताना दिसतात.सुमन कल्याणपूर यांच्या निधनाने संगीत क्षेत्रातील एक अथांग आणि ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व हरपले आहे.

**विविध भाषांवर प्रभूत्व**

**सुमन कल्याणपूर यांनी केवळ मराठी आणि हिंदीच नाही, तर बंगाली, उडिया, पंजाबी, राजस्थानी,कानडी आणि भोजपुरी अशा अनेक प्रादेशिक भाषांमध्ये हजारो गाणी गायली. गझल, ठुमरी आणि भक्तीगीते गाण्यात त्यांना विशेष गोडी होती.**

## काँग्रेस सहा राज्यांचे प्रदेशाध्यक्ष बदलणार?

**नवी दिल्ली,ता.३१–**

**काँग्रेसने कर्नाटकमध्ये मोठे बदल केल्यानंतर काँग्रेसच्या 'मिशन २०२७'ची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. राहुल गांधी यांनी मोठी रणनीती आखत जवळपास सहा राज्यातील काँग्रेस प्रदेशाध्यक्ष बदलण्यात येणार असल्याच्या चर्चा आहेत.**

काँग्रेस हायकमांडने सहा राज्यांमध्ये काँग्रेसच्या युनिट्सची पुनर्रचना करण्याबाबत आणि अखिल भारतीय काँग्रेस समिती स्तरावरील संघटनात्मक जबाबदाऱ्यांची पुनर्रचना करण्यावर लक्ष केंद्रित केल्याची माहिती समोर आली आहे.

## श्रीमती पार्वती पाटील यांचे निधन

**कबनूर,ता.३१ –**



येथील श्रीमती पार्वती शिवगोंडा पाटील - आऊ ( वय ८२) **यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.** त्या कबनूर एज्युकेशन सोसायटीच्या संचालिका होत्या.त्यांच्या पश्चात चार मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.



## माद्याळला हातभट्टी दारु अड्डा उद्ध्वस्त

**मुरगूड,ता.३१(प्रतिनिधी)–**

माद्याळ (ता.कागल) येथील जंगलात विहिरीलगत बेकायदेशीर रित्या बनवली जाणारी गावठी हातभट्टीवर मुरगूड पोलीसांनी धडक कारवाई करत अड्डा उद्ध्वस्त केली.यामध्ये तयार दारु,रसायन व अन्य साहित्य असा सुमारे ८७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.या प्रकरणी भट्टी मालक अशोक कालु जंगली-नाईक (रा. बहिरेवाडी, ता. आजरा) याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.माद्याळ (ता.कागल) येथील भिऊंगडे यांच्या सामाईक विहीरीशेजारी, बहिरेवाडी गावच्या हद्दीत बेकायदेशीर हातभट्टीची गावठी दारु बनवत असल्याची माहिती पोलीसांना खबऱ्याकडून मिळाली होती.त्यानुसार रात्री त्याठिकाणी धडक कारवाई केली.

## तीन लाखांवर भाविकांनी घेतले अंबाबाईचे दर्शन

**कोल्हापूर,ता.३१ (प्रतिनिधी)–**

**मुलांच्या सुट्ट्यांचा शेवटचा रविवार असल्यामुळे कोल्हापूर येथे श्री अंबाबाईच्या दर्शनासाठी मुलांसह भाविक व पर्यटकांची तोबा गर्दी झाली असून रविवारी एका दिवसात ३ लाख ९ हजार ७३२ भाविकांनी श्री अंबाबाईचे दर्शन घेतले.**

शाळांना सुट्ट्या पडल्यापासूनच कोल्हापूरकडे पर्यटकांची गर्दी वाढली असल्याने शहरातील रस्ते, चौक तसेच श्री अंबाबाई मंदिर परिसर गर्दीने फुलून गेला आहे. पर्यटक व भाविकांच्या गर्दीमुळे वाहतूक व्यवस्थेवर मोठा ताण पडला. पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समितीने भाविकांना श्री अंबाबाईचे सुलभ दर्शन व्हावे यासाठी दर्शन रांगेचे योग्य नियोजन केले होते. दर्शन रांगही लांब-लाब गेली होती तसेच लाखो भाविकांनी श्री अंबाबाईचे मुख दर्शनही घेतल्याचे मंदिर समितीचे व्यवस्थापक महादेव दिंडे यांनी सांगितले.

## युवक बेपत्ता

**कोल्हापूर, ता.३१(प्रतिनिधी)**

बोंद्रेनगर (ता.करवीर) येथे राहणारा रवळू धाकलू शेळके (वय ३३) हे ३० मे रोजी घरातून बेपत्ता झाले आहेत. रंग गोरा, अंगाने बारीक, उंची ५ फुट ७ इंच, चेहरा उभट, डोळे केस काळे, नाक सरळ, अंगात निळ्या रंगाचा टी शर्ट, पांढरी पॅन्ट असे वर्णन आहे. पत्नी ताईबाई शेळके यांनी करवीर पोलीस ठाण्यात मिसींग दाखल केले आहे.

|| प्रथम पुण्यस्मरण ||



कै. श्रीमती रानाबाई कृष्णा कांबळे

घर सुटत पण
आठवण कधी सुटत नाही...
जीवनात 'आई' नावाच पान
कधीच मिटत नाही..

- कांता कांबळे
- महादेव कांबळे (एम.के.सर)
- विजया कांबळे (शिरदवाड)
- विद्या कांबळे (खेड)
- उत्तम कांबळे,शाहूनगर

भोने माळ, इचलकरंजी

|| भावपूर्ण श्रध्दांजली ||



सौ. लिलावती खोबरे

आमच्या संस्थेचे संस्थापक चेअरमन श्री. प्रकाश उर्फ आण्णासो बाळकू खोबरे यांच्या पत्नी **सौ. लिलावती आण्णासो खोबरे** (वय ७०) यांचे रविवार, दि. ३१/०५/२०२६ रोजी आकस्मिक निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना !

* चेअरमन | व्हा. चेअरमन | सर्व संचालक | सेवक वर्ग *

**श्री लक्ष्मी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., तारदाळ**

टीप : माती सावडणे सोमवार दि. १ जून २०२६ रोजी सकाळी ९ वाजता होणार आहे.



श्रीमती पार्वती शिवगोंडा पाटील

|| भावपूर्ण श्रध्दांजली ||

कबनूर एज्युकेशन सोसायटीच्या संचालिका,
कबनूरचे माजी सरपंच व कबनूर एज्युकेशन सोसायटीचे माजी अध्यक्ष कै. शिवगोंडा पाटील यांच्या पत्नी,
आमच्या परिवारातील आऊ..
श्रीमती पार्वती शिवगोंडा पाटील, वय ८३ यांचे रविवारी निधन झाले. त्याना आमची भावपूर्ण श्रध्दांजली..
ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो....

-------------: शोकाकुल :-------------

**मा.श्री.पी.एम. पाटील**

(चेअरमन पंचगंगा सहकार साखर कारखाना)

**श्रीमती सुवर्णा आण्णासो पाटील * श्रीमती सुमन इरगोंडा पाटील**
**सौ. विनया बाळासो मगदूम * सौ. स्मिता अशोक कोरे**
**सौ. आशा तुषार शिरगुप्पे * सौ. सीमा परेश डोईजड**
**व पाटील परिवार, कबनूर**

* टीप : माती सावडणे आज सोमवार ता. १ जून रोजी स. ८ वा. शिवपार्वती निवास, फॅक्टरी रोड, कबनूर येथे आहे.

## हाळवणकरांच्या वाढदिनानिमित्त
# विविध उपक्रमांसह गंगा आरतीचे आयोजन

**इचलकरंजी,ता.३१–**

**भाजपाचे लोकप्रिय नेते माजी आम.सुरेशराव हाळवणकर यांच्या २ जून रोजी होणाऱ्या वाढदिवसाच्या निमित्ताने इचलकरंजी विधानसभा मतदार संघात आठवडाभर विविध लोकोपयोगी उपक्रम राबविण्यात येत आहेत. ९ जून पर्यंत हे कार्यक्रम संपन्न होत असून या अंतर्गत ३ जून रोजी पंचगंगा नदी घाटावर महायज्ञ तसेच गंगा आरतीचे आयोजन करण्यात आले आहे.**



श्री क्षेत्र काशी–हरिद्वार येथे ज्या पध्दतीने गंगा आरती केली जाते, त्याचधर्तीवर इचलकरंजी शहरात पंचगंगा नदी तिरावर गंगा आरती केली जाणार आहे. त्यानंतर आतषबाजी करण्यात येणार आहे. शहराच्या समृध्दीसाठी आणि सुरेशराव हाळवणकर यांना दिर्घायुष्य लाभावे यासाठी गंगा आरतीचे आयोजन केले असून गंगा आरतीसाठी हरिद्वार येथून आणि महायज्ञासाठी राजस्थान येथून पंडीत येणार आहेत. यासाठी पंचगंगा घाटावर विशेष नियोजन करण्यात येत आहे. या कार्यक्रमा व्यतिरिक्त सोमवार दि. १ जून रोजी नदी घाटावर सकाळी स्वच्छता मोहिमेसह अन्य कार्यक्रम, २ जून रोजी शंभूतीर्थ येथे सकाळी सामुहिक ध्येयमंत्र, त्यानंतर आरोग्य शिबीर, मोफत रूग्णवाहिका सेवा, पाणी फिल्टर शुभारंभ, संजय गांधी निराधार योजना पत्र वाटप त्यानंतर सायंकाळी शिवतीर्थ येथे दिपोत्सव कार्यक्रम होणार आहे.

बुधवार दि.३ जून रोजी सकाळी आरोग्य शिबीर, संध्याकाळी महाआरती व गंगा आरती होणार आहे.

गुरूवार दि.४ जून रोजी रूग्णांना फळ वाटप, गोशाळेत चारा वाटप होईल. शुक्रवार दि.५ जून रोजी दिवसभर विविध ठिकाणी मोफत शिवभोजन कार्यक्रम होणार आहे.

शनिवार दि.६ जून रोजी सकाळी १० वा. मुलांना पुस्तके वाटप, त्यानंतर वृक्षारोपन संकल्प, अंगणवाडीतील मुलांना खाऊ वाटप होणार आहे.

रविवार दि.७ जून रोजी सकाळी चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, स.१० वा. एसटी स्मार्ट कार्ड नोंदणी शिबीर त्यानंतर रक्तदान शिबीर, भोजन वाटप तसेच नगरपालिका शाळांमधील विद्यार्थ्यांना वह्या वाटप कार्यक्रम होणार आहे.

या कार्यक्रसाठी मंत्री चंद्रकांतदादा पाटील, खास.धनंजय महाडिक, खा.धैर्यशिल माने, आम. राहुल आवाडे, अमल महाडिक, शिवाजीराव पाटील, विनय कोरे, शशिकला जोल्ले, प्रकाशराव आवाडे, महापौर उदय धातुंडे, उपमहापौर अनिल डाळ्या यांचेसह जिल्ह्यातील अनेक मान्यवर उपस्थित रहाणार आहेत, अशी माहिती वाढदिवस उत्सव समितीच्यावतीने पत्रकार परिषदेत देण्यात आली.

# ठरावधारकांना लाखमोलाचा भाव! ; नेत्यांची यंत्रणा सक्रिय

## गोकुळच्या निवडणुकीने गावोगावच्या दुधसंस्थाचे राजकारण तापले

बाजारभोगाव,ता.३१(वार्ताहर)–

गोकूळ दूध संघाच्या निवडणुकीचे पडघम वाजू लागल्याने जिल्ह्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापू लागले आहे. अनेक महिन्यांपासून शांत असलेले नेते, कार्यकर्ते आणि विविध गटांचे पदाधिकारी आता पुन्हा एकदा मैदानात उतरले असून ठराव गोळा करण्यासाठी त्यांच्या यंत्रणा सक्रिय झाल्या आहेत. निवडणुकीत उमेदवारी मिळवणे आणि विजयाची समीकरणे जुळवणे यासाठी ठराव हा अत्यंत महत्त्वाचा घटक मानला जात असल्याने सध्या ठरावधारकांना अक्षरशः लाखमोलाचा भाव प्राप्त झाला आहे.

गोकुळच्या निवडणुकीत दूध संस्थांचा ठराव हा उमेदवाराच्या राजकीय भवितव्याचा पाया समजला जातो. त्यामुळे अनेक इच्छुक उमेदवार आणि त्यांचे समर्थक सध्या गावोगावी फिरून ठराव मिळवण्यासाठी प्रयत्न करत आहेत. काही ठिकाणी ठरावधारकांच्या भेटीगाठी वाढल्या असून त्यांच्या घरासमोर राजकीय नेत्यांच्या गाड्यांची वर्दळ दिसू लागली आहे. निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होण्यापूर्वीच ठराव निश्चित करून ठेवण्यासाठी अनेक गटांकडून हालचाली सुरू असल्याचे चित्र आहे.

दरम्यान, काही दूध संस्थांच्या कारभाराबाबत गंभीर चर्चा सुरू झाली आहे. संस्थेच्या संचालक मंडळाला विश्वासात न घेता काही चेअरमन आणि पदाधिकाऱ्यांनी संस्थेच्या प्रोसीडिंगचा आधार घेत गोपनीय पद्धतीने ठराव आपल्या पसंतीच्या उमेदवाराच्या नावावर करून घेतल्याची चर्चा रंगली आहे. अनेक संचालकांना याची माहितीही नसल्याचा दावा केला जात आहे. त्यामुळे काही संस्थांमध्ये अंतर्गत नाराजी वाढली असून लोकशाही पद्धतीला हरताळ फासला जात असल्याची टीका होत आहे. गावपातळीवर ठरावांसाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार होत असल्याच्या चर्चांनाही उधाण आले आहे. ठराव देण्यासाठी लाखो रुपयांचा ढपला पाडून घेण्याची फिल्डिंग काही ठिकाणी सुरू असल्याचे बोलले जात आहे.

# जुन्या वादातून एकावर चाकूहल्ला

**इचलकरंजी, ता ३१–**

थोरात चौकात शुक्रवारी सायंकाळी एका नाष्टा सेंटर चालकावर चाकूने हल्ला करून मारहाण केल्याची घटना घडली. या प्रकरणी गावभाग पोलिस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. दोन महिन्यापूर्वी झालेल्या वादाचा राग मनात धरून हा हल्ला करण्यात आला. याबाबत जखमी राहुल रावसाहेब गवळी (वय २८, रा. शहापूर) यांने फिर्याद दिली आहे. त्यानुसार संशयित गौतम हीनगुंडे, किशोर कांबळे व गणेश (पूर्ण नावे माहित नाहीत) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. यापैकी एका संशयिताने चाकूने वार केला, तर अन्य दोघांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जखमी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.



















■ संपादकीय ■

# निर्वाळ्याचा अन्वयार्थ

विशेष मतदार यादी पडताळणीची (एसआयआर) प्रक्रिया कायदेशीरदृष्ट्या वैधच आहे, असा निर्वाळा अखेर सर्वोच्च न्यायालयाने दिला. स्वतंत्र आणि निष्पक्ष निवडणुकांसाठी हे आवश्यकच असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. वरकरणी पाहता हे निवडणूक आयोगाच्या अधिकारांवर न्यायालयाने शिक्कामोर्तब केले आहे. मात्र, या आदेशामुळे एसआयआरच्या विरोधात डझनभर याचिका दाखल करणाऱ्यांची अवस्था तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करण्यासारखी झाली आहे. लोकशाहीत न्यायालयाच्या आदेशाचा आदर राखणे आणि तारतम्य बाळगून बोलणे अपरिहार्य असते. त्यामुळे याचिकाकर्ते सध्या शांत असले, तरी या कायदेशीर लढाईनंतरही मूळ आक्षेपांचे भूत मानगुटीवरून उतरलेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. मुळात, आक्षेप एसआयआर राबवण्याच्या निवडणूक आयोगाच्या कायदेशीर अधिकाराला कधी नव्हताच, तर ती प्रक्रिया ज्या पद्धतीने आणि ज्या घाईगडबडीत राबवली गेली, त्या कार्यशैलीला होता. नेमका हाच कळीचा मुद्दा पुरता समजून घेतलेला दिसत नाही. परिणामी, न्यायालयीन निकालानंतरही जनमानसातील आणि राजकीय वर्तुळातील संभ्रम कायम आहे. जोपर्यंत हे व्यावहारिक आक्षेप संपत नाहीत, तोपर्यंत प्रत्येक निवडणुकीनंतर मतचोरीचा आणि प्रक्रियेच्या विश्वासार्हतेचा मुद्दा उपस्थित होतच राहील, हे निर्विवाद. गेल्या काही वर्षांत ईडी, सीबीआय या तपास संस्था सत्ताधारी भारतीय जनता पक्षाच्या इशाऱ्यावर काम करतात, अशी ओरड सातत्याने होत आहे. आता त्यात निवडणूक आयोगाचेही नाव जोडले गेले आहे. आयोग हाच भाजपचा मित्रपक्ष असल्यामुळेच भाजपला पराभवाचे तोंड पाहावे लागत नाही, असा एक विशिष्ट नरेटिव्ह प्रत्येक निवडणुकीनंतर बिंबवला जातो. परंतु, या दाव्यातील फोलपणाही तितकाच उघड आहे. केरळ किंवा तामिळनाडू या राज्यांत भाजपला बोटावर मोजता येतील एवढ्याही जागा मिळाल्या नाहीत. तिथे विरोधी पक्ष जिंकले, तेव्हा मात्र तिथल्या ईव्हीएम किंवा एसआयआरबद्दल कोणी शंका उपस्थित केली नाही. विरोधकांच्या आणि कार्यकर्त्यांच्या आरोपांचा सूर असा आहे की, निवडणूक प्रक्रियाच विश्वासार्ह नाही म्हणून भाजप जिंकतो. मात्र, प्रक्रियेकडे बोट दाखवताना विरोधकांनी एक गोष्ट विसरता कामा नये; ती म्हणजे निष्पक्ष निवडणुकीसाठी सर्वात आधी मतदार यादी शुद्ध असावी लागते. बोगस मतदारांना थारा न देता केवळ वैध मतदारच मतदान करतील, हे निश्चित करावे लागते. याच अनुषंगाने निवडणूक आयोगाने उचललेली पावले योग्य असल्याचा निर्वाळा न्यायालयाने दिला आहे. स्थलांतरित, मृत आणि दुबार नावे मतदार यादीतून वगळली गेल्याच्या आयोगाच्या दाव्यावर न्यायालयाने मान्यतेची मोहर उमटवली आहे. परंतु, जेव्हा आपण आकडेवारी पाहतो तेव्हा संशयाला जागा मिळते. एकट्या बिहारमधून ६५ लाख आणि पश्चिम बंगालमधून तब्बल ९० लाख मतदारांची नावे वगळली गेली. एवढ्या मोठ्या प्रमाणावर हे कसे घडले ? हा प्रश्न उपस्थित करत कार्यकर्त्यांनी आयोगाला पिंजऱ्यात उभे केले आहे. राजकीय विश्लेषक योगेंद्र यादव यांनी तर थेट दावा केला आहे की, देशात आता कोणी मतदान करायचे आणि कोणी नाही, याचा निर्णय छुप्या पद्धतीने भाजपच घेतो आहे. न्यायालयाच्या निकालाने आयोगाला मनमानी करण्याचे अनिर्बंध अधिकार दिले असल्यामुळे आतापर्यंत जवळपास ६ कोटी मतदारांना वगळले गेले आहे आणि भविष्यात हा आकडा १० कोटींच्या वर जाऊ शकतो, अशी भीती व्यक्त होत आहे. महाराष्ट्रातील महाविकास आघाडीचे नेते असोत, की ममता बॅनर्जी आणि अखिलेश यादव; या सर्वच विरोधकांचा एक समान दावा असतो की, केवळ त्यांच्याच हक्काच्या मतदारांची नावे जाणीवपूर्वक वगळली जात आहेत. राजकीयदृष्ट्या हा दावा थोडा खटकणारा आहे. कारण, ज्यांची नावे वगळली गेली, ते आपलेच मतदार आहेत हे या नेत्यांना आधीच कसे ठाऊक? हा निव्वळ राजकीय मतपेढीचा युक्तिवाद असू शकतो. तथापि, लोकांच्या नागरिकत्वाची पडताळणी करण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला नाही, हे विरोधी पक्षांचे म्हणणे कायदेशीरदृष्ट्या अगदी रास्त आहे. आयोग छुप्या मार्गाने एनआरसीसारखी प्रक्रिया राबवत असल्याचा जो आक्षेप होता, त्याबाबत सर्वोच्च न्यायालयानेही बऱ्याच अंशी सहमती दर्शवली आहे. मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी एखादी व्यक्ती वैध आहे की अवैध, हे जाणून घेण्यासाठी आयोग एका मर्यादेपर्यंत तपासणी करू शकतो; परंतु नागरिकत्वाच्या पडताळणीबाबत आयोगाचा निर्णय अंतिम मानता येणार नाही, हे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. हा विरोधकांचा मोठा नैतिक विजय आहे. निवडणुकांच्या अगदी तोंडावर ज्या वेगाने एसआयआरची प्रक्रिया राबवली गेली, अल्पमुदतीत लोकांना रेशनकार्डपासून ते पालकांच्या जन्मतारखेचे दस्तऐवज सादर करण्यास सांगितले गेले, ते सर्वसामान्यांसाठी जाचक होते.

# मानवतेचा चेहरा हरपला

**दीर्घकाळापासून आजारी असलेले ज्येष्ठ व ख्यातनाम शायर बशीर बद्र यांनी भोपाळ येथे वयाच्या ९१ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला आणि त्यांच्या 'एक्झिट'ने देश-विदेशातील रसिक चाहत्यांमधून एकच प्रतिक्रिया उमटली ती म्हणजे त्यांच्या जाण्याने मानवतेचा चेहरा हरपला. कारण बशीर बद्र यांनी आपल्या शायरीतून आयुष्यभर मानवतेचा संदेश अत्यंत सहज सोप्या भाषेत प्रत्येकाच्या मनात उतरवत माणुसकीची भाषा दृढ केली. खरं तर त्यांना स्वतःला माणुसकीला काळीमा फासणाऱ्या घटनेला सामोरे जावे लागले होते.**

१९८७ च्या मेरठ दंगलीत बशीर बद्र यांचे घर, ग्रंथसंपदा, अप्रकाशित कविता समाजकंटकांच्या उच्छादात जळून खाक झाल्या मात्र तरीही त्यांचा माणुसकीवरील विश्वास हरवला नाही. त्यानंतर त्यांनी भोपाळमध्ये स्थायिक होत नव्याने आयुष्याला सुरुवात केली आणि अत्यंत शांतपणे आपल्या वेदनांना वाट करून देत उपद्रव करणाऱ्यांनाही मानवतेचा संदेश देताना म्हटले-

**लोग टूट जाते है**
**एक घर बनाने में,**
**तुम तरस नही खाते**
**बस्तियाँ जलाने में....**

बद्र यांना मागच्या अनेक वर्षापासून स्मृतीभ्रंश विकाराने ग्रासले होते. अखेर भोपाळच्या राहत्या घरी 'उजाले अपनी यादों के रहने दे हजारे साथ, न जाने किस गली में जिंदगी की शाम हो जाए' अशी साद घालणारा हा शायर संध्याछायेत विलीन झाला. पद्मश्री पुरस्कारप्राप्त बशीर बद्र यांना स्मृतीभ्रंशाचा त्रास सुरू झाल्यावर त्यांचा सार्वजनिक वावर कमी होत गेला. कदाचित त्यांनी स्वतःच जाणीवपूर्वक तसा निर्णय घेतला असावा.

**कुछ तो मजबूरियाँ रही होगी,**
**यूँ ही कोई बेवफा नही होता ।**

अशी उत्कट समंजसता व्यक्त करणारा हा शायर आपल्या आयुष्याच्या अखेरच्या काळात त्यांच्यावर प्रेम करणाऱ्यांनाच ओळखेनासा झाला. आपली स्मृती आता साथ देत नाही,हे लक्षात आल्यावर त्यांनी गेल्या १० वर्षांपासून मुशायऱ्यांना जाणे बंद केले होते. बशीर बद्र हे त्यांच्या पिढीतील सर्वांत लोकप्रिय कवींपैकी एक कवी.त्यातही बशीर बद्र सामान्यातील सामान्यांच्या मनात घर करून राहिले कारण त्यांनी केवळ गझल लिहिली नाही तर गझलेला सामान्य माणसाची भाषा बनवली. बशीर बद्र यांनी मोठ्यात मोठी गोष्ट इतक्या साधेपणाने व सहज सोप्या भाषेत सांगितली की, थेट लोकांच्या हृदयाला भिडली, त्यांच्या मनात घर करून गेली. त्यांच्या शायरीत कोणताही बनावटपणा नव्हता, चमत्कार दाखविण्याचा, गूढ उलगडण्याचा अविर्भाव नव्हता तरी त्यांचा प्रत्येक शेर स्वतः एक चमत्कार



बनून जायचा. बशीर बद्र यांच्या शायरीने संसदेपासून रस्त्यांपर्यंत सर्व काही सहज व्यापून टाकले. त्यांचे अनेक शेर घोषणा बनल्या, जगण्याची, व्यवहाराची भाषा बनले. 'दिल मिले या ना मिले, हाथ मिलाते रहिए' हा त्यांचा शेर भारत-पाकिस्तान संबंधांची भाषा बनला. दोन्ही देशांच्या प्रमुखांनी हस्तांदोलन केल्याचे फोटो वृत्तपत्रात छापून यायचे तेव्हा त्या फोटोंच्या खाली दिल्या जाणाऱ्या फोटो ओळींमध्ये या शेरचा समावेश हमखास असायचा.

**'दुश्मनी जम कर करो**
**लेकिन ये गुंजाइश रहे,**
**जब कभी हम दोस्त हो जाएँ**
**तो शर्मिंदा न हो'**

हा शेर बशीर बद्र यांनी १९७२ च्या भारत-पाकिस्तान शिमला कराराच्या काळात लिहिला होता. त्याची त्या वेळी तर जोरदार चर्चा झालीच; पण राजकारणातील द्विराष्ट्रीय संबंधांवर जेव्हा जेव्हा चर्चा व्हायची तेव्हा तेव्हा याचा उल्लेख आवर्जून व्हायचा इतका तो कालातीत व चपखल ठरला. आज देशातील द्वेषपूर्ण वातावरण वाढीला लागले असताना बशीर बद्र यांचे सहज, सोप्या भाषेतले पण मार्मिक भाष्य करत माणुसकीचा संदेश देणारे शेर हमखास सामान्यांच्या ओठी येतात. बशीर बद्र यांची कविता राजकीय बंडखोरीच्या अंगानेच जाणारी; पण सौम्य व अलगदपणे भावना व्यक्त करणारी त्यामुळे त्यांच्या शायरीस एक नजाकत प्राप्त झालेली पहायला मिळते.

**इक सवारी आएगी, इक जाएगी,**
**बारी बारी सबकी बारी आएगी**

असं लिहून जीवनाचं तत्त्वज्ञान अत्यंत सहज व तरलतेने सांगणाऱ्या बशीर बद्र यांची सवारीही मर्त्य लोकातून रवाना झाली.अशा या माणुसकीची भाषा व मानवतेचा चेहरा असलेल्या बशीर बद्र यांचा जन्म कानपूरमध्ये झाला आणि बालपण अयोध्येत गेले. ऊर्दू बरोबरच हिंदी, पार्शियन आणि इंग्रजी भाषेवर त्यांचे प्रभूत्व होते. त्यांच्या 'आस' या काव्यसंग्रहामध्ये ६९ गझलांचा समावेश होता. या ६९ गझला बद्र यांच्या सर्वोत्तम गझला मानल्या जातात. या काव्यसंग्रहाला १९९९ मध्ये साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला. त्यांच्या निवडक कवितांचा 'कुल्लियाते बशीर बद्र' हा संग्रह पाकिस्तानात प्रकाशित झाला होता. बद्र यांचे उर्दूमध्ये सातपेक्षा अधिक काव्यसंग्रह प्रकाशित झाले. १९९९ मध्ये त्यांना पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले.साहित्य अकादमीसह अनेक सन्मानांनी त्यांचा गौरव झाला. त्यांना उत्तर प्रदेश उर्दू अकादमीचा सन्मान ४ वेळा मिळाला होता. बिहार उर्दू अकादमी, मीर अकादमी पुरस्कारांसह अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले होते. त्यांची सर्वांत मोठी उपलब्धी म्हणजे उर्दू गझल त्यांनी देवनागरी लिपीत आणण्याचे काम त्यांनी केले. 'उजाले अपनी यादों के' हा त्यांचा संग्रह विशेष गाजला. उर्दू शायरीनिमित्ताने त्यांनी जगभर भ्रमंती केली व जगभर त्यांचे चाहते निर्माण झाले. बशीर बद्र यांच्या निधनाने उर्दू साहित्यविश्वातील एक हळवा, संवेदनशील आणि माणुसकीची भाषा बोलणारा एक मानवतेचा चेहराच हरपला आहे मात्र त्यांच्या शायरीतील संदेश कायम रसिकांच्या 'उजाले अपनी यादों के हमारे साथ रहने दो...' असे सांगत कायम स्मरणात राहणार आहेत.

दैनंदिनी

# ऐन मशागतीच्या काळात शेतकऱ्यांसमोर समस्यांचा डोंगर

## शेती व्यवसायावर इंधन दरवाढ व तुटवडा याचा सर्वाधिक परिणाम



**भारत हा कृषीप्रधान देश आहे. भारतातील आजही प्रामुख्याने बहुसंख्य लोक हे शेती व शेतीपूरक व्यवसायावर आपला उदरनिर्वाह करत असतात.आजही देशातील शेतीला पाण्याचा मुख्य स्रोत हा पाऊस आहे .त्यामुळे पाऊस पडला तर पाणी व पाणी असेल तर शेती हे शेतीच आजचे चित्र देशात पहावयास मिळते. निसर्गचक्राचा व पावसाच्या अनियमितपणा याचा फटका शेती तसेच शेतीपूरक व्यवसायावर सर्वाधिक बसत असतो.**

शेती व्यवसायातील बदलत्या पद्धतीमुळे व काळानुरूप पारंपारिक शेती पद्धतीमध्ये शेतकरी बदल करू लागले यामध्ये अधिक उत्पादन देणारे वाण,कीड व रोग नियंत्रण पद्धती,पीक व्यवस्थापन ,पाणी व्यवस्थापन या सर्वात महत्वाचे शेतीची मशागत व मशागतीची साधने यामध्येही बदल होऊ लागला.पीक पेरणीपूर्व मशागत व पीक काढणी नंतरची कामे या सर्वात यांत्रिक साधनाचा वापर होऊ लागला.यामध्ये पारंपारिक शेती पद्धतीमध्ये बैल व त्यांच्या मदतीने शेती केली जात असे पण बैलांऐवजी ट्रॅक्टर व इतर साधनांचा वापर होऊ लागला. पण सध्याची वाढती इंधन दरवाढ पेट्रोल, डिझेल यांचे वाढते दर हा शेतीसाठी मोठा चिंतेचा विषय बनला आहे.

डिझेल दरवाढीमुळे ट्रॅक्टर मशागत, काढणी आणि वाहतूक खर्चात मोठी वाढ झाली आहे. तसेच, खते व कीटकनाशकांच्या किंमती वाढल्यामुळे शेतीचे बजेट कोलमडले असून, अल्पभूधारक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. वाढत्या इंधन दरांचा शेती व्यवसायावर होणारा मुख्य परिणाम हा ट्रॅक्टरद्वारे होणारी नांगरणी, पेरणी, वखरणी आणि रोटाव्हेटरच्या यांच्या भाड्यात प्रति एकरी भरमसाठ वाढ होत आहे. डिझेल महागल्याने अनेक शेतकरी नाईलाजाने बैलजोडीच्या मदतीने मशागतीची कामे करत आहेत, ज्यामुळे वेळेचा आणि श्रमाचा अपव्यय होत आहे. अनेक ठिकाणी आजही डिझेल इंजिन आणि जनरेटरच्या सहाय्याने पाणी देणाऱ्या शेतकऱ्यांना इंधनासाठी दरमहा मोठा खर्च करावा लागत आहे. सध्या उन्हाळा सुरु आहे.सिंचित क्षेत्राखाली ,उपलब्ध पाणी यावर जे काही पीक शेतात आहे त्याला पाण्याची उन्हाळ्यात जास्त गरज आहे. बरेचदा वीज खंडित झाल्यावर डिझेल इंजिनचा वापर करणे आता परवडत नाही.शेतात तयार होणारा शेतमाल,भाजीपाला उत्पादने, नगदी पिके,खते,बी बियाणे,शेतमाल शेतापासून थेट स्थानिक बाजारपेठेपर्यंत किंवा मोठ्या शहरांमधील मार्केटपर्यंत नेण्यासाठी ट्रॅक्टर किंवा टेम्पोचे वापर करावा लागतो.

वाहतूक खर्च वाढल्यामुळे नफ्यातून मोठा हिस्सा इंधनावर खर्च होतो. सोबतच रासायनिक खते, कीटकनाशके व बियाणे कारखान्यांतून खेड्यापाड्यात पोहोचवण्यासाठी इंधनाचे दर कारणीभूत ठरतात. यामुळे कंपन्यांकडून या वस्तूंच्या किमती वाढवल्या जाण्याची शक्यता आहे.याचा सर्वात मोठा परिणाम शेती व्यवसाय व शेतकऱ्यांवर होणारा आहे. दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन यांसारख्या शेतीपूरक व्यवसायांना लागणारा खाद्य पुरवठा आणि उत्पादनांची विक्री यासाठी इंधनाचा वापर अपरिहार्य असतो.दरवाढीमुळे या जोडधंद्यांचा नफा कमी झाला आहे. डिझेल चे दर वाढल्यामुळे शेती मशागतीसाठी वापरली जाणारी यंत्र सामुग्री व त्याचे दर यामध्ये वाढ झाली आहे.शेती पूरक व्यवसाय म्हणून दुग्धव्यवसाय याचा शेतकरी आधार घेत असतो, यामध्ये पशुखाद्य याच्या किमती वाढल्या आहेत. या सर्व इंधन दरवाढ व तुटवड्याचा परिणाम शेतकऱ्यांवर व शेती व्यवसायावर होणारा आहे. साहजिकच यामुळे शेतकरी व शेती व्यवसाय जो आधीच प्रचंड संकटात आहे त्या संकटांमध्ये वाढ होऊ शकते.

शेतकऱ्यांचा सर्वांगीण विकासासाठी उत्पादित कोणत्याही शेती उत्पादनाला किमान आधारभूत किंमत मिळणे आवश्यक आहेच सोबतच शेती कामासाठी आवश्यक इंधन डिझेल पुरवठा नियमित सुरु राहणे व इंधन दरवाढ जरी जागतिक पातळीवर ठरत असले तरी त्यामध्ये स्थिरता असणे आवश्यक आहे. सोबत शेतकरी बांधवांनी शेती करत असताना सौरऊर्जेवर चालणाऱ्या कृषी पंपांचा आणि उपकरणांचा अधिकाधिक वापर करणे आवश्यक आहे.डिझेल ट्रॅक्टरऐवजी विजेवर चालणाऱ्या आधुनिक मशागतींच्या साधनांचा शोध व वापर वाढवणे,सेंद्रिय खतांचा वापर वाढवून बाहेरील खतांवरील व वाहतुकीवरील खर्च कमी करणे सोबतच शेतीसाठी इंधनावरील अनुदानांसंबंधी (सबसिडी) किंवा पर्यायी शेती तंत्रज्ञानाबद्दल विचार संशोधन, प्राधान्य देणे आवश्यक आहे.

■ अमोल पाटील

# तंबाखू विक्रीवर बंदी आणावी

**भारतात तंबाखू आणि धुम्रपानामुळे होणाऱ्या मृत्यूची टक्केवारी वर्षागणिक वाढते आहे. तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थांच्या निर्मिती आणि विक्रीवर भारतात दुर्दैवाने कोणतेच निर्बंध नाहीत. तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीतून मोठ्या प्रमाणात महसूल मिळत असल्याने अशा पदार्थांवर बंदी आणण्याची सरकारची मानसिकताही नाही.**

तंबाखूजन्य पदार्थांच्या नियमित सेवनामुळे अपंगत्व येण्याचे, कर्करोगासारखे गंभीर आजार होण्याचे आणि मृत्यूचे प्रमाण देशात दिवसागणिक वाढते आहे.तंबाखूजन्य पदार्थांच्या वेष्टनांवर वैधानिक इशारा छापण्याची सक्ती करण्यात आलेली असली तरी व्यसन जडलेल्यांना याचे काहीच सोयरसुतक नसते. दरवर्षी लाखो माय लेकींचे संसार उद्ध्वस्त करणाऱ्या आणि लाखो मूला मुलींच्या डोक्यावरील छत्र हरपवण्यास कारणीभूत असलेल्या तंबाखूवर बंदी आणून सरकार थोड्याशा महसुलावर पाणी सोडण्याची उदारता का दाखवत नाही.गुटखा विक्रीवर बंदी घालण्यात आली तेव्हा तत्कालीन राज्य सरकारच्या निर्णयाचे स्वागत करण्यात आले होते.तंबाखूवर बंदी आणून सरकारने आणखी एक ऐतिहासिक पाऊल उचलावे.

■ सौ.मोक्षदा घाणेकर

## वाचकांचा पत्रव्यवहार

# अवैध दारु विक्री गंभीर बाब

पुणे शहर आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील विविध भागांत हातभट्टीची विषारी स्पिरिटयुक्त दारू प्यायल्याने १७ नागरिकांना जीव गमवावा लागला. अनेकांची प्रकृती गंभीर आहे. काही अजूनही मृत्यूशी झुंज आहेत.परिणाम स्वरूप मृतांचा आकडा आणखीन वाढू शकतो. चाळीशीच्या आतील कित्येक तरुणांचे संसार या विषारी दारूने उघड्यावर आणले आहेत. मुंबईतील मालवणी आणि ताडदेवचा छाया बार येथील विषारी दारूच्या घटनांनी १५० पेक्षा अधिक लोकांचा जीव घेतला होता.

त्यानंतर सरकारने या घटनांतून शहाणे होऊन महाराष्ट्रात दारूबंदी करायला हवी होती. परंतु,दारूविक्रीतून भरपूर महसूल (पैसा) मिळत असल्याने, तसेच अवैध दारूचे धंदे कदाचित पोलिसांना कुठे चालू आहेत हे माहित नसल्याने त्याच प्रमाणे राज्य उत्पादन शुल्क अनभिज्ञ असल्याने हा प्रकार झाला असावा. अर्थातच याची परिणिती अनेक कुटुंबे पोरकी झाली आहेत.

मुळातच राज्य किंवा स्थानिक पातळीवर पोलिसांना ह्या अशा अवैध दारूविक्री अड्ड्यांची राजरोस विक्री होत असताना माहिती कशी मिळत नाही? हा मोठा प्रश्नच आहेच.पुणे-मुंबई सारख्या शहरांत अवैध दारू जर विकली जात असेल तर,राज्याच्या पोलिस यंत्रणेवर आणि उत्पादन शुल्क विभागावर खूप मोठे प्रश्नचिन्ह निर्माण होते आहे.कारण दारूचे अड्डे किंवा गुत्ते रातोरात तर उभे राहत नाही ना?

■ दत्तप्रसाद शिरोडकर

# जनगणनेच्या प्रचार व प्रसाराची आवश्यकता

सध्या देशामध्ये अत्यंत मौल्यवान जनगणनेचे काम सुरू झाले आहे. यात प्रत्येक व्यक्तीची सर्वसाधारण माहिती बरोबरच देशाची लोकसंख्येची अचूक माहिती लक्षात येणार आहे. जनगणनेची सुरुवात झाली आहे. याचा प्रचार व प्रसार न झाल्यामुळे नागरिक अनभिज्ञ आहेत.एखादा प्रकल्प असेल तर त्याची मोठी जाहिरात करून श्रेय घेण्याचा आटोकाट प्रयत्न केला जातो.मात्र जनगणेसारख्या महत्त्वपूर्ण कामाचा प्रचार व प्रसार होणे आवश्यक असताना त्याकडे दुर्लक्ष होत आहे. राज्य सरकार व केंद्र सरकारने आपापल्या पातळीवर वर्तमानपत्रे, इलेक्ट्रॉनिक्स माध्यमे तसेच विविध प्रसार माध्यमातून जनगणनेबाबत प्रचार व प्रसार करणे अत्यंत आवश्यक आहे.ज्या वेळेला जनगणना अधिकारी जनगणना करण्यासाठी घरी पोहोचतो त्यावेळेस जवळपास ७० टक्के लोकांना जनगणना चालू आहे याची माहिती नसल्याचे निदर्शनास येत आहे.ग्रामीण भागात ही समस्या अधिक जाणवते.त्यामुळेच जनगणना अधिकाऱ्याला अडचण येत आहेत.सरकारने याचा गांभीर्याने विचार करून जनगणने संदर्भात प्रचार व प्रसार करणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणजेच जनगणना करण्यास सुलभ व सोयीस्कर ठरेल.


■ शशिकांत जाधव

# वाहतुकीचे नियम पाळावेत

आज रस्त्यावर प्रचंड प्रमाणांत वाहने येत आहेत. रस्ते लहान पडू लागली आहेत. अनेक शहरात पार्किंगची मोठी समस्या आहे. रस्त्यावरच दोन दोन वाहने पार्किंग केली जातात.त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. अनेक वाहनधारक वेगाने वाहने चालवितात . साहजिकच हे अपघाताला निमंत्रण ठरते. अनेक ठिकाणी गतिरोधक आहेत. पण त्याचे एकसारखे नियम नाहीत. अनेक अपघात या गतिरोधकामुळे झालेले आहेत. अनेक ठिकाणी वेगाने वाहने चालविली जातात. हे अनेक ठिकाणी अपघाताला निमंत्रण ठरू शकते. कित्येक ठिकाणी वाहनधारक सिग्नलचा उपयोग व्यवस्थित करत नाहीत.वाहतुकीचे जे नियम बनविले आहेत त्याचे पालन करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. पालक आपली वाहने कित्येक वेळा आपल्या पाल्यांच्या हातात देऊन अपघाताला निमंत्रण देतात. दररोज हजारोंच्या संख्येने वाहने रस्त्यावर येत आहेत.यावर सुद्धा काही बंधने असणे आवश्यक आहे तरच अपघाताला आळा बसेल.आज दररोज रस्त्यावरच्या अपघातात लोक मृत्युमुखी पडतात ही परिस्थिती बदलणे गरजेचे आहे.

■ शांताराम वाघ

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**सोमवार, ता.१.६.२०२६,** विक्रमसंवत २०८२,शिवशक ३५२, शालिवहन शके १९४८,पराभव नाम संवत्सरे, उत्तरायणे,ग्रीष्म ऋतो, अधिक ज्येष्ठ मासे, कृष्ण पक्षे, प्रतिपदा तिथी, १६.३८ नंतर द्वितीया तिथी, ज्येष्ठा नक्षत्र १९.०९ नंतर मूळ नक्षत्र,वृश्चिक रास १९.०९ नंतर,धनु रास सिद्ध योग, ६.३० नंतर साध्य योग,कौलव करण १६.३८ नंतर,तैतिल करण २९.०५ पर्यंत, दिनमान १२.५६,सुर्योदय ६.०२,सुर्यास्त १८.५८ (कोल्हापूरचे), राहू काळ सकाळी ७.३० ते ९,इष्टी, गुरु कर्क राशीत प्रवेश २५.५१,नवीन गॅस वापरणे,जनावर देणे घेणे.

**ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## ✻ राशीभविष्य

**मेष**-आरोग्य चांगले राहील. आपल्या अपेक्षेप्रमाणे पैसे मिळणार नाही.तुम्ही असा एखादा मोठा इव्हेंट आयोजित करू शकता. इतकी ऊर्जा आज तुमच्याकडे आहे.जबरदस्ती बोलण्याच्या कारणाने तुम्ही स्वतःला चिंतेत टाकू शकता.

**वृषभ**-मौज, मस्ती, मजा आणि करमणूकीचा दिवस. तुमचे धन तुमच्या कामी तेव्हाच येते जेव्हा तुम्ही व्यर्थ खर्च करण्यात स्वतःला थांबवाल. अचानक पाहुण्यांचे आगमन होईल.कुटुंबात आनंदी वातावरण राहील.

**मिथून**-आजचा दिवस आनंद आणि खुशीने परिपूर्ण अशा संदेशानी भरलेला आहे. नवीन ग्राहकांशी वाटाघाटी करण्यासाठी उत्तम दिवस आहे. कठोर विधाने टाळा.

**कर्क**-तुमच्या दुराग्रही वागण्यामुळे घरातील लोक दुखावतील आणि त्याचबरोबर तुमचे जवळचे मित्रही दुखावले जातील.वेळेचा सदुपयोग करा.

**सिंह**-पैसा कमावण्यासाठी तुमच्याजवळील नावीन्यपूर्ण संकल्पनांचा वापर करा. मुलांच्या बक्षिस समारंभाचे आमंत्रण हा तुमच्यासाठी आनंदाचा मार्ग ठरु शकतो.

**कन्या**-तुम्ही इतरांवर अतिखर्च करण्यासाठी पुढाकार घ्याल.तुम्ही भविष्यासाठी काही आर्थिक योजना बनवू शकता.उत्कृष्ठ कामामुळे कौतुकाची थाप मिळेल.

**तुळ**-मित्राबाबत गैरसमज झाल्याने अनवस्था प्रसंग, नको ती प्रतिक्रिया उमटू शकेल. म्हणून कोणताही निर्णय जाहीर करण्याआधी संतुलित विचार करा. आर्थिक हानी होईल.

**वृश्चिक**-आज तुमचे सहकर्मी तुमच्या कामाचे कौतुक करतील आणि तुमचा बॉस ही तुमच्या कामाने आनंदी होईल. व्यावसायिक ही आज व्यवसायात नफा कमाऊ शकतो

**धनु**- दूरवर राहणाऱ्या नातेवाईकांकडून अनपेक्षितपणे गोड बातमी मिळाल्याने कुटुंबासाठी आनंदाचा दिवस ठरेल. तुम्हाला काळजी घेणारा आणि समजूतदार मित्र भेटेल.

**मकर**-स्वत:बद्दल छान वाटावे अशा गोष्टी घडण्याचा एकदम अद्भूत दिवस. अनपेक्षितरित्या तुमच्या खर्चात वाढ झाल्याने तुमची मन:शांती ढळेल. आखलेली कामे यशस्वी होतील.

**कुंभ**-गरज नसलेल्या कोणत्याही विचारांना थारा देऊ नका. शांत आणि तणावरहित राहण्याचा प्रयत्न करा.समाजातील वेगवेगळ्या लोकांशी भेटीगाठी होतील.

**मीन**-कुटुंबातील सदस्यांशी जवळिक साधून काम करा, आयुष्यातील चढ-उतार त्यांच्याशी शेअर करा. आपला हा बदललेला स्वभाव त्यांना अमर्याद आनंद मिळवून देईल.आपले दृढ निश्चय आणि कामातील कौशल्याची दखल घेतली जाईल.


महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् अँन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५. , दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६० , सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.✻ कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# जनवाडातील कृष्णा नदी काठावरून मातीची अवैध चोरी

## अथणी पोलिसांसह महसूल विभागाचे अक्षम्य दुर्लक्ष ‖ अवैध मातीचे उत्खनन थांबविण्याची ग्रामस्थांची मागणी

अथणी,ता.३१(प्रतिनिधी)

................................

**उन्हाळ्याच्या तीव्र उष्णतेमुळे कृष्णा नदी पूर्णपणे कोरडी पडली आहे, ज्यामुळे पाण्याच्या कमतरतेने त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांसाठी दुष्काळ पडला आहे, परंतु अवैध व्यापाऱ्यांसाठी हे एक वरदान ठरले आहे.अथणी तालुक्यातील जनवाड गावाजवळील कृष्णा नदीच्या काठावरून विटा बनवण्यासाठी सुपीक मातीची अवैध चोरी आणि वाहतूक करण्याचा धंदा व्यवसाय मोठ्या प्रमाणात सुरू असून या माती उपसामुळे कृष्णा नदी खचून जात आहे.**



कृष्णा काठावरील जनवाड येथे बेकायदेशीर माती उपसा करणारी वाहने.

जिल्हा महसूल व पोलीस वरिष्ठ अधिकारी यांनी बेकायदेशीर माती वाळू उपसा होत असेल तर कडक कारवाई करा, असा आदेश बजावला आहे परंतु, अथणी पोलीस ठाण्यासमोरून दररोज अवैध मातीने भरलेले शेकडो ट्रक जात असूनही, संबंधित पोलीस आणि महसूल विभागाचे अधिकारी उदासीनतेने वागत आहेत. हे सर्व त्यांच्या डोळ्यांदेखत घडत असताना अधिकाऱ्यांच्या मौनामुळे अनेक संशय निर्माण झाले आहेत. 'पर्यावरणाचे रक्षकच आता पर्यावरणाचा नाश करण्यासाठी सामील झाले आहेत,' अशी तीव्र नाराजी स्थानिकांनी व्यक्त केली आहे.

दरवर्षी उन्हाळ्यात नदीचे पाणी आटताच,बेल्लारीतील खाणकामाची आठवण करून देणारे अवैध मातीचे उत्खनन नदीकाठच्या गावांमध्ये सुरू होते.या मोठ्या धंद्याबाबत बेळगाव जिल्हा प्रशासनाच्या मौनामागे कोणाचा तरी अदृश्य हात असल्याचा संशय आहे. प्रशासनाच्या या दुर्लक्षामुळे कायद्यावरील जनतेचा विश्वास दिवसेंदिवस कमी होत आहे.अवैध मातीची वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या गर्दीमुळे जनवाड गावात प्रचंड धूळ पसरली आहे. रात्रंदिवस सतत धावणाऱ्या अवजड वाहनांच्या कर्कश आवाजामुळे आणि धुळीमुळे गावकऱ्यांना निद्रानाशाचा त्रास होत आहे. याचा वृद्ध, लहान मुले आणि आजारी लोकांच्या आरोग्यावरही गंभीर परिणाम होत आहे.

संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तात्काळ गावाला भेट देऊन प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी करावी. आमच्या शांततेत व्यत्यय आणणारे आणि नदीपात्राच्या पर्यावरणाचा नाश करणारे हे अवैध मातीचे उत्खनन तात्काळ थांबवावे, अशी गावकऱ्यांतून मागणी होत आहे.

पर्यावरणाचा नाश करणाऱ्या या अवैध धंद्याविरोधात बेळगाव जिल्हा प्रशासन आणि तालुकास्तरीय अधिकारी जागे होऊन कठोर कारवाई करतात की नाही, हे पाहणे बाकी आहे. कृष्णा नदी खचत आहे.नदीच्या पात्राकडेला असलेल्या मोठ्या प्रमाणात माती घेऊन जात आहेत याविषयी गाव कामगार तलाठी व अधिकारी यांच्या निदर्शनास येऊन सुद्धा कारवाई नाही. जिल्हा प्रशासनाने कडक आदेश केले आहेत परंतु त्याचे पालन येथे होत नाही असे दिसून येत आहे.माती उपसा करून बारा हजार रुपयाला एक खेप टाकली जाते मात्र रात्रीची वाहतूक करतात. कोणत्या प्रकारच्या वाहनांवर नियंत्रण नाही, भरधाव वेगाने वाहन हाकले जात आहेत.

> ग्रेड टू तहसीलदार बसवराज होसकेरी यांच्याशी संपर्क साधला असता कृष्णा काठावर बेकायदेशीर माती उपसा करत असतील तर त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येणार आहे. माती उपसा कोणीही करू नये, सीमा भागात अग्रणीच्या काठावर जर विनापरवाना माती उपसा करत असेल तर तुम्ही थांबवा अन्यथा छापा यालून जागेवरच कारवाई करण्यात येईल, असा इशारा दिला आहे.

# कोगनोळी परिसरातील बळीराजा पावसाच्या प्रतीक्षेत

कोगनोळी,ता.३१(प्रतिनिधी)–

................................

**मान्सून आगमनाची प्रतीक्षा दिवसेंदिवस वाढत असताना कोगनोळी परिसरातील शेतकरी चिंतेत सापडले आहेत. आकाशात वळीव पावसाचे ढग दाटून येत असले तरी प्रत्यक्षात पावसाने हुलकावणी दिल्याने शेतकऱ्यांच्या जीवाची घालमेल सुरु झाली आहे. या भागातील बळीराजा चिंताग्रस्त झाला असून आता त्याचे डोळे केवळ आकाशाकडे लागले आहेत.**



कोगनोळी परिसरातील सुळगाव,मत्तीवडे,हदनाळ, आप्पाचीवाडी, हंचिनाळ के.एस, आडी, बेनाडी, जैनवाडी, बोळेवाडी आदी गावांमध्ये शेतकरी रोहिणी नक्षत्रात भाताची पेरणी करतात. भातासह खरिपाच्या पिकांसाठी हा कालावधी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. मात्र मोसमी पूर्व वळीव पावसाने दडी मारल्याने पेरण्या खोळंबून राहिल्या आहेत. गतसाली वळीव पावसाने जोरदार हजेरी लावली होती. मात्र यंदा एकही वळीव पाऊस झाला नसल्याने शेतकऱ्यांची चिंता अधिकच वाढली आहे. माळरानावरील शेती पावसावर अवलंबून असल्याने त्या भागातील शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसण्याची भीती व्यक्त होत आहे.

# शासनाची कामे ग्रामअधिकाऱ्यांनी निष्ठेने पार पाडावीत

## जानकी के.एम

संकेश्वर,ता.३१(प्रतिनिधी)–

................................

**सरकारने ग्राम अधिकारी (तलाठी)विभागाकडे सोपविलेली जबाबदारी त्यांनी निष्ठेने पार पाडण्याचे कार्य केल्यास त्यांच्या मागण्यांचा विचार निश्चितपणे केला जाणार असल्याचे बेळगाव महसूल विभागाच्या प्रादेशिक आयुक्त श्रीमती जानकी के.एम यांनी सांगितले.**



त्या संकेश्वर लिला लॉन्स नेसरी गार्डन येथे आयोजित ग्रामअधिकारी बेळगाव जिल्हा स्तरीय कार्यकारिणी सभेचे उद्घाटन करुन बोलत होत्या.कर्नाटक राज्य ग्राम अधिकारी बेळगाव जिल्हा व हुक्केरी तालुका घटक यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा स्तरीय कार्यकारिणी सभेचे आयोजन करण्यात आले होते.सभेला हुक्केरी विरक्त मठ श्री शिवबसव महास्वामीजींचे दिव्य सानिध्य लाभले.प्रारंभी उपस्थितांचे स्वागत कर्नाटक राज्य ग्राम अधिकारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष एन. आर. पाटील यांनी केले.

प्रमुख पाहुणे उपविभागीय अधिकारी श्रवण नाईक म्हणाले, कर्नाटक राज्य बेळगाव जिल्हा ग्राम अधिकारी संघटनेत एकतेचा अभाव दिसून येत आहे.संघटनेच्या मागण्या रास्त असल्यास त्या निश्चितच विचाराधीन असतील. ग्रामअधिकारी विभागावर कामांचा बोजा वाढतो आहे.हे सत्य असले तरी त्यावर उपाय नाही.कारण सरकारने सोपविलेली जबाबदारी टाळता येत नाही.ग्रामअधिकारी कार्यालय सुसज्ज असावे, संगणक आणि तत्सम सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी रास्त आहे.त्याचा आपण निश्चितच पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सभेला हुक्केरी तहसीलदार बलराम कट्टीमनी, उपतहसीलदार सी. ए.पाटील, बेळगाव जिल्ह्यातील ग्राम अधिकारी (तलाठी) महसूल विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

# संकेश्वरात रस्ता कामाचा शुभारंभ

संकेश्वर,ता.३१(प्रतिनिधी)–

................................

**संकेश्वर वीरशैव लिंगायत समाज स्मशानभूमी रस्ता कामाचा शुभारंभ आमदार निखिल कत्ती यांनी कुदळ मारुन केला.करजगी हॉस्पिटल ते स्मशानभूमी दरम्यानचा १ कि.मी रस्ता मुख्यमंत्री मुलभूत विकास योजनेअंतर्गत ५० लाख रुपये खर्चातून डांबरीकरण केला जाणार आहे. रस्ता कामाचे पूजन पुरोहित संजय हिरेमठ यांनी केले.**

संकेश्वर वीरशैव लिंगायत समाजाचे अध्यक्ष अप्पासाहेब शिरकोळी यांनी आम. निखिल कत्ती यांचे स्वागत केले.यावेळी आम. निखिल कत्ती यांनी मनोगत व्यक्त केले.यावेळी गजानन क्वळी, शिवानंद मुडशी, सुनील पर्वतराव,नंदू मुडशी, रोहण नेसरी, चिदानंद कर्देण्णावर, डॉ.मंदार हावळ, हारुण मुल्ला, पिंटू परीट, प्रदीप माणगांवी, कुमार कब्बूरी, सचिन भोपळे, ॲड संतोष नेसरी आदी उपस्थित होते.

# नेज येथे रस्ता कामाचा शुभारंभ

## आम.प्रकाश हुक्केरी-गणेश हुक्केरी यांचे प्रयत्न

चिकोडी,ता.३१(प्रतिनिधी)–

................................

**चिकोडी सदलगा मतदार संघाच्या व्याप्तीत येणाऱ्या नेज गावापासून तलाव मळ्यापर्यंतच्या रस्ता विकासाच्या कामासाठी विधान परिषद सदस्य प्रकाश हुक्केरी यांचे अनुदान मंजूर करण्यात आले आहे.या कामाचे उद्घाटन नेज ग्रामीण सहकारी संस्थेचे अध्यक्ष बसगौडा (राजू) पाटील आणि स्थानिक नेत्यांच्या हस्ते करण्यात आले.**



नेज : येथील तलाव मळ्याच्या रस्त्याचे निर्मिती कामास चालना देताना स्थानिक नेते.

या प्रसंगी बोलताना ते म्हणाले की,नेज गावापासून तलाव मळ्यापर्यंतचा रस्ता खूप खराब असल्याने लोकांना,विशेषतः पावसाळ्यात,शेतामध्ये जाणे खूप गैरसोयीचे झाले होते. तसेच कोळी, नायक, निर्मळे, पाटील, देक्कनवर, शिदगौडनवर आणि नागुरे मळ्यामधील रहिवाशांनी ग्रामपंचायत सदस्य आणि आमदारांना रस्ता सुधारणेसाठी निधी मंजूर करण्याची विनंती केली होती. प्रतिसाद देत, विधान परिषद सदस्य आणि आमदारांनी निधी मंजूर केला. यावेळी अण्णासाहेब मगदूम,अजयसिंग शितोळे, अप्पासाहेब सुत्तट्टी, राजू नागुरे, कुंदन कांबळे, शकील बेग, रमेश पाटील,अरविंद नरुमली, संतोष शेडबाळे, शकील जमादार, भीमा चिंचणे, बाळासाहेब कुंभरा, सुनील चिंचणे,सदानंद स्वामी ग्रामस्थ व ग्रामस्थ उपस्थित होते.

> **ग्रामीण रस्ते सुधारण्यावर भर**
>
> चिकोडी-सदलगा मतदार संघात ग्रामीण रस्ते सुधारण्यावर भर देण्यात आला आहे, ज्यामुळे शेतकरी वर्गाला फायदा होईल. शेतकरी हे देशाचा कणा आहेत.
>
> **-प्रकाश हुक्केरी विधान परिषद सदस्य**

# शिक्षकांनी मुलांचे भविष्य घडविण्यासाठी झटावे

## डीडीपीआय सिताराम

चिकोडी,ता.३१(प्रतिनिधी)–

................................

**शिक्षकांवर पालकांचा व समाजाचा मोठा विश्वास असून तडा जाऊ न देता, शिक्षकांनी संघटित होऊन चिकोडी शैक्षणिक जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी मुलांचे भविष्य घडविण्यासाठी झटावे असे आवाहन चिकोडीचे डीडीपीआय सिताराम यांनी व्यक्त केले.**



चिकोडी जिल्हा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या पदग्रहण समारंभाचे उद्घाटन करताना डीडीपीआय सिताराम,जी.एम.हिरेमठ व इतर.

शहरातील इंदिरानगर येथील बाबासाहेब आंबेडकर भवनात आयोजित कर्नाटक राज्य प्राथमिक शिक्षक संघटनेच्या चिकोडी जिल्हा शाखेच्या पदाधिकाऱ्यांच्या पदग्रहण समारंभाला उद्देशून ते बोलत होते. चिकोडी जिल्हाध्यक्ष जी. एम. हिरेमठ म्हणाले, मुलांना गुणवत्तेचे शिक्षण मिळवून देण्यात चिकोडी शैक्षणिक जिल्ह्याचे नाव राज्यात नावलौकिक आहे. या कामासाठी राज्याचे राज्याध्यक्ष चंद्रशेखर नूगली यांच्या मार्गदर्शनाखाली संघटनेचे काम करीत असल्याचे सांगितले. याप्रसंगी एस.एस.लोकनवर, वाय.एस.बुडगोळ यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी नूतन पदाधिकाऱ्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.कार्यक्रमास प्रधान सचिव विनायक नाईक, एन. एस.कांबळे, तालुकाध्यक्ष पी. डी.मजलटी, डी.एच.कांबळे, एम. जी. संकपाळ, ए.ए.नदाफ, आर. के.कांबळे, एम.जी.आतार, जी. आर. संगमेश, बीबी फातिमा मुलीमनी, संगीता कुंभार, सुनिता. एस, कुमार गाणीगेर, सी. आर. सनदी, सुनील खडक, कावेरी हिप्परगी यांच्यासह, विविध शिक्षक उपस्थित होते. एन.जी.कांबळे यांनी स्वागत व आभार मानले.

# आम.गणेश हुक्केरींना नव्या मंत्रीमंडळात मंत्रीपद द्यावे

## सर्वसामान्य कार्यकर्त्यांची काँग्रेस पक्षश्रेष्ठींकडे मागणी

चिकोडी,ता.३१(प्रतिनिधी)–

................................

**कर्नाटक राज्यामध्ये मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी राजीनामा दिल्यानंतर सध्या कर्नाटकात नूतन मुख्यमंत्री व मंत्रिमंडळाचा विस्तार होणार आहे.या नव्या सरकारमध्ये आमदार गणेश हुक्केरी यांना मंत्रिपद देण्याची मागणीला जोर लागला आहे.**

गेल्या ४० वर्षांपासून विधानपरिषद सदस्य प्रकाश हुक्केरी व आमदार गणेश हुकेरी यांनी काँग्रेस पक्षात एकनिष्ठ राहत आपल्या पक्षासाठी प्रामाणिक कार्य आज देखील करीत आले आहेत. हुक्केरी घराण्याने आज पर्यंत काँग्रेस वगळता इतर पक्षांसोबत कधीही गेले नाहीत. काँग्रेस पक्ष हाच आपला धर्म समजून मागील चार दशकांपासून हुक्केरी कुटुंब काँग्रेस पक्षाच्या सोबत कार्यरत आहे. बेळगाव जिल्ह्यामध्ये विशेषतःचिकोडी तालुक्यात हुक्केरी पिता-पुत्रांमुळे चिकोडी तालुका हा काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला म्हणून अस्तित्वात आहे. राज्यात कोणतेही सरकार असो सत्ता मिळो न मिळो नेहमी काँग्रेस पक्षासाठी आजपर्यंत कार्यरत आहेत.विधान परिषद सदस्य प्रकाश हुक्केरी यांनी मागील चार दशकांपासून ग्रामपंचायत अध्यक्ष, जिल्हा परिषद सदस्य, विधान परिषद सदस्य,मंत्री,खासदार व आता विधान परिषद सदस्य अशा वेगवेगळ्या पदांवर कार्यरत राहून या भागामध्ये काँग्रेस पक्ष जिवंत ठेवण्याचे काम केले आहे.



त्यांनी कर्नाटक सरकारमध्ये साखर व लघुउद्योग खात्याचे मंत्री असताना २०१४ साली काँग्रेस हायकमांडने दिलेल्या सूचनेचा आदर करत लोकसभा निवडणूक लढविली. मोदींची लाट असतानाही चिकोडी लोकसभा मतदारसंघातून भरघोस मतांनी निवडून आले. त्यानंतर आजपर्यंत या हुक्केरी घराण्याला काँग्रेस पक्षाने मंत्रीपद दिलेले नाही. त्यांनी पक्षासाठी केलेल्या मंत्रिपदाचे त्याग लक्षात घेऊन काँग्रेस पक्षश्रेष्ठींनी आता तरी हुक्केरी घराण्याला मंत्रिपद द्यावे, अशी मागणी सर्वसामान्य कार्यकर्त्यांमधून होत आहे.


आमदार गणेश हुक्केरी यांनी देखील जिल्हा पंचायत सदस्यांपासून त्यांचे वडील प्रकाश हुक्केरी लोकसभेवर निवडून गेल्यानंतर चिकोडी सदलगा मतदार संघाच्या पोटनिवडणुक लढवून विजयी झाले. त्यानंतर आतापर्यंत त्यांनी तीन वेळा विधानसभेवर निवडून जाऊन सध्या आमदार म्हणून कार्यरत आहेत. यापूर्वी त्यांनी कर्नाटकाचे मुख्य प्रतोद म्हणून यशस्वीपणे काम केले आहे.काँग्रेस पक्षातील अकरा आमदार भाजप सोबत गेले असताना आमदार गणेश हुक्केरी ना देखील भाजपने मंत्रीपदाची ऑफर दिली होती.पण भाजपची ती ऑफर धुडकावत त्यांनी काँग्रेस सोबतच राहण्याचा निर्णय घेतला होता. या दोघा पिता-पुत्रांनी नेहमी कधीही आपला स्वार्थ न पाहता गेल्या ४० वर्षांपासून काँग्रेस पक्षातच राहण्याचा निर्णय घेतला आहे. काँग्रेस पक्ष म्हणजे हुक्केरी घराणे व हुक्केरी घराणे म्हणजे काँग्रेस पक्ष असे समीकरण नेहमी कर्नाटकात आहे. आजपर्यंत या पिता-पुत्रांचा पराभव करण्याचा विरोधी पक्षांनी खूप प्रयत्न केला. पण त्यांनी या भागामध्ये राबवलेली विकास कामे व नागरिकांचा त्यांच्यावर असलेल्या विश्वासामुळे आजपर्यंत चिकोडी- सदलगा मतदार संघात काँग्रेस पक्षाची सत्ता आहे. त्यामुळे कर्नाटकातील चिकोडी सदलगा मतदार संघ काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो.प्रकाश हुक्केरी हे राज्यातील सर्वात ज्येष्ठ काँग्रेस पक्षातील नेते आहेत. त्यामुळे हुक्केरी घराण्याला काँग्रेस पक्षाने मंत्रीपद देणे गरजेचे आहे. अशी मागणी केली जात आहे.

# संकेश्वरचा गौरव पाटील वैमानिक सेवेत दाखल

संकेश्वर,ता.३१(प्रतिनिधी)–

................................

**अंकले-संकेश्वर येथील युवक गौरव भरमाजी पाटील याची इंडिगो विमान कंपनीत वैमानिक म्हणून निवड झाली आहे.**



गौरवचे प्राथमिक शिक्षण संकेश्वर एस.एस.केपाटील (खातेदार) इंग्रजी माध्यम शाळेत झाले असून त्याचे महाविद्यालयीन शिक्षण मूडबिद्री तसेच कारकल येथे झाले आहे.तो चेन्नई येथे वैमानिकाचे प्रशिक्षण पूर्ण करुन इंडिगो विमान कंपनीत वैमानिक सेवेत दाखल झाला आहे. दुंडगे (ता. गडहिंग्लज) विद्यामंदिर शाळेचे शिक्षक भरमाजी पाटील व संकेश्वर मराठी मुलींच्या शाळेच्या शिक्षिका सौ.भारती पाटील यांचा तो मुलगा आहे.गौरवने कष्टातून मिळविलेल्या यशाचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.



# शिरगुप्पी ओढ्याच्या स्वच्छतेला प्रारंभ

निपाणी,ता.३१(प्रतिनिधी)–

................................

**निपाणी शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या जवाहरलाल तलावाला पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाण्याचा स्त्रोत्र हा शिरगुप्पी ओढ्याचा आहे. या ओढ्यात मोठ्या प्रमाणात टाकाऊ वस्तूमुळे मोठ्या प्रमाणात कचरा टाकला जात होता.**

याबाबत दोन दिवसापूर्वी सोशल मिडीयावरून शासननियुक्त नगरसेवक ॲड.संजय चव्हाण यांनी हा ओढा स्वच्छ करण्याची मागणी केली होती. या मागणीची दखल घेत पालिका प्रशासनाने आजपासून या ओढ्याची स्वच्छता सुरू केली आहे. पालिका आयुक्त गणपती पाटील, आरोग्य अधिकारी विनायक जाधव, पाणी पुरवठा विभागाचे प्रविण कणगली, सर्जेराव चव्हाण आदींनी पुढाकार घेत कामाला प्रारंभ केला. त्यामुळे ओढ्याचे पाणी मोठ्या प्रमाणात येण्याबरोबर स्वच्छ आणि कचरामुक्त पाणी येईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.आज पालिकेने पाणी पुरवठा विभागाच्या काही कर्मचाऱ्यांना घेऊन जेसीबीच्या सहाय्याने या स्वच्छतेच्या कामाला प्रारंभ केला आहे,त्यामुळे नागरिकांतून समाधान व्यक्त होत आहे.



कोगनोळी येथे विद्यार्थिनींच्या गुणगौरवप्रसंगी संस्थापक चेअरमन राजकुमार खोत,उत्तम पोवार,संदीप पाटील व मान्यवर

# कोगनोळी विठू माऊली सोसायटीतर्फे गुणवंतांचा गुणगौरव

कोगनोळी,ता.३१(प्रतिनिधी)–

................................

**येथील विठू माऊली को.ऑप.सोसायटीतर्फे विविध क्षेत्रात प्राविण्य मिळविलेल्या मान्यवर व गुणवंत व्यक्तींचा गुणगौरव करण्यात आला. अध्यक्षस्थानी संस्थापक चेअरमन राजकुमार खोत हे होते. प्रारंभी संचालक मनोहर पाटील यांनी स्वागत केले.**

याप्रसंगी दहावीमधील गुणवंत विद्यार्थिनी श्रेयसी संदीप पाटील, वैभवी विलास पाटील, उत्कर्षा उत्तम पोवार यांच्या उज्वल यशाबद्दल तसेच वेदिका पूर्णानंद पाटील यांची इस्त्रो अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाल्याबद्दल तर मत्तीवडे येथील सुभेदार बाजीराव भिमराव पाटील यांनी सैन्य दलात उत्कृष्ट सेवा बजाविल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते गुणगौरव करण्यात आला. यावेळी संचालक उत्तम पोवार, विश्वास देवकुळे, संदीप पाटील, रावसाहेब भिवाजी-पाटील यांच्यासह अन्य मान्यवर व कर्मचारी उपस्थित होते. व्यवस्थापक शुभम पाटील यांनी आभार मानले.

# शिवनूर कृषी संघाच्या अध्यक्षपदी शिवपुत्र बेवनूर

अथणी,ता.३१(प्रतिनिधी)

................................

**शिवनूर येथील विविध उद्देश प्राथमिक ग्रामीण कृषी सहकारी संघ अध्यक्षपदी शिवपुत्र रावसाब बेवनूर यांची निवड झाल्याची घोषणा निवडणूक अधिकारी राघवेंद्र नुली यांनी केली.**

संघामधील रिक्त झालेल्या पदावर अध्यक्षपदासाठी एकच उमेदवारी अर्ज दाखल झाल्यानंतर त्याची बिनविरोध निवड करण्यात आल्याची घोषणा त्यांनी केली.यावेळी बँक निरीक्षक महादेव उळागडी हे होते.यावेळी नूतन अध्यक्ष शिवपुत्र बेवनूर म्हणाले,आम.लक्ष्मण सवदी,राजू कागे यांच्या मार्गदर्शनाखाली सहकारी संघ चालवून शेतकऱ्यांसाठी अनेक योजना अंमलात आणून सहकारी संघ सतत फायद्यात आणण्याचा प्रयत्न करेन.शेतकऱ्यांच्या हितासाठी काम करून राज्यांमध्ये आदर्श संघ बनवू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी संघाचे उपाध्यक्ष हुवाना माने, संघाचे संचालक अप्पासाहेब किरणगी, अशोक किरणगी, संभाजी वाघमोडे,रोहित मगदूम, रावसाहेब घुगरी, पंडित कांबळे, सुखदेव सनदी, अवना वाघरे, श्रीमती सरस्वती अजूर, श्रीमती रेखा बिरादार, प्रशांत अजूर, श्रीशैल पाटील, कावेरी कोळी,तमन्ना पुजारी,आप्पासाहेब माळी,अण्णासाहेब आढळी, बी.बी.अजूर,करण बेवनूर,आप्पासाहेब आढळी,पराप्पा मगदूम, आप्पासाहेब आढळी,बी.एन.खवटगोप, गुरुपुत्र बेवनुर अण्णासाहेब माने, सर्व संघाचे सदस्य उपस्थित होते.



बुदिहाळः ज्योती मल्टीपर्पजकडून मयत सभासद वारसांना ३० हजारांची मदत सुपूर्द करताना मान्यवर.

# ज्योती मल्टीपर्पजकडून मयत सभासद वारसांना आर्थिक मदत

यमगर्णी,ता.३१(प्रतिनिधी)–

................................

**जोल्ले उद्योग समूहाच्या ज्योती मल्टीपर्पज सौहार्द सहकारी संघ एकसंबा बुदिहाळ (ता. निपाणी) शाखेतील कर्जदार सुभाष विठ्ठल लोहार यांचे आकस्मित निधन झाले.संस्थेतर्फे त्यांच्या वारसदार संगीता लोहार यांना सभासद कल्याण निधीतून ३० हजाराची मदत दिली.**

यावेळी सर्जेराव मगदूम, दिलीप पाटील, तातोबा माने, युवराज आवटे, संतकुमार खोत, अविनाश पाटील आदी उपस्थित होते.

**पहिल्या पंधरा शब्दास ७५ रू, पुढील प्रत्येक शब्दास ७ रू, शब्द मर्यादा ५० पर्यंत**

## * खरेदी विक्री *

**जुने सोफासेट** रिपेअरी करून देवू. तसेच नवीन सोफा, पडदे व गादी ऑर्डरीप्रमाणे तयार करून देवू. संपर्क-८२६१०८९५९०

**घर विकणे-** ३५०० स्क्वे. फूटमध्ये २ गोडाऊन व पहिल्या मजल्यावर रहाणेची सोयीसह आरसीसी घर घारसे बंधू हॉटेलजवळ, शहापूर, कोरोची रोड, संपर्क-७७२०९९२२४५

**इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील** शहापूर (तोरणानगर) येथील ४० फूट २ रस्त्याचा अंदाजे ४००० स्क्वे. फूट एन.ए. प्लॉट विकणे. संपर्क-९४२२६२०२७९

**विकणे आहे.** तुळजाभवानी नगर येथे २ बीएचके आरसीसी घर सर्व सोयीनियुक्त विकणे आहे. संपर्क-९१३०८६६९२२, ८७६७२८५०६५

**३ बीएचके** रो बंगलो विकणे आहे. ईस्ट मँचेस्टर होम्स, शरद डिग्री कॉलेजलगत, इचलकरंजी. संपर्क-९८३४९२२९०७

**फार्महाऊस विकणे** आहे शिरढोण-कुरूंदवाड डांबरी रोडटच सर्व सोयीनीयुक्त ३० गुंठे जागेमधील फार्महाऊस विकणे आहे. मो. बापूजी-९३४२५२७१६९.

**दुकान बंद** केले मुळे पुजेचे साहित्य व प्रिमीअर क्वॉलिटी अगरबत्ती निम्म्या किंमतीत देणे आहे. मो. ९२७२३३७६४९.

**४८ इंची** भिडे न्यू हिर मोटरसहीत २६ माग, डक्टींग ४ डबे सहित विकणे आहे. संपर्क-९८६००२०३६९.

**कबनूर येथे** दिड गुंठा जागेमध्ये (५८ बाय २६) १६ मागाचे रिकामे आरसीसी शेड, चालू स्थितीतील १२ मागासह विकणे आहे. (१ बीएचके रहाणेच्या सुविधेसह) मो. ८७८८०३३७९२.

## * आरोग्य विषयक *

**मानसिक आजार**- व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या, स्किझोफ्रेनिया, बायपोलर, मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ.सी.डी. मंत्राचाळेपणा. इ. मानसिक आजारसाठी दारू, तंबाखू, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री. इ. व्यसनमुक्तीसाठी शिघ्रपतन, नपुंसकता, विर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैगिंक समस्यांसाठी व वृध्द लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रूषा केंद्र व नातेवाईकांशिवाय ॲडमिट करण्याची सोय. निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज (सांगली) संपर्क-८०८३६०८०८३, ९९२२६४६५६६

## * बोअरवेल विषयक *

**श्री साई बोअरवेल-** आमच्याकडे ४॥ व ६॥ इंची बोअर योग्य दरात मारून मिळेल. संपर्क-९९२२७७२०३६, ९८८१३५५८१३

## * नोकरी विषयक *

**पाहिजेत** यड्राव येथील नामांकित कंपनीमध्ये खालील पदांसाठी अनुभवी उमेदवार पाहिजेत. 1)Purchase Department अनुभव 6-7 वर्षे (Machine shop/Eng Indu) शिक्षण: DME/ BE/M.Com/MBA Skills: Knowledge of Various castin Material grades, raw Material bars (MS,Alloy Steel, SS,Ci, Sc Iron Etc, vendor development &Purchase management. संपर्क- ९७६४७८०१०१. ईमेल: hr@gmtcpl.com

**Draftsman** (Machine Shop) अनुभव २-३ वर्षे, शिक्षण : ITI/ DME, Skills: 2 D/3 D CAD, Solid Works, संपर्क-९७६४७८०१०१. ईमेल: hr@gmtcpl.com

**MACHINESHOP SUPERVISOR-** Exp: 1- 2 Years शिक्षण ITI / DME Role : CNC/VMC Production&Shop Floor Control. संपर्क- ९७६४७८०१०१. ईमेल: hr@gmtcpl.com

**TECH QMS SYNERGY.** संगमनगर, तारदाळ येथील इंजिनिअरींग कंपनीकरिता पाहिजेत. CNC/VMC प्रोग्रामर-०१, शिफ्ट सुपरवायझर-०३, क्वालिटी इन्चार्ज-०१, ॲटो कॅड ऑपरेटर-०१, टर्नर-०२, हेल्पर-०३. मालवाहतुक टेम्पोवर ड्रायव्हर-०१. संपर्क-८९७५०५८५८, ९४२३५९५८५८

**सेल्समन पाहिजे.** मार्केटिंगसाठी शिकाऊ व अनुभवी संपर्क- शिवशांती, सांगली नाका, इचलकरंजी. मो. ९६०४४७२६२३, ८९५६६६९६९६

> **पाहिजेत**
> * क्लार्क पाहिजेत *
> पदे - ३ (पुरूष)
> शिक्षण- बी.कॉम, कॉम्प्युटर, टॅली
> अनुभवींना प्राधान्य
> **बालाजी शिक्षण समुह**
> विक्रमनगर, इचलकरंजी
> -----: संपर्क :-----
> **9075999171**

**श्रीम इंडस्ट्रिजमध्ये** पावडर कोटींग युनिटमध्ये हेल्पर कामासाठी जेंटस+मुले पाहिजेत. काम ८ तास, पगार आकर्षक. विनायक हायस्कूलजवळ, शहापूर. ७०८३८४८९४६

**फार्मासिस्ट पाहिजे.** जेनेरीक रिटेल मेडिकलमध्ये अनुभवी फार्मासिस्ट पाहिजे. आकर्षक पगार+इन्सेंटिव्ह. मेल- care@janaushadhistore.in

**नामांकित कंपनीमध्ये.** कामगार पाहिजेत. (मुले) आकर्षक पगार, पीएफ+ईएसआयसी सुविधा. शिक्षणाची अट नाही. संपर्क-९६५७१४१०५८

**शालेय वस्तू प्रदर्शन** आणि विक्रीमध्ये कामगार पाहिजेत. ९ ते ९ टाईमिंग पगार-४०० रू. प्रत्येक दिवस. ७०३०५४४५६७

**NEW** नवीन सायझिंग युनिट साधी सायझिंग मशिन करीता दिवाणजी पाहिजे. संपर्क- ओंकार-७७५८९८७८४५

**मॅकॅनिकल कंपनीमध्ये** १२ ते २० हजार मिळवण्याची संधी भरती सुरू. १० वी/१२ वी/आयटीआय शिकाऊ मुले-१० व हेल्पर मुलगा-०१, शिक्षणाची अट नाही, इचलकरंजी. ९१७५९६७७६७, ८९५६१६९६९६

**मोफत कॉम्प्युटर प्रशिक्षण** योजने अंतर्गत ५० बॅचेसना प्रवेश सुरू. १०० % नोकरी व व्यवसायाभिमुख प्रशिक्षण. Graphic Design, Ms-Office, Tally Prime, Advance Excel कोर्सेसना प्रशिक्षण. नाममात्र नोंदणी फी. Universe Computer. पत्ता- इचलकरंजी बस स्टॅन्डजवळ, बँक ऑफ महाराष्ट्रसमोर. - संपर्क-९२८४२४९८०

**टेलिकॉलींगसाठी मुली हव्या आहेत.** शिक्षण १० वी पुढे, वय १८ ते ४०, श्री महालक्ष्मी वधुवर-८८३०२४०४२६

**कामगार पाहिजे.** कापड दुकानात शिकाऊ व गरजू फूल्ल टाईम, पार्ट टाईम, लेडीज/मुलगी कामगार पाहिजे. जनता चौक, इचलकरंजी.७७७३९९७६३४, ९८६०८०७३८६

**कापड दुकानात** कामासाठी शिकाऊ/अनुभवी कामगार पाहिजे. संपर्क-अप्सरा ड्रेसेर्स, शॉपिंग सेंटर, जनता चौक, इचलकरंजी. मो. ९७६२३७१४४३

**हेल्पर पाहिजेत.** सिमेंट दुकानात हेल्पर पाहिजेत. पेमेंट-१२०००/- संपर्क-९३२५८४०१४८

**रेडिमेड कपड्याच्या दुकानामध्ये** हुशार अनुभवी/शिकाऊ सेल्समन पाहिजेत. नटराज ड्रेसेस, १४ शापिंग सेंटर, इचलकरंजी. मो. ८५५२००३२६४

**वाचकांसाठी निवेदन**

**दै.महासत्ता** वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होणाऱ्या खरेदी-विक्री, नोकरीविषयक, भाड्याने देणे-घेणे, कर्ज, गुंतवणूक, व्यवसाय, आरोग्य विषयक व इतर सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहीरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. प्रत्येक जाहीरातीच्या आशयाची सखोल शहानिशा करणे शक्य नसल्यामुळे यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत **दै.महासत्ता** व्यवस्थापन हमी घेऊ शकत नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पुर्ततेसंदर्भात कोणतीही जबाबदारी **दै.महासत्ता** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक अथवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. **व्यवस्थापक**

**सिक्युरिटी गार्ड पाहिजेत.** फिक्स डे शिफ्ट, नाईट शिफ्ट, इचलकरंजी, तारदाळ, कोरोची. संपर्क-९३२६६३३४४५, ९६८९५६४००४

> **पाहिजेत**
> कोरूगेटेड बॉक्स तयार करणाऱ्या कंपनीत शिकाऊ कामगार पाहिजेत.
> अर्जासह समक्ष भेटा.
> **अरूंधती कलर कार्टन्स**
> पार्वती इंड. इस्टेट, यड्राव.
> **9595845774, 7745005830**

**फौंड्री कामासाठी हेल्पर,** मेंटेनन्स कामासाठी इलेक्ट्रीशियन २ ते ३ वर्षांचा अनुभव. संपर्क-सुखमंगल इंडस्ट्रिज. ९६२३४३१५४७

**सीएनसी ऑपरेटर पाहिजे.** २ जागा. शिकाऊ- २ जागा. पत्ता- पायोनियर इंजिनिअरींग, आरगे भवनसमोर, विक्रमनगर, इचलकरंजी. ८२३७०९५५०८

**मालवाहतुक** ॲपे गाडीवर ड्रायव्हर पाहिजे. मो. ९३२५१६९२५५

**ऑफिस असिस्टंट पाहिजे.** युवती/महिला नामांकित वधुवर सुचक केंद्रसाठी. पत्ता- आंबेडकर चौक, कबनूर. संपर्क-९१३०३६१८९१, ९१३०००१८९१

**कुमार गारमेंटस्मध्ये** कामगार पाहिजे. संपर्क-७२१८१२५९७२, ९८२३४२५१७१

**सांगली, मिरज,** इचलकरंजी, जयसिंगपूर येथे रहात असलेले कपाट मेकर, सीओ २ वेल्डर, हेल्पर पाहिजेत. कोंडीग्रे फाटा, ८६२६०५७९५६.

**बेडसीट चादर** व पडद्याच्या दुकानासाठी अनुभवी/शिकाऊ कामगार पाहिजे. ओम एन्टरप्राईजेस, कल्पना टॉकीज जवळ, इचलकरंजी. मो. ९३७३७८५९५५.

**कापड पेढीवर** हेल्पर आणि दिवाणजी पाहिजे. मो. ७४४७३४५०६६, ९४०४२५७८०६.

**ऑडीटर ऑफीसमध्ये** लेडीज ऑडीट असिस्टंट पाहिजे. संपर्क - अमीन के. ढालाईत. मो. ९५९५९९५०५०.

**कोरोची येथे** मेडीकलसाठी लायसनसहीत लेडीज फार्मासिस्ट पाहिजे. संपर्क -९५९५९९५०५०.

**प्लंबीग हार्डवेअर** शोरूममध्ये लेडीज कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे व मार्केटिंगसाठी अनुभवी जेन्टस्/लेडीज पाहिजे. पत्ता-शहापूर, ९५०४१११७७१.

**पार्ट टाईम** गव्हर्मेंटचे काम करा. गृहिणी, रिटायर पर्सन व इतर. वय २५ ते ७०. शिक्षण दहावीच्या पुढे. मो. ८८८४९८०२३०.

**एथर इचलकरंजीमध्ये** सर्व्हिस विभागामध्ये टेक्निशियन-०३ जागा भरणेचे आहेत. संपर्क ९१७५१६७१२५, ८३८००१४१२९.

**नामांकित इन्स्टिट्यूटमध्ये** आयटी चे सॉफ्टवेअर शिकविण्याकरीता स्टाफ त्वरीत नेमणे आहे. मो. ९५४७७१४७४७

**दुध व दुग्धजन्य** पदार्थ डिलेव्हरी करणेसाठी कोरोची, शहापूर, कबनूर भागातील मुले पाहिजेत. मो. ७८४१०८६२८९, ८४३२९११७११.

**रेस्टारंटमध्ये कामासाठी** जेन्टस् वेटर आणि हाऊस किपर पाहिजेत. चहा, नाष्टा दोन वेळ, जेवण दिले जाईल. मो. ९९२१३१६६०२.

**सांगली रोड** येथे लेडीज ब्युटीकमध्ये शिवण कामाचा अनुभव असलेली महिला कामगार पाहिजे. विविध प्रकारचे ड्रेस, ब्लाऊज, घागरासह सर्व प्रकारचे काम येणाऱ्यांना प्राधान्य. संपर्क- ग्रेशियस गारमेंट, मो. ८५५४००७१४४.

**रिसॉर्टमध्ये** Room Boy कम House Keeping मुले पाहिजेत. पगार १७,९९९ तसेच व्हेज, नॉनव्हेज जेवणाची व राहण्याची उत्तम सोय. मो. ८०८०२३५०५१.

**आरके सिनेमा येथे** कॅफे, हाऊस किपींग व किचन स्टाफ, स्टाफ सुपरवायझर अशा विविध पदाची भरती चालू आहे. इच्छुक उमेदवारांनी समक्ष भेटावे. भेटण्याची वेळ-दुपारी ३.०० ते सायं. ६.०० वा. संपर्क-७४४७४४००७०

**अनुभवी सिक्युरिटी गार्ड पाहिजेत.** हातकणंगले, लक्ष्मी इंडस्ट्रिज इस्टेट एमआयडीसी व आवाडे पार्क ८ तास १४०००/- दरमहा. ८८०६३२२४२४, ९८३४११९५४५

**कायझन व्हिल्स** या नामांकित शोरूममध्ये सिक्युरिटी गार्ड हवे आहेत. अनुभवींना प्राधान्य. ईएसआय, पीएफ ची सुविधा. संपर्क-९८८१७५९९९६

**सेल्समन पाहिजे.** फरसाणा व इतर नमकिन प्रोडक्टची ऑर्डर घेण्यासाठी अनुभवी प्रामाणिक गरजू सेल्समन पाहिजे. टू व्हिलर गाडी असणे आवश्यक आहे. मो. ९५२७७६४४६०, ९५२७७६६११२

**व्हीएमसी ऑपरेटर** व हेल्पर पाहिजेत. पगार १२ ते २० हजार प्रोग्रॅम व सेटींग शिकवली जाईल. पत्ता- कोरोची. ९४२३२९०४०७

**Urgent Requirment-** Required B.Text Candidate for Lab Executive/Lab Technician Position/Process Follow up Person Qualification on B.Text Experience, Fresher or 1-2 years. Experience preferred. Cont-9689959512

**फोन पे कंपनीमध्ये** हातकणंगले व शिरोळ तालुकाकरीता फिल्ड सेल्स एक्झीक्युटिव्ह पाहिजेत. पगार-१७,५००/- +इन्सेटिव्ह+पीएफ+मार्केट अलाऊन्स. संपर्क-७५०७७०६१३०, ८६६८७०६६९४

> **पाहिजेत**
> १) फिटर २) इलेक्ट्रीशन ३) कोअर शॉप इन्स्पेक्टर ४) कोअर शॉप ऑपरेटर ५) जॉब इन्स्पेक्टर ६) क्वॉलिटी सुपरवायझर ७) अकौंट असिस्टंट ८) स्पेक्ट्रो व मायक्रो ऑपरेटर ९) रिसेप्शनिस्ट (लेडीज) १०) पॅटर्न मेकर.
> सबंधित जागेचा २ ते ४ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक.
> १० वी, १२ वी, आयटीआय, डिप्लोमा डिग्री फ्रेश मुले पाहिजेत.
> **वेद इंडस्ट्रिज,**
> हातकणंगले
> **8308837772, 9011011880**

**श्री गुरूकृपा जनरल स्टोअर्स** कामासाठी मुलगा पाहिजे. वेळ-४.३० ते ९.३०. संपर्क-९३२५४१९८२२, ९७३००४५९२४

**ड्रायव्हर पाहिजे.** छोटा हत्ती मालवाहतुक गाडीवर अनुभवी व हुशार लायसनधारक (LMV-TR) ड्रायव्हर पाहिजे. संपर्क-९८९०२२०९४३, ७५१७५०६६८२

**मनजीसन्स फर्निचर शोरूममध्ये** हुशार व गरजू कायमस्वरूपी जेन्टस कामगार पाहिजेत. आकर्षक पगार देऊ. स्टेशन रोड, अग्नीशामक दलसमोर. संपर्क-९८८१९८१७६८, ९४२३५९५७८८

**लहान मुलांच्या शाळेसाठी** मावशी हव्या आहेत. वेळ-सकाळी ९.०० ते दुपारी १.३० आकर्षक पगार. पत्ता- सांगली रोड, जयदत्त ॲल्युमिनियमजवळ. संपर्क-७४९९७६८८३८

**नामांकित कंपनीमध्ये** कामगार पाहिजेत. इलेक्ट्रीशियन/रेफ्रिजरेशन मेकॅनिक / वेल्डर/फिटर पात्रता-१० वी/१२ वी/आयटीआय/ डिप्लोमा. संपर्क-९६७३०२१७३२

**अर्जंट सिक्युरिटी गार्ड पाहिजेत.** ८ तास ड्युटी खोतवाडी व कोंडिग्रे. संपर्क-९६०४६३९१०३

**चार्टड अकाऊंट फर्ममध्ये** काम करण्यासाठी अकाऊंटस्/ जीएसटी/ऑडिट असिस्टंट हवे आहेत. टॅली व कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक. फेशर्स हवेत. व्ही.पी. विभुते ॲन्ड कंपनी. संपर्क-९९६०९१६०५८, ९५२९०१८३२२

**त्वरीत पाहिजेत.** गारमेंटमध्ये हेल्पर कामासाठी महिला व मार्केटिंगसाठी मुले व मुली पाहिजेत. माऊली गारमेंट, भोनेमाळ. संपर्क-९१५६०५७६२६, ९९७५२८२३७४

**शिक्षक पाहिजेत.** नामांकित अकॅडमीसाठी ११ वी, १२ वी- Physics, Chemistry, Marathi, Biology. ५ वी ते १० वी साठी Maths, Marathi, English संपर्क-९८२२०३७७७८, ९३७१६८५५५६

**ग्रे बोर्ड (पुठ्ठा) कागदाच्या दुकानात** डिलेव्हरी देणेकरीता कामगार पाहिजे. संपर्क- आराधना ट्रेडर्स, मगदूम मळा, बोहरा मार्केटमागे, इचलकरंजी.

**फास्ट फूड कॅफेमध्ये** पार्टटाईम/फूलटाईम अनुभवी व फ्रेशर कामगार पाहिजेत. संपर्क-७०२०२४५६७२, इचलकरंजी.

**ऑफिस कामासाठी** मुली/मुले पाहिजेत. पद-सेल्स असिस्टंट, पगार-बेसिक सॅलरी+इन्सेंटिव्ह. स्थळ- लिंबू चौक, इचलकरंजी. फोन-९२८४००७४०४

> **पाहिजेत**
> * लेडीज स्टाफ- रिटेल शॉपमध्ये सेल्ससाठी आणि शॉपमधील कामासाठी. शिक्षण १२ वी पास वयोमर्यादा- १८ ते ४०
> * जेंटस् स्टाफ- पॅकिंग मशिन ऑपरेटर आणि इतर कामासाठी कारखान्यात शिक्षण १२ वी/ITI वयोमर्यादा- १८ ते ३०
> -----: संपर्क :-----
> **9766156695**

**पेपर कारखान्यात** मशिन ऑपरेटर-जेंटस-२ जागा, हेल्पर जेंटस-२ जागा त्वरीत पाहिजेत. संपर्क-८०८७३६७४१८, ९९२१५३२०१८

**घरगुती शेफ हवा.** चविष्ट व स्वच्छ, स्वयंपाक करणारा अनुभवी शेफ हवा. (स्त्री/पुरूष) संपर्क-७७४४००८८९६

**त्वरीत पाहिजेत.** शिफ्ट सुपरवाईझर-२ जागा (अनुभवी) सीएनसी ऑपरेटर-८ जागा. व्हीएमसी ऑपरेटर-४ जागा. लाईन इन्स्पेक्टर-२ जागा. हेल्पर-३ जागा. योग्य पात्रास आकर्षित पगार देण्यात येईल. संपर्क-९७६५९९१२३७, ९९२२५३५१९७

**तारदाळ येथे** एअरजेट कारखान्यासाठी अनुभवी दिवाणजी पाहिजेत. भेटणेची वेळ- १० ते २. पत्ता- गट नं.६६०, कृष्णानगर, सुर्यवंशी टेक्स्टाईलजवळ, तारदाळ.

> **श्री. जिनेंद्र ज्वेलर्स**
> **भरती/सुवर्णसंधी**
> सेल्स पर्सन- ५ जागा महिला/पुरूष
> कॉम्प्युटर ऑपरेटर- २ जागा
> पात्रता- १२ वी पास किंवा बी.कॉम कॉम्प्युटरचे बेसिक ज्ञान आणि संवाद कौशल्य समक्ष भेटा.
> संपर्क
> श्री जिनेंद्र ज्वेलर्स
> रूणवाल टॉवर, इचलकरंजी.
> **9421203951, 9322911546**

**लेडीज रिशेप्सनिस्ट पाहिजे.** कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक. समक्ष भेटा- पाटील आर्थोपेडिक हॉस्पिटल, चांदणी चौक, श्रीपाद नगर, इचलकरंजी. ९०२८३६७६८३

**नामांकित पिझ्झा कॅफेमध्ये** फूलटाईम कामासाठी मुले पाहिजेत, इचलकरंजी. संपर्क-८५३०३९५९६०, ९८२२५८०५६६

**B.E/B.Tech/Diploma** Electronics, Software, कामाकरीता लेडीज पाहिजेत. फूल टाईम/पार्ट टाईम. संपर्क-९३२५२५७३२५

**कॅफेसाठी लेडीज/जेंटस** कामगार पाहिजेत.संपर्क-९३१७६६३९१५, सांगली रोड, इचलकरंजी.

**सिक्युरिटी गार्ड पाहिजेत.** माने फौंड्री, इचलकरंजी येथे जागा-३ आकर्षक पगार व बोनस, शिफ्ट ८ तास. संपर्क-७२१९२८६२८४, ९८६०८१४४६३

**अनुभवी किंवा फ्रेशर** साईट इंजिनिअर व सुपरवायझर पाहिजे. संपर्क- alkaconstructions7@gmail.com

**श्री सिध्देश्वर इंजि.वर्क्स.** लेथ मशिनवर डेव्हल्पमेंट आणि प्रॉडक्शनसाठी टर्नर पाहिजे. आणि हेल्पर पाहिजे. १० वी पास/नापास. ९४२३८६००९१, ७३८७४५७४९०.

**टॅली ईआरपी** मध्ये काम करण्यासाठी अनुभवी अकौंटट पाहिजेत. एमएस ऑफिस ज्ञान आवश्यक. मो. ९४२११००५५५.

**पाहिजेत शिकावू/अनुभवी** वायरमन आणि मुले. संपर्क ९४२११००५५५.

**सिक्युरिटी गार्डस** पाहिजे. आवाडे पार्क तारदाळमध्ये. ड्युटी आठ तास, पगार १५५००/- साप्ताहिक सुट्टी, पीएफ+ईएसआयजी, बोनस, नॅशनल हॉलिडे, राहण्याची सोय. मो. ८६६९९५९९६४.

**सेल्समन पाहिजे** इलेक्ट्रीक दुकानात कौंटरवर शिकाऊ किंवा अनुभवी सेल्समन कामगार पाहिजे. समक्ष भेटा, वरचे दुकान, राणी बागेजवळ, ९०११९४२१६९.

**त्वरीत सिक्युरिटी** गार्ड भरती. इचलकरंजी, राधाकृष्ण चौक, ८ तास, डिमार्ट जवळ, ८ तास, कोरोची १२ तास शिक्षण १० वी. ८१७७९८६२३३, ७९७२३५२९४८.

**लहान बाळास** सांभाळण्यासाठी बाई पाहिजे. २४ तास. संपर्क ९३२५९८१२३८.

**१२ तास** कामासाठी हेल्पर पाहिजेत. संपर्क ८३८०८०६८६८, गैबान पेट्रोल पंपासमोर, इचलकरंजी.

**८ वी, ९ वी १०** वीसाठी सायन्स, मॅथससाठी बीएससी/एमएससी/ बीई/बीटेक/एमटेक महिला शिक्षिका पाहिजे.मो. ९८८१५२५६४४.

## * भाड्याने देणे/घेणे *

**जागा विकणे-** मंगळवार पेठ, होळी कट्ट्याच्या पुढे, एकूण ६५० स्क्वे. फूट (फोर व्हीलर पार्किंग नाही) मो. ९०२८२४४०३२

**२ बीएचके फ्लॅट** भाड्याने किंवा गहाणवट देणे आहे. सर्व सोयीनियुक्त, बोअर व नदीचे पाणी सोय. पत्ता- श्री स्वामी समर्थ निवास, शिवाजी चौक, विठ्ठल मंदिर, तारदाळ. संपर्क-९६३७०८७३१५, ९९२२१८६३२८

**३ बीएचके** सर्व सोयीनियुक्त घर भाड्याने देणे आहे. वर्धमान हौसिंग सोसायटी, जैनमंदिरसमोर, (फक्त शाकाहारींकरिता) संपर्क-८६०५६६०३१६, ९६२३४५९६८८

**गाळा/ऑफिस भाड्याने देणे.** जनता बँकशेजारी, पहिला मजला २५०स्क्वे. फूट, लिफ्ट पर्किंग, इचलकरंजी. संपर्क-७७४४८८४७४७

**१ बीएचके फ्लॅट भाड्याने देणे.** व्यंकटेश कॉलनी, डेक्कन मिलसमोर, स्टेशन रोड, इचलकरंजी. संपर्क-९४२३०४११६५

**सर्व सोयीनियुक्त** गाळा भाड्याने देणे आहे. महासत्ता चौक, सांगली रोड, डॉ. बडबडे हॉस्पिटलसमोर, इचलकरंजी. संपर्क-९८८१३७६६०१

**वीरपार्क कॉलनी,** विक्रमनगर, इचलकरंजी येथे २ बीएचके घर भाड्याने देणे आहे. पहिला मजला. मो. ९०६७९६९६७९, ९७६५६१६४२६

**निमशिरगाव फाटा सांगली,** कोल्हापूर रोडटच २ एकर रिकामी जागा भाड्याने देणे. हवी तेवढी जागा आवश्यकतेनुसार. संपर्क-८६६९१००४१८, ९५६१७८२६२९

**भाड्याने देणे.** १ बीएचके फ्लॅट सर्व सोयीनियुक्त, यशवंत कॉलनीजवळ, पाटील मळा, इचलकरंजी. संपर्क-९०९६२०१८४०, ९८५०७८४२६८

**इचलकरंजी शहरापासून** ५ ते ८ किमी अंतरावर व आसपास शेड व गोडाऊन भाड्याने मिळतील. संपर्क-९५५२७४३९८६

**आरसीसी शेड** १२०० स्क्वे. फूट भाड्याने देणे. गारमेंट किंवा इतर उपयोगासाठी सर्व सोयीनियुक्त. ७७४५०५११२००

**५०० स्क्वे. फूट** आरसीसी गाळा भाड्याने देणे. तीन बत्ती चार रस्ता कुंभार गल्ली रोड, इचलकरंजी. फोन-८३२९२८३८७४, ८४४६७०२५२०

**भाड्याने देणे.** २ बीएचके रो हाऊस बंगला सर्व सोयीनियुक्त शुध्द शाकाहारी यशोलक्ष्मी नगर, कोल्हापूर नाक्याजवळ, इचलकरंजी. फोन-९४२२४१३९४६

**सर्व सोयीनियुक्त** २ बीएचके फ्लॅट गहाणवट देणे आहे. हर्ष रेसिडेन्सी, जुना चंदूर रोड, इचलकरंजी. संपर्क-९६३७२९४२३४

**सर्व सोयीनियुक्त** १ बीएचके फ्लॅट भाड्याने देणे आहे. शिवाजीनगर पोलिस स्टेशनसमोर, म्हेतर गल्ली, इचलकरंजी. फोन-८८३०२५१६१९, ८१४९४९३१४९

**बंगला भाड्याने देणे.** शरद इंजिनिअरींग कॉलेज, ओंकारेश्वर मंदिरजवळ, ४ बीएचके फूल फर्निश्ड, २४ तास बोअरींगच्या पाण्यासह नदीच्या पाण्याची सोय. पार्किंग सुविधेसह, पॉश कॉलनीतील बंगला. संपर्क-९३२६०१९५८६

**वरच्या मजल्यावरील** १ बीएचके २ फ्लॅट भाड्याने किंवा गहाणवट देणे आहे. आल्फोन्सा हायस्कूलजवळ, यड्राव. संपर्क - ८३२९२६५०२१, ९२७२१०१०२०.

**शहापूर चौपाटी** येथे व्हेज/नॉनव्हेज साठी गाळे उपलब्ध तसेच पिझ्झा बर्गर, बॉम्ब वडापाव, कॉफी शॉप व फास्ट फूट व्यवसायासाठी मोजकेच दुकानगाळे भाड्याने देणे आहे. बाकीचे १० गाळे सुव्यवस्थित सुरू. कमी भाड्यामध्ये उपलब्ध. संपर्क ७०५८७०२१५८, ९२७२१०१०२०.

**१ बीएचके** आरसीसी रूम भाड्याने देणे. सर्व सोयीनीयुक्त, संभाजी चौक, ईमानी गादी गल्ली, इचलकरंजी. मो. ७०५८४५४३०३.

**३१ बाय १००** आरसीसी शेड भाड्याने देणे आहे. १९ एचपी लाईटसह, जवाहरनगर, इचलकरंजी. मो. ९८६०८८४१११.

**सर्व सोयीनीयुक्त** १ बीएचके फस्ट फ्लोअर स्वतंत्र घर व रोडटच ग्राऊंड फ्लोअर दोन स्वतंत्र गाळे भाड्याने देणे. चांदणी चौक, इचलकरंजी. मो. ९५०३२७२५५४.

**भाड्याने देणे** यशवंत कॉलनी येथे २ बीएचके फ्लॅट तिसरा मजला, पाण्याची २४ तास सोय. मो. ८६०५७०२९९३.

**सर्व सोयीनीयुक्त** जागा हॉस्पिटल/ऑफिससाठी भाड्याने देणे आहे. के. पी. कॉम्प्लेक्स, राणी बागेजवळ, इचलकरंजी. मो. ९४२२०४३६७६, ८८५५८९३९९८.

**विद्यार्थी+विद्यार्थीनीसाठी** कॉट बेसीसवर रूम भाड्याने देणे. पत्ता- फॉर्च्युन प्लाझासमोर, बालाजी कॉलनी, गल्ली नं. २, इचलकरंजी. मो. ९६०४४७३६२३.

**भाड्याने देणे.** २ बीएचके सर्व सोयीनियुक्त, सांगली रोड, आसरानगर बसस्टॉपजवळ, इचलकरंजी. ९८६०६८३२२६, ८८८८३५४०९६

**शेड गहाणवट देणे.** सध्या चालू स्थितीतील २१ हजार भाडे येणारे शहापूर परिसरातील २५०० स्क्वे. फूट शेड व ९०० स्क्वे. फूट पोटमाळा गहाणवट देणे आहे. संपर्क-९२०९४९०४९४

**जागा भाड्याने देणे.** २२०० स्क्वे. फूट रिकामी जागा, आमराई रोड, इचलकरंजी. फोन-९४२२०४८७०१

**सर्व सोयीनियुक्त** १ बीएचके फ्लॅट भाड्याने देणे. पार्किंगची सोय, जिजाऊ क्रीडा संकुलशेजारी, जवाहरनगर, इचलकरंजी. फोन-९०२८२५७७५१

**२ बीएचके** १३०० स्क्वे. फूट पहिला मजला (First Floer) बंगला महासत्ता चौकाजवळ सर्व सोयीनियुक्त भाड्याने देणे. संपर्क-९८२२६१००७३, ९६५७९५२५९९

**(१२ बाय १५) चे २ रूम** सर्वसोयीनियुक्त भाड्याने देणे आहे. टाकवडे वेस, कलावंत गल्ली, गावभाग, इचलकरंजी. संपर्क-९३७२४९१५२७, ९३७००२४१२०

**४००० स्क्वे. फूट** आरसीसी शेड भाड्याने देणे. २ बीएचके सर्व सोयीनियुक्त भाड्याने देणे. संपर्क-९५९२९६९२३१, ९३७१५२३३९९

**गाळा भाड्याने देणे.** जनता बँक परिसरातील २५० स्क्वे. फूटाचे गाळे भाड्याने देणे. इचलकरंजी. संपर्क-८८५७००९०५९, ९२२६९१६७३६.

**सिंगल रूम** सर्व सोयीनियुक्त भाड्याने देणे. इंदिरा हौसिंग सोसायटी, मणेरे हायस्कूलमागे, इचलकरंजी. फोन-९८५०३९५६८८

**१० बाय ११ चे ३ गाळे** भाड्याने देणे आहे. जवाहरनगर, गणपती कट्ट्याजवळ, इचलकरंजी. फोन-८०८०६११०४७

**२ बीएचके भाड्याने देणे.** सर्व सोयीनियुक्त श्रध्दा कॉलनी, इचलकरंजी. फोन-८४४६७७९०००, ९४२२०४३८७५

**खोल्या भाड्याने** देणे हिंद नेताजी चौक, बंडगर माळ, इचलकरंजी. मो. ९८५०६९९१४१, ७५१८३५७०९९

**दुकानगाळा कमर्शियल** वापर/ऑफीस, सोनार,पेढी, फायनान्स इ.साठी भाड्याने देणे आहे. सर्व सोयीनीयुक्त. प्राईम लोकेशन, राधाकृष्ण चौक, इचलकरंजी. मो. ८३८०८०६८६८.

## * बांधकाम विषयक *

**AS सेंट्रींग-बांधकाम-** गिलावा, फरशी, प्लंबिंग, बिल्डींगची सर्व कामे मटेरियलसह, डिझाईनसह प्लॅन करून देऊ, संपर्क-९९७५७०८१६५, ९६२३१४५९१३

## * व्यवसाय विषयक *

**शेअर मार्केट** सोप्या पध्दतीने माफक फीमध्ये अनुभवी तज्ञाकडून सहज शिका. प्रॉफीट फर्स्ट, कल्पना टॉकीजसमोर, ९६६५४०८८२८, ७७६८९५००२१.



# निपाणीत अवकाशात दिसले ६ हेलिकॉप्टर्स

**निपाणी,ता.३१(प्रतिनिधी)-**

**निपाणी शहरवासिय व आसपासच्या ग्रामीण भागात रविवारी अत्यंत दुर्मिळ आणि आश्चर्यकारक दृश्य पाहायला मिळाले. अवकाशात एकाच वेळी तब्बल ६ हेलिकॉप्टर्स एकाच रांगेत विशिष्ट रचनेत उडताना दिसल्याने हे दृश्य पाहण्यासाठी नागरिकांनी घरांच्या छतांवर आणि रस्त्यांवर गर्दी केली होती.**

सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास निपाणी परिसर अचानक हेलिकॉप्टर्सच्या प्रचंड आवाजाने दणाणून गेला. सामान्यतः एखाद्या व्ही.आय.पी. दौऱ्यासाठी एक किंवा दोन हेलिकॉप्टर्स एकत्र दिसतात. मात्र, आज एकाच वेळी ६ हेलिकॉप्टर्स अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने आणि कमी उंचीवरून उडताना दिसले.हे हेलिकॉप्टर्स बेळगावच्या दिशेने निघून गेले, मात्र याबाबत अधिकृत माहिती समजू शकली नाही.हे दृश्य पाहताच लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वांमध्येच कमालीची उत्सुकता निर्माण झाली.अनेकांनी आपल्या मोबाईलमध्ये या विहंगम दृश्याचे व्हिडिओ आणि फोटो कैद केले.काहीच वेळात हे व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाले.



माणकापूर येथील शाळा भेटीप्रसंगी तहसीलदार सुरेश मुंजे.

# नादुरुस्त शाळेची तात्काळ दुरुस्ती करा अन्यथा कारवाई -मुंजे

**निपाणी,ता.३१(प्रतिनिधी)-**

**माणकापुर येथील सरकारी शाळेच्या छताचे मुसळधार पाऊस आणि वाऱ्यामुळे मोठे नुकसान झाले आहे.त्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेशी खेळू नका, शाळा प्रशासन व संबधित अभियंत्याने छताची तात्काळ दुरुस्ती करून घ्यावी. अन्यथा संबंधित पीडीओ, सीआरपी यांच्यावर थेट कारवाई केली जाईल, असा इशारा निपाणीचे तहसीलदार सुरेश मुंजे यांनी दिला.**

मुंजे यांनी माणकापूर गावातील सरकारी शाळेला भेट देऊन पाहणी केली.त्यावेळी त्यांना अनेक बाबी निदर्शनास आल्या.त्यांनी शाळेच्या दुरावस्थेबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. तहसीलदार मुंजे म्हणाले की, पावसाळा तोंडावर असून अनेक शाळांच्या छतांना गळती लागली आहे, तर काही ठिकाणच्या भिंतींना तडे गेले आहेत. अशा धोकादायक परिस्थितीत विद्यार्थ्यांना बसवणे म्हणजे त्यांच्या जिवाशी खेळण्यासारखे आहे.१ जूनपासून विद्यार्थी शाळेत येणार असल्याने शाळा सुरक्षित करण्याचे आदेश दिले.यावेळी ता.पं. कार्यनिर्वाहक प्रविण कट्टी यांच्यासह स्थानिक ग्रामपंचायत प्रशासनाचे अधिकारी उपस्थित होते.

# प्रा. मंजुनाथ रावळ यांना पी.एच.डी. प्रदान

**इचलकरंजी, ता. ३१-**

**येथील डीकेटीईच्या टेक्स्टाईल ॲन्ड इंजिनिअरींग इन्स्टिटयूटमध्ये जनरल इंजिनिअरींग विभागातील प्रा. एम.आर.रावळ यांना शिवाजी विद्यापीठ(कोल्हापूर) याच्याकडून पी.एच.डी.पदवी प्राप्त झाली आहे.**



प्रा.रावळ हे गेली १२ वर्षापासून सहायक प्राध्यापक म्हणून डीकेटीईमध्ये कार्यरत आहेत. त्यांनी 'ॲन एक्सपेरिमेंन्टल इन्व्हेस्टीगेशन फॉर जॉयनिंग ऑफ निकेल बेसड अलॉय युसिंग मायक्रोवेव हायब्रीड हिटींग' या विषयावर पी.एच.डी.प्रबंध पूर्ण केला आहे. या संशोधनासाठी त्यांना प्राचार्य डॉ.दुरादुंडी सावंत बाडकर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांना संस्थेचे अध्यक्ष कल्लाप्पाण्णा आवाडे, माजी मंत्री प्रकाश आवाडे, मानद सचिव डॉ.सपना आवाडे, कार्यकारी संचालक रवी आवाडे व सर्व संचालक यांचे सहकार्य मिळाले. यावेळी डॉ. एल.एस.आडमुठे, प्रा.डॉ. ए.के.घाटगे, डॉ.व्ही.आर.नाईक उपस्थित होते.

# वाईत ८० किलो गुटखा जप्त

**वाई,ता.३१(वार्ताहर)**

**वाई शहरातील रामडोह आळी परिसरातील इंद्रजा आयकॉन इमारतीमधील एका अनधिकृत गोदामावर अन्न व औषध प्रशासनाने टाकलेल्या धाडीत तब्बल ८०.७४ किलो वजनाचा प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त केला. जप्त करण्यात आलेल्या मालाची किंमत २ लाख ५९ हजार ४८४ रुपये असून या प्रकरणी वाई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

अन्न सुरक्षा अधिकारी श्रीमती गायकवाड यांनी केलेल्या या कारवाईनंतर गुन्हा नोंदविण्यात आला आहे. अन्न व औषध प्रशासनाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. धाडीदरम्यान आरएमडी मसाला, विमल पान मसाला, टोबॅको यांसह विविध प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांचा मोठा साठा आढळून आला. संबंधित गोदामाला सील ठोकून संपूर्ण

**२.५९ लाखाचा मुद्देमाल ताब्यात**

माल जप्त करण्यात आला.

गोदाम चालक घटनास्थळी उपस्थित नसल्याने आणि संपर्क साधूनही प्रतिसाद न मिळाल्याने पोलिसांच्या उपस्थितीत गोदामाचे कुलूप तोडून तपासणी करण्यात आली. त्यानंतर संपूर्ण माल ताब्यात घेऊन गोदाम सीलबंद करण्यात आले.या प्रकरणाचा पुढील तपास वाई पोलीस ठाण्याचे जितेंद्र शहाणे करीत आहेत.

वारंवार कारवाई होऊनही शहरात अवैध गुटखा विक्री सुरूच असल्याने नागरिकांमध्ये संतापाची भावना व्यक्त होत आहे. अशा प्रकारच्या धंद्यांवर कायमस्वरूपी आळा घालण्यासाठी कठोर कारवाईची मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे.सदर कारवाई अन्न सुरक्षा अधिकारी श्रीमती गायकवाड यांनी सहाय्यक आयुक्त एस. बी. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली केली.

## 'हातभट्टी' हद्दपार होणे गरजेचे–आठवले

**पुणे,ता.३१–**

**केवळ राज्यातच नव्हे तर देशभरात सर्रास विक्री जाणारी हातभट्टीची दारू अत्यंत घातक असून ती कायमस्वरूपी हद्दपार करण्यासाठी पोलिसांनी कठोर पावले उचलावी, अशी सूचना केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली.**

पुणे आणि पिंपरी चिंचवड या ठिकाणी रसायनयुक्त विषारी दारू घेतल्यामुळे तब्बल २२ जणांचा मृत्यू झाला आहे. आठवले यांनी काही मृतांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.



श्री जोतिबा दर्शनासाठी भाविकांची झालेली गर्दी.

# जोतिबा डोंगरावर भाविकांची अलोट गर्दी

**जोतिबा,ता.३१ (वार्ताहर)**

**अधिक महिना, रविवार पौर्णिमा आणि उन्हाळी सुट्टी मुळे जोतिबा डोंगरावर भाविकांची अलोट गर्दी झाली होती.७ जूनला सरत्या रविवारी निमित्त शेवटचा पालखी सोहळा होणार आहे.दरवर्षी रविवार हा सरता रविवार म्हणून साजरा केला जातो.**

रविवारी भाविकांची जोतिबा दर्शनासाठी मोठी गर्दी झाली . पौर्णिमा रविवार असल्याने अलोट गर्दी झाली . भाविकांच्या लांबच लांब दर्शन रांगा लागल्या होत्या. सकाळी ११ वाजता धुपारती सोहळा निघाला.श्री जोतिबा मंदिर दर्शन मार्ग भाविकांच्या गर्दीने फुलुन गेला होता.७ जुन च्या सरता रविवारी दिवशी पालखी सोहळा रात्री साडे आठला निघणार आहे.चार महिने पालखी सोहळा बंद असणार आहे.त्यानंतर दसऱ्यातील खंडेनवमीलाच पहिला पालखी सोहळा सुरू होणार आहे.सरत्या रविवारी ग्रामस्थ, पुजारी सर्व देवतांना साखर–पेढे अर्पण करतात.भाविक श्री जोतिबाच्या पालखीवर मोठ्या .प्रमाणात गुलाल–खोबऱ्याची उधळण करतात.मुलांना गुलाल खोबऱ्यांनी तुला करून नवस पुर्ण केला जातो.या निमित्ताने डोंगरावर घरोघरी आमरस व पुरण पोळीचा नैवेद्य श्रींना दाखविण्यात येतो.या दिवशी विविध रंगीफुलांनी पालखी सजवली जाते व मंदिरात उंट, घोडे सजवून आणले जातात.

जोतिबा डोंगरावरील ग्रामस्थ, पुजारी मोठ्या भक्तिभावाने सरता रविवार सोहळा साजरा करतात.डोंगरावर या सोहळ्यास मोठे पारंपरिक महत्त्व आहे. सर्व गाव पालखी सोहळ्यास उपस्थित असते.नवीन कपडे परिधान करून श्रींना आमरस पुरण पोळीचा नैवेद्य दाखवला जातो. सरत्या रविवार नंतर देवाचे उंट घोडे विश्रांती साठी पोहाळे गावी चार महिने राहतात.

# प्रा.वनिता पाटील यांना पीएच.डी.

**तारदाळ,ता.३१ (वार्ताहर)–**



**प्रा .वनिता देवगोंडा पाटील यांनी 'महाराष्ट्र शासनाचे कृषिधोरण आणि दक्षिण महाराष्ट्र १९६० ते २०१० : चिकित्सक अभ्यास' या विषयावर पीएच.डी. पदवी संपादन केली आहे. त्यांनी इतिहास विषयांतर्गत हा संशोधन प्रबंध पूर्ण केला.**

त्यांच्या संशोधनामध्ये महाराष्ट्र शासनाच्या विविध कृषी धोरणांचा, पंचवार्षिक योजनांचा, सहकार चळवळीचा, जलसिंचन विकासाचा, दक्षिण महाराष्ट्रातील कृषी परिवर्तनाचा तसेच शेतकरी आंदोलनांचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे. त्यांच्या संशोधन कार्यास मार्गदर्शक डॉ.संघमित्रा सरवदे यांच्यासह इतिहास विभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील , डॉ. भारतभूषण माळी यांचे मार्गदर्शन लाभले.

त्यांना अण्णासाहेब डांगे कला आणि वाणिज्य महाविद्यालयाचे संस्थापक. अण्णासाहेब डांगे, प्राचार्य डॉ. निरंजन कुलकर्णी, प्राध्यापक रवींद्र पाटील तसेच जयवंतराव आवळे शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जयवंतराव आवळे, संस्थेचे अध्यक्ष संजय आवळे,जयवंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलावर जमादारजतसेच डॉ. माधुरी खोत, डॉ.एवन आवळे यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

# जप्त मालमत्तेचे सील तोडून प्रवेश; दोघांवर गुन्हा दाखल

**सांगली, ता. ३१( प्रतिनिधी)**

**शहरातील एका मिळकतीचा बेकायदा ताबा घेतल्याप्रकरणी दोघांवर संजयनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याप्रकरणी एडेलवाईज एसेट रिकस्ट्रक्शन कंपनी लि. मुंबई या संस्थेत कार्यरत असणाऱ्या प्रविण पांडुरंग देसाई यांनी फिर्याद नोंदविली आहे.**

याबाबत पोलीसांनी दिलेली माहिती अशी की, मुख्यन्यायदंडाधिकारी यांच्या आदेशानुसार एडेलवाईज कंपनीने संशयित हेमंत तानाजी काळे आणि सहकर्जदार विद्या हेमंत काळे (दोघेही रा.सद्गुरू रेसिडेन्सी, कुपवाड रस्ता शाहुनगर मिरज) यांची मिळकत सील केली होती. हा प्रकार दि. १६ फेब्रुवारी ते दि. २१ मे या कालावधीत घडला.

# इचलकरंजी परिसरातील मुद्रकांकडून मुद्रण साहित्यात दरवाढ

**इचलकरंजी,ता.३१–**

**मागील काही महिन्यांपासून जागतिक स्तरावर असलेली युद्धजन्य परिस्थिती पाहता परदेशातून येणाऱ्या अनेक केमिकल्सवर बऱ्यापैकी अवलंबून असणारा मुद्रण व्यवसाय सध्या अडचणीत येऊ लागला आहे.**




मुद्रण व्यवसायासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या किंमतीत सातत्याने होत असलेली वाढ, तसेच वीज दरवाढ, मजुरी, वाहतूक व इतर साहित्य खर्चात झालेली वाढ लक्षात घेता प्रिंटींग व्यवसाय अडचणीत येऊ लागला आहे. कागद, शाई, प्लेट, केमिकल्स, फ्लेक्स मटेरियल तसेच इतर आवश्यक साहित्यांच्या किंमतीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. मुद्रण क्षेत्रात नवीन प्रिंटींग ऑपरेटर, बायंडर असे कर्मचारी तयार होणे कठीण झाले आहे.महागाईच्या काळात मुद्रकांना व्यवसाय चालविताना आर्थिक ताण निर्माण होत असल्याने ही दरवाढ अपरिहार्य असल्याचे असोसिएशनचे अध्यक्ष कलगोंडा पाटील यांनी स्पष्ट केले आहे.यामध्ये ऑफसेट प्रिंटिंग, स्क्रिन प्रिंटिंग, डिझाईनिंग, बायडींग वर्क्स, डिजीटल फ्लेक्स प्रिंटिंग आदी क्षेत्रातील मुद्रकांचा सहभाग असून सर्व संबंधित व्यावसायिकांनी नव्या दर रचनेनुसार व्यवहार करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. बैठकीस प्रिंटर्स असोसिएशन इचलकरंजीचे अध्यक्ष कलगोंडा पाटील, कोल्हापूर जिल्हा मुद्रक संघाचे अध्यक्ष संजय थोरवत, उपाध्यक्ष अभिजीत पडवळे, अंजुम तांबोळी, प्रकाश करंबळकर, ओमकार चव्हाण तसेच प्रिंटर्स असोसिएशनचे उपाध्यक्ष, संजय निकम, सचिव सिताराम शिंदे, खजिनदार नरेंद्र हरवंदे, संचालक महादेव साळी, विनोद मद्यापगोळ, दिपक वस्त्रे, सुधाकर बडवे, रणजित पाटील, गणेश वरुटे, सुनिल आमणे, अजय माने, महेश बावचे, राजेश लाड, संजय आगलावे, शंकर हेरवाडे आणि इचलकरंजी व परिसरातील बहुसंख्य मुद्रक, ग्राफिक डिझायनर्स, बायंडर्स, स्क्रिन प्रिंटर्स, फ्लेक्सप्रिंटर्स उपस्थित होते.

## राहुल गांधींच्या पाठिंब्याबद्दल अभिषेक बॅनर्जी यांनी मानले आभार

**कोलकाता,ता.३१–**

पश्चिम बंगालमधील दक्षिण २४ परगणा जिल्ह्यातील सोनारपूर येथे तृणमूल काँग्रेसचे खासदार अभिषेक बॅनर्जी यांच्यावर जमावाकडून झालेल्या हल्ल्यानंतर राज्यातील राजकारण चांगलेच तापले आहे. या घटनेनंतर तृणमूल काँग्रेस आणि भारतीय जनता पक्ष यांच्यात आरोप–प्रत्यारोपांची जोरदार मालिका सुरू झाली आहे. दरम्यान, काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी या हल्ल्याचा तीव्र निषेध करत तो लोकशाहीवरील थेट आघात असल्याचे म्हटले आहे. राहुल गांधी यांच्या समर्थनार्थ पोस्ट केल्यानंतर अभिषेक बॅनर्जी यांनी त्यांचे आभार मानले आहेत .

# अरुंधती पाटील सीआयआय वूमन एक्झेम्पेलर ॲवार्डने सन्मानित

**तारदाळ,ता.३१ (वार्ताहर)**

**तारदाळ येथील कलगोंडा पाटील यांची कन्या अरुंधती पाटील (शिरोळ,) यांना भारतीय उद्योग संघाच्या वतीने प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय स्तरावरील सीआयआय एक्झेम्पेलर वुमन ॲवॉर्ड प्रदान करण्यात आला.**




नवी दिल्ली येथे झालेल्या विशेष समारंभात केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला यावेळी सीआयआयचे महासंचालक चंद्रजीत बॅनर्जी उपस्थित होते. तीन लाख रुपये रोख,सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

अरुंधती पाटील यांनी ग्रामीण भागातील महिलांना शाश्वत शेतीचा प्रसार करण्यासाठी व महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी त्यांनी केलेले नवनवे प्रयोग व उपक्रम याची दखल घेत हा पुरस्कार दिला गेला आहे. पाटील यांनी यापूर्वी सेंद्रिय शेती गांडूळ खत उत्पादन नर्सरी व्यवसाय मृदूसंधारण आणि पर्यावरण पूरक शेती पद्धती यावर प्रकर्षाने काम केले आहे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक महिलांनी शेतीपूरक उद्योगाच्या माध्यमातून जीवनमान उंचावले आहे महिलांच्या मध्ये आत्मविश्वास निर्माण करून त्यांना स्वावलंबी बनवण्यात यश आले आहे एकूणच महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत त्यांच्या या महत्वपूर्ण भूमिकेची सीआयआय ने दखल घेतली आहे

## दुचाकी अपघातात दोघे जखमी

**कोल्हापूर, ता.३१(प्रतिनिधी)**

**कोल्हापूर ते रत्नागिरीरोडवर केर्ले गावाजवळ भरधाव दुचाकीस्वारांनी एस.टी.बसला धडक दिली.**

या अपघातात बसचे नुकसान झाले, तर अजय आनंदा पाटील (वय २८ रा. माजगाव ता.पन्हाळा) व दुचाकीवर पाठीमागे बसलेला सुभाष बळवंत पाटील हे दोघे जखमी झाले. या प्रकरणी बस चालक स्वप्नील सुखदेव कांबळे (वय ३९ रा. कोरोची ता. हातकणंगले) यांनी करवीर पोलीसात अपघाताची तक्रार दाखल केली आहे.

## विवाहितेला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी रिक्षा चालकावर गुन्हा

**सांगली, ता. ३१( प्रतिनिधी)**

**ओळखीनंतर घरी येणे जाणे सुरू झाल्यानंतर विवाहितेवर रिल्स न करण्याचा दबाव टाकून तिला घराबाहेर पडण्यास विरोध केल्याने तीने अंकली पुलावरुन नदीपात्रात उडी टाकून आत्महत्या केली होती. आता संबंधित पीडित महिलेला आत्महतेस प्रवृत्त केल्याचे उघडकीस आले असून याप्रकरणी संशयित संदिप बाळासाहेब माने (रा. हरिपूर, ता. मिरज) या रिक्षा चालकाच्या विरोधात सांगली ग्रामीण पोलिसांनी गुन्हा दाखल केलेला आहे.**

शहरातील गाव भागात राहणाऱ्या प्राजक्ता योगेश देसाई (वय २७ ) या विवाहितेने कोल्हापूर रोडवरील अंकली कृष्णा नदीवरील अंकली नजीकच्या पुलावरून नदीत उडी घेऊन आत्महत्या केली होती. याप्रकरणी सांगली ग्रामीण पोलीस ठाण्यात योगेश नामदेव देसाई (रा.देवराष्ट्रे, कडेगाव, जि. सांगली ) यांनी फिर्याद दिली आहे.

त्यानुसार पोलिसांनी रिक्षाचालक संदिप माने याच्यावर आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी योगेश यांची पत्नी प्राजक्ता आणि हरिपूर येथे राहणारा संशयित संदिप माने यांच्यात मुलांना शाळेत सोडण्याच्या वेळी भेट होत राहिल्याने परिचय झाला होता. योगेश घरी नसताना संदिप माने याचे प्राजक्ता यांच्या घरी येणे – जाणे होते. प्राजक्ता या मोबाईलवर रिल्स करीत होत्या. यावरुन संदिप आणि प्राजक्ता यांच्यात वाद झाला.

संदिप याने प्राजक्ता यांना रिल्स करायचे नाही तसेच बाहेर जायचे नाही या कारणावरुन शारिरीक आणि मानसिक त्रास दिला होता. या त्रासास कंटाळून प्राजक्ता यांनी अंकली पुलावरुन नदीपात्रात उडी मारुन आत्महत्या केल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे.

# वाकुर्डे उपसा जलसिंचन योजनेचे आवर्तन सुरु

**शिराळा,ता.३१ (प्रतिनिधी ):–**

**वाकुर्डे उपसा जलसिंचन योजनेचे आवर्तन सुरु होऊन शिवनी धरणामध्ये पाणी दाखल झाले आहे.शेतकऱ्यांना यामुळे दिलासा मिळाला आहे.रणधीर नाईक यांनी वाकूर्डे बुद्रुक व इतर वाडी वस्तीवरील बाधित झालेल्या जमिनीची पहाणी करून शेतकऱ्यांच्या बरोबर चर्चा होऊन आवर्तन सुरू करण्यामध्ये यश आले आहे.**

उन्हाचा तडाखा फार मोठ्या प्रमाणात असल्यामुळे योजनेच्या लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या आवर्तन सुरू करण्यासाठी सातत्याने मागणी होत होती.मागील चार दिवसापूर्वी माजी मंत्री शिवाजीराव नाईक व जिल्हा परिषदेचे माजी सदस्य रणधीर नाईक यांनी वाघवाडी येथील पाटबंधारे कार्यालय कार्यकारी अभियंता नितीश पोतदार यांच्या दालनामध्ये परिसरातील शेतकऱ्यांच्या समवेत बैठक घेऊन आवर्तन सुरू करण्या संदर्भात नियोजन केले होते. अधिकारी कर्मचारी धरणांमधून पाणी सोडण्यासाठी गेले असता वाकूर्डे येथील शेतकऱ्यांनी त्याच्या होणाऱ्या नुकसानीसाठी व पेरण्या पूर्ण होई पर्यंत पाणी सोडू नये अशी विनंती केली होती होती. जिल्हा परिषदचे माजी सदस्य रणधीर नाईक यांनी या शेतकऱ्यांशी चर्चा करून नुकसान होत असलेल्या क्षेत्राची शेतकऱ्यांना घेऊन मोटरसायकल वरून शनिवारी पाहणी केली. नुकसान होणाऱ्या शेतकऱ्यांच्या परवानगीने व परिसरातील शेकडो शेतकऱ्यांच्या उपस्थितीमध्ये वाकूर्डे योजनेचे आवर्तन सुरू करण्यात आले असल्यामुळे शेतकऱ्यांच्या मध्ये समाधान व्यक्त होत आहे. गेल्या काही दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने शिराळा वाळवा तालुक्यात शेती पिकांसह पिण्याच्या पाण्याची फार मोठी टंचाई जाणवत होती, तर वाकुर्डे योजनेच्या लाभक्षेत्रातील पाझर तलावा मधील ही पाण्याची पातळी पूर्ण पणे खालावली असल्यामुळे व शेतकऱ्यांच्या मागणीनुसार संबंधित विभागाशी व वाकूर्डे येथील बाधीत व नुकसान ग्रस्त शेतकरी यांच्या समन्वयांमधून रणधीर नाईक यांनी केलेला चर्चा करून पाठपुरावा केल्यामुळे करमजाई धरणातून शनिवारी पाण्याचा विसर्ग होऊन आवर्तन सुरु करून प्रथम शिवणी धरणामध्ये पाणी सोडण्यात आले आहे.

# पैसे,दुचाकीसाठी विवाहितेचा छळ; पतीसह तिघांवर गुन्हा

**सांगली,ता.३१(प्रतिनिधी)–**

**विवाहितेचा छळ करुन माहेरहून रोकड आणि दुचाकी आणण्यासाठी तगादा लावणाऱ्या पतीसह सासरकडील तिघांवर सांगली शहर पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि. ७ जानेवारी २०२४ ते दि. ३१ मे २०२५ या कालावधीत पुण्यात सासरी आपला छळ करण्यात आल्याची फिर्याद संजना ओमकार चव्हाण (वय २३, रा. कलावती निवास, सदाशिव पेठ, शनि पार्क, पुणे) यांनी फिर्याद दिली आहे.**

फिर्यादी संजना यांचा विवाह ओमकार अनंत चव्हाण याच्याशी झाला होता. लग्नानंतर काही दिवसांनी ओमकार याने संजना यांना, तू मला आवडत नाहीस. केवळ माझ्या आई – वडिलांच्या सांगण्यावरुन मी तुझ्याशी लग्न केले आहे. तू खेड्यातील असल्याने तुझी माझ्यासमवेत राहण्याची लायकी नाही. तुला जर माझ्यासमवेत राहायचे असेल तर माहेरकडून खर्चाकरीता पैसे आणि दुचाकी घेवून ये' असे सांगितले. तसेच यावेळी ओमकार याने संजना यांना शिवीगाळ केली. यानंतर संजना यांना शारिरीक आणि मानसिक त्रास देण्यात आला. याबाबत संजना यांनी सासू, सासरे आणि चुलत सासू यांना सांगितले. मात्र त्यांनीही संजना हिला, तू घरातील कामे व्यवस्थित करीत नाहीस. तू आम्हाला पसंत नसल्याचे सांगितले. त्यांनीही संजना हिला शिवीगाळ करुन तीला मानसिक त्रास दिल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. पोलिसांनी ओमकार अनंत चव्हाण (वय २९),पूजा अनंत चव्हाण, अनंत माधव चव्हाण, विनायक माधव चव्हाण, रेखा विनायक चव्हाण (सर्व रा. कलावती निवास, सदाशिव पेठ, पुणे ) यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

# प्रस्तावित जलप्रशुल्क दरवाढीविरोधात एकत्र या; ५ जूनपूर्वी हरकती नोंदवा-आ.पाटील

**कोल्हापूर, ता. ३१ (प्रतिनिधी)**

**महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने (एमडब्ल्यूआरआरए) शेती व औद्योगिक वापरासाठीच्या पाणी दरात वाढ करण्याबरोबरच नदीपात्रातून शेतीसाठी उपसा करण्यात येणाऱ्या पाण्याच्या मोजणीसाठी मीटर बसविण्याचा मसुदा ठोक जलप्रशुल्क प्रस्ताव व मसुदा ठोक जलप्रशुल्क निकष (२०२६–२९) जाहीर केला आहे. या प्रस्तावामुळे शेतकरी, उद्योग, ग्रामपंचायतींच्या नळपाणी पुरवठा योजना आणि सर्वसामान्य नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडणार असल्याची चिंता व्यक्त करत आमदार सतेज पाटील यांनी या प्रस्तावाला विरोध दर्शविला. ग्रामपंचायती, महानगरपालिका, शेतकरी संघटना, सहकारी संस्था, उद्योग आणि नागरिकांनी ५ जूनपूर्वी हरकती नोंदवाव्यात, असे आवाहन त्यांनी पत्रकार परिषदेत केले.**

आ. पाटील म्हणाले, राज्यातील शेती क्षेत्र आधीच नैसर्गिक आपत्ती, वाढता उत्पादन खर्च आणि विविध प्रशासकीय अडचणींचा सामना करत आहे. अनेक भागांत महापुरामुळे शेती पंपावरील वीज मीटर खराब झाले असून त्यांची बदली करण्याचे प्रस्ताव अद्याप महावितरणकडे प्रलंबित आहेत. अशा परिस्थितीत पाण्याच्या वापरासाठी स्वतंत्र मीटर बसविण्याची अट शेतकऱ्यांसाठी आणखी एक अडथळा निर्माण करणारी ठरेल.

या धोरणाचा फटका ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींच्या नळपाणी पुरवठा योजनांनाही बसणार आहे. पाणी दरवाढीमुळे या योजनांच्या खर्चात वाढ होऊन स्थानिक स्वराज्य संस्थांवरील आर्थिक ताण वाढेल. परिणामी या खर्चवाढीचा परिणाम अप्रत्यक्षपणे सर्वसामान्य नागरिकांवर होण्याची शक्यता आहे.

प्राधिकरणाने साखर कारखाने, कोजन प्रकल्प आणि इतर उद्योगांसाठी पाण्याचा दर १९.८० रुपयांवरून २७ रुपये प्रति घनमीटर करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. तसेच डिस्टिलरी, मिनरल वॉटर, स्पिरीट व अल्कोहोल निर्मिती उद्योगांसाठीही मोठी दरवाढ प्रस्तावित करण्यात आली आहे. त्यामुळे उद्योगांच्या उत्पादन खर्चात वाढ होऊन त्याचा परिणाम रोजगार, गुंतवणूक आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होऊ शकतो, असे त्यांनी सांगितले.

शासनाने या प्रस्तावाचा फेरविचार करावा आणि संबंधितांनी आपल्या हरकती व सूचना ५ जूनपूर्वी mwrramwrra.in अथवा mwrralibraryyahoo. co. in या ई–मेलवर पाठवाव्यात, असे आवाहन आ. पाटील यांनी केले. या पत्रकार परिषदेला विक्रांत पाटील–किणीकर, माजी आमदार राजीव आवळे, जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष शशिकांत खोत, गोकुळचे संचालक प्रकाश पाटील, पंचायत समिती सदस्य रवी पाटील, नगरसेवक राहुल माने, अमर पाटील, विलास पाटील आदी उपस्थित होते.

## रत्नागिरीत येत्या चार दिवसात तुरळक पावसाची शक्यता

**रत्नागिरी,ता.३१–**

**रत्नागिरी जिल्ह्यात येत्या चार दिवसांत तुरळक पावसाची शक्यता असली, तरी पण मोसमी पाऊस येत्या १० जूनपर्यंत राज्यात येणार नसल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे.**

हवामानशास्त्र केंद्राने येत्या ४ दिवसांचा हवामानाचा अंदाज दिला आहे. त्यानुसार येत्या चार दिवसांत दुपारी, संध्याकाळी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट, वादळ, मध्यम पाऊस आणि ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाचे सोसाट्याचे वारे वाहणार आहेत.


असे असले, तरी किमान १० जूनपर्यंत राज्यातील बहुतांश भागात मोसमी पावसाच्या आगमनाची शक्यता नाही. सध्या राज्यातील हवामानात बदल होण्यास सुरुवात झाली आहे, आणि १ जूनपासून सुरू होणाऱ्या आठवड्यात हवामानात अजून बदल होईल.

# इराणमध्ये कोसळलेले अमेरिकन एफ-१५ चीनच्या क्षेपणास्त्राने पाडले?

**वॉशिंग्टन,ता.३१–**

**इराणच्या नैऋत्य भागात गेल्या महिन्यात कोसळलेल्या अमेरिकन एफ–१५ लढाऊ विमानाबाबत एका अहवालानुसार, या विमानाला चीननिर्मित खांद्यावरून डागल्या जाणाऱ्या क्षेपणास्त्राने लक्ष्य करण्यात आले असावे. तसेच संघर्षाच्या काळात चीनने इराणला अतिरिक्त लष्करी मदतही पुरवली असण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.**

अहवालानुसार, या मदतीमध्ये स्टेल्थ विमान शोध तंत्रज्ञान आणि लांब पल्ल्याच्या रडार प्रणालींचा समावेश असू शकतो.अमेरिकन अधिकाऱ्यांच्या मते, या प्रणालींच्या सहाय्याने इराणला एफ–१५ई स्ट्राइक ईगलसारख्या आधुनिक लढाऊ विमानांचा मागोवा घेणे शक्य झाले असावे. त्यावेळी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी विमानाला खांद्यावरून डागल्या जाणाऱ्या क्षेपणास्त्राने पाडण्यात आल्याचे म्हटले होते. मॅनपॅड्स ही लहान, वाहून नेता येणारी क्षेपणास्त्र प्रणाली असते. ती खांद्यावरून डागली



जाते आणि कमी उंचीवर उड्डाण करणाऱ्या विमानांना लक्ष्य करण्यासाठी वापरली जाते.

विमान कोसळल्यानंतर दोन्ही क्रू सदस्यांच्या शोधासाठी तब्बल ३६ तासांचे मोठे शोध आणि बचाव अभियान राबवण्यात आले.अपघातापूर्वी दोघांनीही इजेक्ट होऊन आपला जीव वाचवला होता. पेंटागॉनच्या माहितीनुसार, वैमानिकाची सुमारे सात तासात सुरक्षित सुटका करण्यात आली. मात्र दुसरे अधिकारी, वेपन्स सिस्टिम्स ऑफिसर, यांची सुटका करण्यासाठी जवळपास दोन दिवस लागले. ते इराणमधील झाग्रोस पर्वतरांगांमध्ये लपून बसले होते. त्यानंतर त्यांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले.

एप्रिल महिन्यात हे लढाऊ विमान नेमके कसे कोसळले, याचा तपास अमेरिकन अधिकारी अजूनही करत आहेत. अहवालानुसार, जर हे सिद्ध झाले की, विमान शत्रूच्या हल्ल्यामुळे पाडण्यात आले होते, तर अनेक दशकांतील ही पहिलीच अशी घटना ठरेल. अहवालात म्हटले आहे की, चीनने इराणला हे लष्करी साहित्य नेमके कधी पुरवले, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र, इराण खरोखरच चिनी शस्त्रास्त्रांचा वापर करत असल्याचे सिद्ध झाल्यास अमेरिका–चीन संबंधांमध्ये आणखी तणाव निर्माण होऊ शकतो.

# ‘गोकुळ’च्या उत्पादनांचा दर्जा व गुणवत्ता कायम

## अफवांवर विश्वास न ठेवण्याचे संजयकुमार सुद्रिक यांचे आवाहन

कोल्हापूर,ता.३१(प्रतिनिधी)–

**गोकुळचे दूध व दुग्धजन्य पदार्थ भारतीय मानकांनुसार उच्चदर्जाचे व गुणवत्तापूर्ण आहेत. गोकुळच्या उत्पादनाच्या गुणवत्तेचा व दर्जाचा हलाल प्रमाणपत्राशी कोणताही संबंध नसल्याचे प्राधिकृत अधिकारी मंडळाचे अध्यक्ष संजयकुमार सुद्रिक यांनी स्पष्ट केले आहे.**

गोकुळच्या गुणवत्ता व दर्जा यामध्ये कधीही तडजोड करण्यात आलेली नाही. दूध उत्पादक शेतकऱ्यांची गोकुळ प्रती असणारी निष्ठा आणि गोकुळच्या दूध व दुग्धजन्य पदार्थावर ग्राहकांचा असलेला विश्वास यामध्ये कोठेही कमी आलेली नाही.त्यामुळे ग्राहकांनी कोणत्याही प्रकारच्या अफवांवर किंवा दिशाभूल करणाऱ्या माहितीवर विश्वास ठेवू नये व गोकुळवरती आपले प्रेम, आपुलकी आणि जिव्हाळा याला कोठेही तडा जाऊ देणार नाही याची खात्री बाळगावी. तसेच कोणीही चुकीच्या व अपुऱ्या माहितीच्या आधारे गोकुळच्या दूध व दुग्धजन्य पदार्थ याबाबत गैरसमज पसरवू नयेत, असे आवाहन करण्यात येत आहे.

गोकुळचे प्राधिकृत अधिकारी मंडळाचे अध्यक्ष संजयकुमार सुद्रिक यांनी सांगितले की, गेल्या दोन दिवसापासून विविध समाजमाध्यमांमध्ये गोकुळच्या दूध व दुग्धजन्य उत्पादनाबाबत अपुऱ्या व चुकीच्या माहितीच्या आधारे ग्राहकांमध्ये गैरसमज निर्माण होणारे संदेश पसरवले जात आहेत. त्यामुळे



गोकुळ ब्रँड बाबत ग्राहकांमध्ये संभ्रम निर्माण होण्याची शक्यता आहे.

त्यास अनुसरून आवाहन करण्यात येते की गोकुळ ही १९६३ पासून शेतकऱ्यांनी, दूध उत्पादक व ग्राहकांसाठी उभी केलेली सहकारी संस्था असून ती ग्राहकांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण दूध आणि दुग्धजन्य पदार्थ पुरवीत आहे. गोकुळने २२००० आणि यांसारखी गुणवत्ता व अन्नसुरक्षा सुनिश्चित करणारे सर्व भारतीय मानके व प्रमाणकांचे काटेकोर पालन करून उत्तम प्रतीचे दूध व दुग्धजन्य पदार्थ उपलब्ध करून देते.त्यामध्ये दूध उत्पादक व ग्राहक यांच्यातील परस्पर विश्वास, आपुलकी व जिव्हाळा हेच गोकुळचे बळ आहे.गोकुळ त्यांच्या कोणत्याही उत्पादनात गुणवत्ता व दर्जाबाबत कधीही तडजोड करत नाही. हलाल प्रमाणपत्र हे केवळ आखाती देशांमध्ये निर्यातीसाठी त्या देशांची आवश्यकतेनुसार घेण्यात आलेले होते. त्या प्रमाणपत्राचा आणि गोकुळच्या दूध व दुग्धजन्य उत्पादनाच्या गुणवत्ता व दर्जाचा कोणताही संबंध नाही, असे हि त्यांनी स्पष्ट केले.

काही घटक चुकीच्या किंवा अपुऱ्या माहितीच्या आधारे समाज माध्यमावर गोकुळबाबत संभ्रम निर्माण करणारे संदेश प्रसारित करत आहेत. ही बाब खेदजनक असून गोकुळच्या प्रतिमेला बाधा पोहोचवणारी आहे. अशा घटकांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी चुकीच्या व अपुऱ्या माहितीच्या आधारे गोकुळ विषयी संभ्रम निर्माण करणारे संदेश पसरवू नयेत. वस्तुस्थितीचा योग्य विचार करूनच माहिती प्रसारित करावी. तसेच यापूर्वी प्रसारित करण्यात आलेले चुकीचे व संभ्रम निर्माण करणारे संदेश तात्काळ हटवावेत अन्यथा अशा गैरसमज पसरवणारे संदेश व माहितीमुळे गोकुळच्या ब्रँडला धक्का बसल्यास व बदनामी झाल्यास त्याबाबत कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे सुद्रिक यांनी सांगितले.

यावेळी प्राधिकृत अधिकारी मंडळाचे अध्यक्ष संजयकुमार सुद्रिक, सदस्य प्रदीप मालगावे, सुनिल धायगुडे, सागर बलकवडे, चंद्रकांत परूळेकर, डॉ.योगेश गोडबोले, अनिल चौधरी, प्रदीप पाटील तसेच संघाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



तळसंदे येथे इंडिया एलीट एज्युकेशन अवॉर्ड प्रदान करताना ऋतुराज पाटील, समवेत केदार के.सहस्त्रबुद्धे, डॉ.ए.के.गुप्ता व इतर मान्यवर.

## डी.वाय.पाटील टेक्निकल कॅम्पस्‌चा राष्ट्रीय स्तरावर गौरव

वारणानगर,ता.३१(प्रतिनिधी)–

**डी.वाय.पाटील एज्युकेशन सोसायटीच्या येथील डी.वाय. पाटील टेक्निकल कॅम्पस्‌च्या उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरीचा राष्ट्रीय स्तरावर गौरव करण्यात आला आहे. बेंगळुरू येथे झालेल्या इंडिया एलीट एज्युकेशन अवॉर्ड प्रसाद सोहळ्यात ‘वर्षातील उत्कृष्ट आणि विश्वसनीय अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय म्हणून महाविद्यालयाला सन्मानित करण्यात आले.**

विश्वस्त ऋतुराज पाटील यांनी या पुरस्काराबद्दल सर्व सहकाऱ्यांचे अभिनंदन करत महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेचे हे फलित असल्याचे सांगितले. संस्थेची गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रणाली, उत्कृष्ट प्रशासन, दर्जेदार प्लेसमेंट आणि आधुनिक पायाभूत सुविधा या क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन पुरस्कार देण्यात आला आहे.महाविद्यालयात झालेल्या विशेष समारंभात विश्वस्त ऋतुराज पाटील यांनी या पुरस्काराबद्दल आनंद व्यक्त करताना सर्व सहकाऱ्यांचे अभिनंदन केले. यावेळी डॉ.ए.के.गुप्ता,डॉ. सतीश पावसकर,डॉ.एस.बी. पाटील, प्रा. राजेंद्र एस.पवार,केदार सहस्त्रबुद्धे, जे.ए.पवार आदी उपस्थित होते.

# चांदी कारागीरांनी पीएम विश्वकर्मा योजनेचा लाभ घ्यावा

## पो.नि.सत्यवान हाके; हुपरीत पीएम विश्वकर्मा प्रशिक्षण केंद्राचा शुभारंभ

हुपरी,ता.३१(वार्ताहर)–

**‘हुपरी परिसरातील चांदी कारागीरांनी केंद्र सरकारच्या पी एम विश्वकर्मा योजनेतून प्रशिक्षण घेऊन आपली प्रगती करून घ्यावी,’असे आवाहन हुपरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सत्यवान हाके यांनी केले.**

येथील चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे महाविद्यालयात जेम्स अँड ज्वेलरी एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिल व हुपरी चांदी हस्तकला उद्योग विकास फाऊंडेशनच्यावतीने सुरू करण्यात आलेल्या पीएम विश्वकर्मा सोनार काम प्रशिक्षण केंद्राच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य अरुण शिंदे हे होते. यावेळी बोलताना प्रा.शिंदे म्हणाले, ‘कोणत्याही उद्योगात आधुनिक तंत्राची जोड



हुपरी येथे पीएम विश्वकर्मा प्रशिक्षण केंद्राच्या शुभारंभप्रसंगी मशिनरी उत्पादकांचा सत्कार करताना पोलीस निरीक्षक सत्यवान हाके, प्र.प्राचार्य अरुण शिंदे व इतर.

दिल्याशिवाय प्रगती होत नाही. चांदी उद्योजकांनी नवीन तंत्राची कास धरणे गरजेचे असून, चांदी उद्योग विकास फाऊंडेशन त्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहे,ही कौतुकास्पद बाब आहे.’

याप्रसंगी हस्तकला उद्योगाला मशीनरीची जोड देऊन गती देणाऱ्या आदिनाथ मुंगले, राजेंद्र मुंगले, श्रीधर सुतार व नितीन सुतार या मशिनरी उत्पादकांचा शिवाजी विद्यापीठाचे प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला चेतन देशपांडे यांनी स्वागत केले. प्रास्ताविकात मोहन खोत यांनी फाऊंडेशनच्या कामाचा आढावा घेतला, तर जी. जे. ई. पी. सी.चे प्रतिनिधी कौशिक एस.व्ही.यांनी पीएम विश्वकर्मा योजनेची विस्तृत माहिती दिली. मानसिंगराव देसाई व बाळासाहेब चोपडे यांनीही मनोगत व्यक्त केले.यावेळी फाऊंडेशनचे संचालक जितेंद्र देशमुख, शामराव शिंदे, विलासराव जाधव, अजित पाटील, संदीप अडसूळे, चांदी माल उत्पादक संघाचे अध्यक्ष प्रकाश पाटील, मराठा समाज अध्यक्ष साताप्पा गायकवाड, वैभव लायकर, सुदर्शन खाडे, रवी रावळ, योगेश चौगुले आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन राजेंद्र माळी यांनी मानले तर आभार अजित पाटील यांनी मानले.

# आजपासून जिल्हाभर ‘स्वच्छ गाव, सुरक्षित जलवायू’ मोहीम

कोल्हापूर,ता.३१(प्रतिनिधी)–

**जागतिक पर्यावरण दिनानिमित्त कोल्हापूर जिल्हा परिषद जिल्हाभर विविध पर्यावरणपूरक उपक्रम राबविणार असून, १ ते ५ जून या कालावधीत ‘स्वच्छ गाव, सुरक्षित जलवायू’ ही विशेष मोहीम ग्रामीण भागात आयोजित करण्यात आली आहे. जलशक्ती मंत्रालयाच्या पेयजल व स्वच्छता विभागामार्फत तसेच पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाच्या सहकार्याने ही मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेत नागरिकांनी सक्रिय सहभाग घेऊन पर्यावरण संवर्धन आणि स्वच्छतेच्या चळवळीला बळ द्यावे, असे आवाहन जिल्हा परिषद अध्यक्षा शिल्पा खोत यांनी केले आहे.**

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा–२ अंतर्गत प्लास्टिक कचरा व्यवस्थापनातील ‘४ आर’ तसेच ग्रे–वॉटर व्यवस्थापनातील या संकल्पनांचा प्रचार–प्रसार केला जाणार आहे. ‘कचऱ्यापासून संपत्ती’ परिपत्र अर्थव्यवस्था किचन गार्डन, वृक्षारोपण, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन या विषयांवर विशेष भर दिला जाणार आहे. घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ संदर्भात ग्रामीण भागात व्यापक जनजागृती करण्यात येणार आहे. मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्या घटकांची ओळख, कचऱ्याचे वर्गीकरण, घराघरातून कचरा संकलन, जुने कचरा डेपो नोंदणी यासंदर्भातील मोहिमा राबविण्यात येणार आहेत. मोहिमेदरम्यान प्रभात फेरी, चित्रकला स्पर्धा, नुक्कड नाटके, स्वच्छता अभियान, विशेष ग्रामसभा तसेच ‘एक पेड़ माँ के नाम’या उपक्रमांतर्गत वृक्षारोपण मोहीम आयोजित करण्यात येणार आहे. ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त होणाऱ्या विशेष ग्रामसभांमध्ये मोहिमेचा आढावा घेण्यात येणार असून स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि हवामान कृतीबाबत ग्रामस्थांमध्ये जनजागृती केली जाणार आहे. मोहिमेंतर्गत राबविण्यात येणाऱ्या सर्व उपक्रमांची माहिती SBM(G)-IMIS पोर्टलवर अपलोड करण्यात येणार असल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.जॅसमिन यांनी दिली.

# ४००० किमी धावून १२ किल्ल्यांची केली सफर

## आसमा कुरणेच्या कार्याला पन्हाळकरांचा सलाम

बोरपाडळे,ता.३१(प्रतिनिधी

**आज कोण दुचाकीने तर कोण सायकलने राज्याची अथवा देशाची सफर करतो. मात्र एखाद्या मुलगीने तब्बल ४००० किलोमीटरचा प्रवास धावून करणे ही एक कौतुकाचीच बाब म्हणावी लागेल. असाच एक आगळा वेगळा विक्रम कोल्हापूरच्या सोमवार पेठ येथे राहणाऱ्या आसमा कुरणे या मुलीने करून दाखवला आहे.**

मराठा साम्राज्यातील युनेस्कोच्या यादीत समाविष्ट झालेल्या १२ गड किल्ल्यांची सफर आसमाने धावत पूर्ण केल्याबद्दल तिच्या या असामान्य कार्याला पन्हाळकराच्यावतीने सलाम करण्यात आला आहे. कोल्हापुरातील आसमाने जानेवारी महिन्यात जिजामाता जयंती दिवशी आपली मोहीम सिंधुदुर्ग किल्ल्यापासून सुरू केली. असे ती



पन्हाळा येथे आसमा कुरणेचा सत्कार करताना श्रीकांत कांबळे, आबिद मोकाशी यांच्यासह इतर प्रमुख मान्यवर.

मराठा साम्राज्यातील जे १२ किल्ले जागतिक वारसा यादीत समाविष्ट झालेले आहेत. या किल्ल्यांना तिने भेट देत छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास व मराठा साम्राज्याची ओळख संपूर्ण जगाला व्हावी यासाठी ही वेगळी मोहीम तिने सुरू केली. तब्बल चार महिन्या नंतर ती आज पन्हाळा गडावर पोहोचली आणि या ठिकाणी तिने आपल्या मोहिमेची सांगता केली. पन्हाळगडावर तिचे बाजीप्रभू पुतळा येथे स्वागत करण्यात आले. त्यानंतर पन्हाळगडावरील शिव मंदिर येथे तिने दर्शन घेतले. यानंतर तिचा नगरपरिषदेसमोर समस्त पन्हाळकरांच्यावतीने तिच्या या असामान्य कार्याचा गौरव करण्यात आला. याचबरोबर कोल्हापुरातून आसमा बरोबर धावत आलेल्या निहाल नदाफ व पृथ्वीराज संकपाळ यांचा देखील यावेळी सन्मान करण्यात आला.

यावेळी कोच शामराव मासाळ, सुनील यादव, शुभम पाटील, सचिन चव्हाण,अजमल कुरणे, विनायक खोत,जयश्री खोत, मयुरी टकले, भारतीय दलित महासंघाचे प्रदेशाध्यक्ष श्रीकांत कांबळे, मुस्लिम ओबीसी संघटनेचे अध्यक्ष आबिद मोकाशी, तहसीलदार माधवी जाधव–शिंदे, गटविकास अधिकारी सोनाली माडकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ शैलेंद्र गायकवाड, आरोग्य कर्मचारी तसेच संयोगिता राजे छत्रपती , संभाजी राजे छत्रपती, जिल्हाधिकारी राकेश राठोड, अमोल येडगे यांचे मार्गदर्शन लाभले.

# रुपेश कांबळे यांना पुरस्कार जाहीर

शिरदवाड,ता.३१(वार्ताहर)



**राज्य परिवहन महामंडळ मार्फत उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना देण्यात येणारा लालपरी गौरव रत्न पुरस्कार इचलकरंजी आगारात चालक तथा वाहक पदावर कार्यरत असणाऱ्या शिरदवाड येथील रूपेश प्रकाश कांबळे यांना प्राप्त झाला असून त्याबद्दल त्यांचे कौतुक होत आहे.**

१ जून २०२६ रोजी विभागीय कार्यालय पुणे येथील सभागृह (मीटिंग हॉल) येथे दुपारी दोन वाजता होणाऱ्या कार्यक्रमात लालपरी गौरव रत्न पुरस्कार देण्यात येणार आहे. रुपेश प्रकाश कांबळे इचलकरंजी आगारात अत्यंत आदर्शवत काम करीत असून कामावर असताना इचलकरंजी ते छत्रपती संभाजीनगर मार्गावर धावणाऱ्या एसटी बसमध्ये एका महिला प्रवाशांचे सोन्याचे दागिने तसेच रोख रक्कम असणारी पर्स त्यांना मिळाली ती प्रामाणिकपणे परत दिली होती त्याबद्दल त्यांचे कौतुक करण्यात येवून त्यांचा सत्कार करण्यात आला होता. त्यांना पुरस्कार प्राप्त झाल्यामुळे परिसरातून त्यांचे कौतुक होत आहे.

## छ.शिवाजी हायस्कूलमध्ये अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी

सैनिक टाकळी,ता.३१(प्रतिनिधी)–

**येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल येथे पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने विद्यालयात विशेष अभिवादन आणि प्रतिमा पूजन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.**

संस्थेचे सचिव राजेश पाटील यांच्या हस्ते अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले. याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक विनोद पाटील, ज्येष्ठ शिक्षक उदय पाटील, सयाजी पाटील, वैभव पाटील, तुकाराम खोत प्रामुख्याने उपस्थित होते. प्रतिमेचे पूजन करताना सर्वांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या लोककल्याणकारी कार्याचे स्मरण केले.





श्रीहरी
शुक्रवार, ता. २९/०५/२०२६ पासून
रोज ३ खेळ, दु. १ व ४ वाजता
ओरिजीनल हिंदी इचलकरंजीत प्रथमच
मधुर मिलन
सायं. ७ वा.
तेरी चाहत
A प्रौढांसाठी


श्रीदत्त
शुक्रवार, ता. २९ पासून
रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
ऑकल विस्टा
A फक्त प्रौढांसाठी A















# पंढरीत महत्त्वाच्या मार्गावरील उघड्या चेंबरकडे दुर्लक्ष

## अपघाताची शक्यता; दुरूस्ती करून चेंबर बंदिस्त करण्याची गरज

पंढरपूर,ता.३१(प्रतिनिधी)-

**येथील भाई राऊळ पुतळा ते तुळशी वृंदावन व रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या मार्गावर रस्त्याला लागूनच असलेला मोठा चेंबर उघडा आहे. या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतुकीची रहदारी असते त्यामुळे रस्त्याकडेला असलेले हे उघडे चेंबर जीवघेण्या अपघाताला आमंत्रण तर देत नाही ना असे म्हणण्याची वेळ आली आहे. महत्त्वाच्या मार्गावरील या उघड्या चेंबरला दुरुस्त करण्यासाठी नगरपरिषद प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे.**

याच मार्गावर रेल्वे स्टेशन तसेच प्रांत कार्यालय, भूमी अभिलेख कार्यालय, रिमांड होम, सैनिक होस्टेल, तलाठी कार्यालय, तुळशी वृंदावन आदी महत्त्वाची कार्यालय तसेच इतर ठिकाणे असून या ठिकाणी मोठ्या



**पंढरपूर: रेल्वे स्टेशन मार्गावरील रस्त्याच्या कडेला असणारे चेंबर उघडेच असल्याने अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे.**

प्रमाणात नागरिकांची ये-जा सुरू असते. अनेक जण वाहने घेऊन येतात तर अनेक जण चालत पायी या ठिकाणी पोहोचतात. अशातच रस्त्याला चिटकून असलेला हा भला मोठा चेंबर उघडा असल्याने अनावधानाने यामध्ये जर कोणी पादचारी अथवा वाहनधारक गेल्यास जीवघेणा अपघाताची शक्यता नाकारता येत नाही.

सध्या अधिक महिना तसेच जुलैमध्ये असलेल्या आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी हे शहरातील विविध मार्गाची तसेच गर्दीचे ठिकाणी भेट देऊन पाहणी करत आहेत. अपघाताचे ठिकाण, वाहतुकीची कोंडी होऊ नये यासाठी सूचना करत आहेत. परंतु शासकीय कार्यालयाकडे जाणाऱ्या या रस्त्यावरील चेंबर मात्र कोणाच्याही नजरेला येत नाही का असा प्रश्न आता वाहनधारकांतून उपस्थित केला जात आहे.

> रेल्वे स्टेशनकडून पंढरपूर शहरात जाणारा हा मार्ग असून या मार्गावर अनेक वेळा वाहतुकीची कोंडी निर्माण होते. फुटपाथवरून पायी चालणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. या फुटपाथवरील हा चेंबर उघडा असून रात्रीच्यावेळी पुरेसा उजेड या ठिकाणी नसतो. काही वेळा या मार्गावर लाईट नसते त्यामुळे अनावधानाने जर समोरून माणूस चालत आला तर सरळ थेट खड्ड्यात पडल्याशिवाय राहणार नाही. प्रशासन अपघात होण्याची वाट पाहतोय का?
>
> **-नंदकुमार देशपांडे, स्थानिक रहिवासी**

तीर्थक्षेत्र असलेल्या या शहराला मोठ्या प्रमाणात निधी मिळतो परंतु अशा उघड्या चेंबरला बंदिस्त करण्यासाठी व झाकण लावण्यासाठी प्रशासन कोणत्या निधीची वाट पाहतेय असा संतप्त सवालही शहरातील नागरिकांतून व्यक्त होताना दिसतो. सध्या लहान मुलांना मे महिन्याची सुट्टी लागली असून स्विमिंग पूल येथे पोहोण्याचा आनंद घेण्यासाठी या चेंबरच्या समोरुन आतमध्ये जाण्यासाठी मार्ग आहे. अनेक जण या जलतरण केंद्रात दुचाकी वाहने घेऊन येतात. वाहन बाहेर घेताना उजव्या बाजूने जर वेगाने मोठे वाहन आल्यास दुचाकी स्वार हा आपले वाहन तसेच पुढे घेऊन जातो अशावेळी या उघड्या चेंबरमध्ये जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या सर्व बाबींचा विचार करून या उघड्या चेंबरला लवकरात लवकर झाकण लावून बंदिस्त करावे,अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# शिराळा आगाराचे वेळापत्रक कोलमडले

## गाड्या नादुरूस्तीसह अचानक बस फेरी रद्द होण्याचे प्रकार

चांदोली,ता.३१(वार्ताहर)-

**सध्या शाळा, महाविद्यालयांना सुट्ट्या असल्याने एसटीवरील प्रवाशांचा ताण वाढला आहे. मात्र ही समस्या दूर करण्यासाठी एसटी प्रशासन अपयशी ठरत असून अचानक गाड्या नादुरुस्त असणे, प्रवाशांना न कळवता अचानक बस रद्द करणे असे प्रकार होत आहेत तसेच शिराळा आगारातून निर्धारित वेळेत गाड्या सुटत नसल्याने शिराळा आगाराचे वेळापत्रक ऐन सुट्टीच्या हंगामात कोलमडल्याचे पाहायला मिळत असून त्याचा त्रास प्रवाशांना सहन करावा लागत आहे.**



शिराळा तालुक्याच्या पश्चिम भागातील शिराळा ते मणदुर मार्गावरील बहुतांशी प्रवाशी हे एस.टी ने प्रवास करत असतात तसेच या डोंगरदऱ्यातील रानमेवा विकण्यासाठी जाणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे मात्र एसटी वेळेत नसल्याने त्यांना लांब पल्ल्याच्या वाहतुकीसाठी त्रास सहन करावा लागत आहे तसेच रात्री शिराळा आगारातून मणदुर येथे मुक्कामी असणारी एसटी उशीरा येत आहे तर काही वेळेला फेऱ्या अचानक रद्द केल्या जात आहेत त्यामुळे डोंगरदऱ्यातून रानमेवा विक्रीसाठी जाणाऱ्या वाड्यावस्त्यांवरील नाकरिकांना रात्री अपरात्री आपल्या गावापर्यंत पोहचताना अनेक संकटांना सामोरे जावे लागत आहे तसेच शिराळा ते मणदुर मार्गावरील एसटी उशीरा धावत असल्याने या मार्गावरील प्रवाशांना तासन्तास ताटकळत बसावे लागत असल्याने त्यांच्यातुन नाराजीचे सुर उमटत आहेत.

उन्हाळी सुट्ट्यांचा हंगाम संपण्याच्या मार्गावर आहे त्यामुळे परगावी गेलेले शालेय विद्यार्थी आपल्या गावाकडे परतू लागले आहेत मात्र एसटी वेळेत येत नसल्याने त्यांना व त्यांच्या पालकांनाही त्रास सहन करावा लागत आहे तसेच शिराळा मणदुर मार्गाविरिल कोकरुड, चरण, आरळा या ठिकाणी आठवडा बाजार भरत असतात त्यामुळे बाजारादिवशी एसटीकडे प्रवाशांचा जास्त कल असतो मात्र कमी व मर्यादित गाड्या या मार्गावर धावत असल्याने एसटीमध्ये प्रवाशांची गर्दी पहावयास मिळते तर काही वेळेला जागेअभावी वादाचे प्रसंग उद्भवतात तर काहींना खासगी गाडीचा आधार घ्यावा लागत आहे त्यामुळे संबधित शिराळा आगाराने शिराळा ते मणदुर मार्गावरील एसटी फेऱ्यांमध्ये वाढ करण्याबरोबरच ठरलेल्या वेळेत गाड्या सोडाव्यात व प्रवाशांची अडचण दूर करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# सांगली-सातारा विधानपरिषदेसाठी शिवसेनेतर्फे तानाजी पाटील यांचा अर्ज दाखल

सांगली,ता.३१(प्रतिनिधी)-

**सांगली-सातारा विधानपरिषदेसाठी शिवसेनेच्यावतीने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक तानाजी पाटील यांनी शनिवारी उमेदवारी अर्ज दाखल केला. या निवडणुकीसाठी आत्तापर्यंत एकमेव अर्ज दाखल झाला असून उमेदवारी अर्ज भरण्याची सोमवारअखेर मुदत आहे. भाजप आणि महाविकास आघाडीकडून आणखी उमेदवारांचे अर्ज दाखल होण्याची शक्यता आहे.**

जिल्हाधिकारी कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. मैनाक घोष यांच्याकडे शिवसेनेच्यावतीने तानाजी भगवान पाटील (पत्ता रा. क्रांतीसिंहनगर, पुजारवाडी, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली) यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. विधानपरिषदेसाठी आत्तापर्यंत एकमेव अर्ज दाखल झाला आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख सोमवार, ता.१ जून असून, उमेदवारी अर्जांची छाननी मंगळवार (ता. २ जून) रोजी होणार आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघासाठी उमेदवारी अर्ज भरण्यास अवघा एक दिवस राहिला आहे. निवडणुकीसाठी राजकीय वातावरण तापले असले तरी महायुती आणि महाविकास आघाडीच्या उमेदवारीचा सस्पेन्स कायम आहे. भाजपकडून सातारा आणि सांगली जिल्ह्यातून इच्छुकांची संख्या अधिक आहे. उमेदवारी जाहीर झालेली नाही. महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी शरद पवार पक्षाला जागा सोडण्यात आली आहे. शरद पवार राष्ट्रवादीकडून माजी मंत्री बाळासाहेब पाटील यांचे नाव पुढे आले आहे. शिवसेनेकडून बंडखोरीचा पवित्रा घेत जिल्हा बँकेचे संचालक तानाजी पाटील यांनी अर्ज दाखल केला. त्यामुळे महाविकास आघाडी स्वतंत्र उमेदवार देणार की सेनेला साथ दिली जाणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, शिवसेनेसह राष्ट्रवादी काँग्रेस व इतर पक्षातील मित्र माझ्या मदतीला येतील, असा विश्वास जिल्हा बँकेचे संचालक तानाजी पाटील यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर व्यक्त केला. जिल्हा परिषद सदस्य, सभापती, नगरसेवकांच्या मागणीप्रमाणे पक्षाचे प्रमुख व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे उमेदवारीची मागणी केली आहे. ते निर्णय घेतील, तो आम्ही मान्य करु, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# वडूज आगारातील विविध समस्या सोडवाव्यात

## भाजप ओबीसी सेलची मागणी

वडूज,ता.३१(वार्ताहर)-

**येथील आगाराच्या विविध समस्या सोडविण्याची मागणी भारतीय जनता पक्षाच्या ओबीसी सेल मोर्चाचे तालुका उपाध्यक्ष बापूराव हांगे यांनी केली आहे. तसेच याबाबत तातडीने कार्यवाही न झाल्यास श्री.हांगे यांनी आंदोलनाचा इशाराही दिला आहे.**

यावेळी तालुकाध्यक्ष अनिल माळी, युवकचे तालुकाध्यक्ष अक्षय थोरात आदी उपस्थित होते. याबाबत श्री.हांगे यांनी आगार प्रमुख नियमीतपणे आगारात निवासी नसतात, महिला कर्मचाऱ्यांकडून रात्री उशिरापर्यंत काम करून घेतले जाते. महिला विश्रांती कक्षाची झालेली दुरावस्था,कर्मचाऱ्यांना हक्काच्या रजा नाकारणे, ड्युटी वाटपात पक्षपात,आगारातील स्वच्छता व पिण्याच्या पाण्याची



**वडूज : निवासी नायब तहसिलदार महेश गायकवाड यांना निवेदन देताना बापूराव हांगे, अनिल माळी, अक्षय थोरवे.**

अपुरी सुविधा,कर्मचाऱ्यांना अपमानास्पद वागणूक,आगारातील अधिकारी गणवेशात नसणे आदी समस्या निवेदनात मांडल्या आहेत. तसेच याबाबत तातडीने कार्यवाही करावी अन्यथा १५ जून रोजी आगाराच्या प्रवेशद्वारात धरणे आंदोलन करण्याचा इशाराही दिला आहे.

याबाबत श्री.हांगे यांनी निवासी नायब तहसीलदार महेश गायकवाड, पोलीस निरीक्षक घनश्याम सोनवणे आदींना निवेदन दिले आहे. निवेदनावर अभिषेक खाडे,रोशन यादव, समर्थ खाडे, गणेश साबळे, विनोद सानप आदींच्या सह्या आहेत.

# सातारा शहरात रस्ता रुंदीकरण मोहीम राबवावी-रवी पवार

सातारा,ता.३१(प्रतिनिधी)-

**सातारा शहरात विविध ठिकाणी रस्ता रुंदीकरण करण्यासाठी विशेष अतिक्रमण मोहीम राबवा,अशी मागणी स्वीकृत नगरसेवक रवी पवार यांनी नगराध्यक्ष अमोल मोहिते यांच्याकडे केली.**

ज्या पद्धतीने समर्थ मंदिर ते बोगदा या मार्गावर रस्ता रुंदीकरण मोहीम राबविण्यात आली, त्याच धर्तीवर शिवतीर्थ ते साईबाबा मंदिर ते जकात नाका या परिसरातही रस्ता रुंदीकरण मोहीम राबवावी, अशी मागणी नगरसेवक पवार यांनी केली आहे. नगराध्यक्ष अमोल मोहिते आणि उपनगराध्यक्ष दत्ता बनकर यांच्याकडे त्यांनी याबाबत निवेदन देत साईबाबा मंदिर परिसरातील वाढती वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. नगराध्यक्ष अमोल मोहिते आणि उपनगराध्यक्ष दत्ता बनकर हे नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी सतर्क आणि सकारात्मक भूमिका घेत असल्याचेही रवी पवार यांनी सांगितले.



अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल शहाजी पाटील यांचा सत्कार करताना प्रतीक पाटील.बाजूस कोअर कमिटी सदस्य.

# आयबीएफच्या अध्यक्षपदी शहाजी पाटील यांची निवड

ईश्वरपूर,ता.३१(प्रतिनिधी)-

**इस्लामपूर बिझनेस फोरम आयबीएफच्या अध्यक्षपदी शहाजी पाटील (चिकुर्डे) यांची तर उपाध्यक्षपदी स्वरूप साळुंखे आणि सुप्रिया पेठकर (ईश्वरपूर) यांची निवड करण्यात आली.पुढील दोन वर्षांच्या कालावधीसाठी ही निवड करण्यात आली आहे.**

मावळते अध्यक्ष विकास राजमाने यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत या निवडी करण्यात आल्या. राजारामबापू सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष व युवा उद्योजक प्रतीक पाटील यांच्या नेतृत्व व मार्गदर्शनाखाली इस्लामपूर बिझनेस फोरमची स्थापना केली आहे. यावेळी प्रतीक पाटील यांच्या हस्ते नूतन अध्यक्ष शहाजी पाटील, उपाध्यक्ष स्वरूप साळुंखे व सुप्रिया पेठकर यांचा सत्कार करण्यात आला. निवड बैठकीस मावळते अध्यक्ष विकास राजमाने, जयदीप पाटील, प्रवीण पाटील, विश्वजित पवार, धीरज भोसले, महेश ओसवाल, वैभव पाटील, राजू देसाई, मोहन जाधव, संग्राम पाटील, धर्मवीर पाटील, नगरसेविका पुष्पलता खरात, प्रवीण फल्ले आदी मान्यवर उपस्थित होते.

# मान्याचीवाडीत रेन वॉटर हार्वेस्टिंग उपक्रमाचा स्तुत्य निर्णय

ढेबेवाडी,ता.३१(प्रतिनिधी)-

**सातत्याने काही ना काही सामाजिक विकासाभिमुख कार्यात आघाडीवर असलेल्या मान्याचीवाडी (ता. पाटण) ने रेन वॉटर हार्वेस्टिंग उपक्रम राबवून सर्व घरांच्या छतावरील पावसाचे पाणी जमिनीत जिरवण्याचा स्तुत्य निर्णय घेत ग्रामस्थांनी कामे सुरू केली आहे.**

अल निनोच्या पर्जन्यमानावर परिणाम होणार असल्याचे तज्ञांकडून सांगितले जात असल्याने आता पावसाचा थेंब न थेंब अडवणे व जमिनीत जिरवणे हा एकच पर्याय याच विषयावर येथील ग्रामसभेत चर्चा झाली आणि मग छतावरील पावसाच्या पडणाऱ्या पाण्याचा थेंब न थेंब जमिनीच्या पोटात मुरवण्याचा निर्णय घेण्यात आला.

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी मान्याचीवाडी ग्रामपंचायतीने नेहमीच पुढाकार घेतला आहे. वृक्ष लागवड, वृक्ष संवर्धन याबरोबरच जलसंधारणाच्या कामातही या गावाने उल्लेखनीय काम केले आहे. तर आता यापुढे रेन वॉटर हार्वेस्टिंग करणाऱ्या घराचीच नोंद करण्याचा निर्णयही या गावाने घेतला आहे. गावात एकुण ११२ मिळकती आहेत. त्या मिळकतींच्या छतांचे एक लाख सहा हजार चौरस फूट क्षेत्रफळ असून, त्यातून कोट्यवधी लिटर पाणी जमिनीत मुरणार आहे. तर येथील ५२ शेतकऱ्यांनी आपल्या शेतात जलतारा प्रकल्प राबवले आहेत त्यातूनही लाखो लीटर पाणी जमिनीत जिरत आहे.

# मलकापूर हद्दीतील गटारांची दयनीय अवस्था

## पावसाळ्यापूर्वी गटारांची स्वच्छता करण्याची मागणी

कराड,ता.३१(प्रतिनिधी)-

**पावसाळा तोंडावर आलेला असताना मलकापूर (ता.कराड) हद्दीतील कोल्हापूर नाका ते थोरात मळा परिसरातील आशियाई महामार्गालगतच्या सेवा रस्त्यांशेजारी असलेल्या गटारांची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून या गटारांची साफसफाई करावी, अशी मागणी नगरसेवक भीमाशंकर माऊर यांनी मलकापूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.**

याप्रसंगी स्थानिक रहिवासी किशोर पाटील, केतन पाटील, दीपाली पाटील यांच्यासह नागरिक उपस्थित होते. नगरसेवक माऊर यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महामार्गालगतच्या अनेक ठिकाणी गटारे तुंबल्यामुळे सांडपाणी थेट सेवारस्त्यावर वाहत आहे. त्यामुळे वाहनधारक, पादचारी आणि स्थानिक नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. पावसाळ्यात ही परिस्थिती गंभीर होण्याची शक्यता आहे. रस्त्यावर पाणी साचल्यास अपघाताचा धोका निर्माण होऊ शकतो.

या संदर्भात गत महिन्यातही गटार साफसफाईची मागणी प्रशासनाकडे करण्यात आली होती. त्यावेळी सकारात्मक प्रतिसाद मिळाला असला तरी प्रत्यक्षात कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.परिसरातील नागरिकांकडून सातत्याने विचारणा होत असल्याचे त्यांनी नमूद केले.पावसाळ्यात गटारांमधील सांडपाणी आणि पावसाचे पाणी सेवा रस्त्यावर साचल्यास वाहतुकीस अडथळा निर्माण होण्याबरोबरच दुर्गंधी, अस्वच्छता आणि आरोग्याच्या समस्याही वाढू शकतात. संबंधित विभाग आणि भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाला तातडीने सूचना देऊन गटार साफसफाईची मोहीम राबवावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

# सांडपाणी प्रकल्पासाठी १९ गावांत हालचाली

कराड,ता.३१(प्रतिनिधी)-

**कृष्णा आणि कोयना नदीत कराड तालुक्यातील १९ गावांचे सांडपाणी थेट नदीपात्रात मिसळत आहे. त्या गावांना प्रशासनाने नोटिसा दिल्यानंतर त्या गावांमध्ये सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प राबवण्यासाठी प्रशासकीय पातळीवर प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी पंचायत समितीकडून गावांचा अहवाल मागविला आहे.**

नदी प्रदूषण रोखण्याबाबत पंचायत समितीकडून संबंधित १९ ग्रामपंचायतींना यापूर्वीच नोटिसा बजावल्या होत्या. मात्र, केवळ नोटिसांवर न थांबता आता प्रत्यक्ष कृती आराखडा तयार करण्यात येत आहे. गावातील सांडपाण्यावर योग्य ती प्रक्रिया करूनच ते पुढे सोडले जावे किंवा त्याचा पुनर्वापर व्हावा, यादृष्टीने प्रकल्प उभारणीचे प्रयत्न सुरू आहेत.

# लक्ष्मी टाकळी येथील बगीच्या कामामध्ये भ्रष्टाचाराची तक्रार

## आठ जणांवर आरोप; क्रिमीनल रिव्हीजन रद्दबातल करण्याचे आदेश

पंढरपूर,ता.३१(प्रतिनिधी)-

**पंढरपूर तालुक्यातील मौजे लक्ष्मी टाकळी येथील नागरी सुविधा योजनेमार्फत बगीच्या कामांमध्ये निकृष्ट दर्जाचे काम व साहित्य खरेदी यामध्ये दहा लाखांचा भ्रष्टाचार झाल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्त्या कविता राजमाने-धोत्रे यांनी दाखल केली.यावर पंढरपुरातील जिल्हा न्यायालयाने दिलेल्या निकालामुळे जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारींसह ८ जणांना धक्का बसला आहे.**

याबाबतची अधिक माहिती अशी, सोलापूर जिल्हा परिषद अंतर्गत नागरी सुविधा योजनेमार्फत मौजे लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायत येथे बगीचाचे कामासाठी दहा लाखाचे दोन टेंडर काढले.ते प्रशासकीय मान्यतेप्रमाणे दोन्ही कामे एकत्र करून त्याची ई-निविदा करणे गरजेचे असताना नियमबाह्य पध्दतीने सदर ग्रामपंचायतीतील तत्कालीन अधिकारी, पदाधिकारी यांनी सदर टेंडरची कामे स्वतः ग्रामपंचायतीच्या नावावर



**लक्ष्मी टाकळीतील याच बागेच्या कामात भ्रष्टाचार झाल्याची तक्रार केली आहे.**

ग्रामसेवक, प्रशासकीय अधिकारी यांनी पूर्ण केली व सदरची कामे निकृष्ट दर्जाची करून साहित्य खरेदीमध्ये सुमारे दहा लाखाचा भ्रष्टाचार झाल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्त्या कविता राजमाने-धोत्रे यांनी वरिष्ठ अधिकारी तसेच पोलिसांकडेही केली होती. दरम्यान, त्याची दखल न घेतल्याने त्यांनी, ईशाधीन ज्ञानेश्वर शेळकंदे उपमुख्य कार्यकारी अधिकारी, प्रशांत दत्तात्रय काळे गटविकास अधिकारी, संजय नामदेव लवटे उपविभागीय अभियंता, बांधकाम, उमेश भिकाजी शिंदे शाखा अभियंता बांधकाम, अशोक हेरंब पांढरे ग्रामसेवक, महेश गोरख शेळके प्रशासक, जयंत जयकुमार खंडागळे ग्रामसेवक व विजयमाला सचिन वाळके सरपंच या आठ जणांविरूध्द फौजदारी कोर्ट पंढरपूर येथे फौजदारी केस दाखल केली होती. सदर केसमध्ये तालुका कोर्टाने पोलिसांचे म्हणणे मागविण्याचा आदेश दिला.

दरम्यान, त्यानंतर वरील सर्वांनी आम्ही शासकीय नोकर असल्याने तसेच कार्यालयीन प्रशासकीय बाब असल्याने आमचेविरूध्दची फौजदारी केस रद्द करण्याची मागणी करणारे क्रिमीनल रिव्हीजन (फौजदारी पुनरीक्षण) हे जिल्हा कोर्ट पंढरपूर येथे दाखल केले. सदरची केस खोटी आहे वगैरे तक्रारी केल्या होत्या. जिल्हा व सत्र न्यायाधीश मिटकरी मॅडम यांचे कोर्टात आरोपींच्या रिव्हीजनची सुनावणी होवून आरोपींनी केलेले रिव्हीजन रद्दबातल करण्याचा आदेश दिल्याने जिल्हा परिषद सोलापूर विशेष करून सर्व आरोपीत खळबळ माजली असून कायदेशीर धक्का बसला आहे. यापुढे फौजदारी केसमध्ये काय होते याकडे लक्ष्मी टाकळी ग्रामस्थांसह नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# नामदेव पाटील काँग्रेसला गतवैभव प्राप्त करून देतील

## सौ.सत्वशिला चव्हाण;नामदेव पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन सोहळा

कराड,ता.३१(प्रतिनिधी)-

**कोणत्याही आमिषाला, दबाव आणि दडपणाला बळी न पडत काँग्रेसला भक्कमपणे साथ देणारे नामदेव पाटील (आप्पा) यांच्यासारखे निष्ठावंत कार्यकर्ते ही काँग्रेसची शक्ती आहे. जिल्हाध्यक्षपदी झालेली त्यांची निवड ही काँग्रेसमध्ये नवचैतन्य निर्माण करणारी असून नामदेव पाटील काँग्रेसला जिल्ह्यात गतवैभव प्राप्त करून देतील, असा विश्वास महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या पत्नी सौ.सत्वशिला पृथ्वीराज चव्हाण यांनी व्यक्त केला.**

कराड येथे आयोजित काँग्रेसचे नूतन जिल्हाध्यक्ष नामदेव पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन सोहळा आणि जिल्हाध्यक्षपदी झालेली निवड याबद्दल सत्कार अशा संयुक्त कार्यक्रमात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते अजितराव पाटील-चिखलीकर होते. कार्यक्रमाला ओबीसी सेलचे राष्ट्रीय उपाध्यक्ष भानुदास माळी, जि.प.सदस्या सौ.सुनंदा नामदेव पाटील, इंद्रजीत चव्हाण, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुलराज पवार,एनएसयुआय जिल्हाध्यक्ष मुबीन बागवान, महिला अध्यक्षा सुषमा घोरपडे, धनश्री महाडिक, कोल्हापूरचे श्रीकांत पाटील, बाळासाहेब पाटील यांच्यासह काँग्रेसचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नामदेव पाटील यांचे कुटुंबीय व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नामदेव पाटील म्हणाले,काँग्रेसचे जिल्हाध्यक्षपदावर काम करण्याची मिळालेली संधी हे एक आव्हान म्हणून मी स्वीकारली आहे. सर्वांना बरोबर घेऊन आपले नेते पृथ्वीराज चव्हाण यांच्या नेतृत्व मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात पक्ष पुन्हा मजबूत करण्यासाठी आपला प्रामाणिक प्रयत्न राहील. काँग्रेस हा सर्व जाती धर्माच्या लोकांना बरोबर घेऊन सर्वधर्मसमभाव या तत्त्वाने चालणारा पक्ष आहे. पक्षवाढीसाठी कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे.

अजितराव पाटील-चिखलीकर म्हणाले, पक्ष देईल ती जबाबदारी अत्यंत प्रामाणिकपणे पार पाडून यशस्वी करण्याची किमया नामदेव पाटील यांच्यात आहेत. वारूंजीचे सरपंच, पंचायत समिती सदस्य, जि.प.सदस्य, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष आणि आता जिल्हाध्यक्ष हा त्यांच्या यशाचा चढता आलेख गौरवास्पद आहे. नामदेव पाटील यांच्या रूपाने एक सक्षम पर्याय लोकांसमोर निर्माण झाला असून कराड दक्षिणची सर्वसामान्य जनता त्यांच्यात पुढील आमदार पाहत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी भानुदास माळी, प.स.सदस्य रवींद्र बडेकर, संग्राम पवार,वैशाली जाधव यांनीही मनोगत व्यक्त केले. नामदेव पाटील आणि त्यांच्या पत्नी सौ.सुनंदा पाटील यांचा सौ.सत्वशिला चव्हाण यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

स्वागत जि.प.सदस्या सौ.सुनंदा पाटील व सत्यजित पाटील यांनी केले. प्रास्ताविक सर्जेराव पाटील, सूत्रसंचालन विजय माने यांनी केले तर आभार बाळासाहेब पाटील यांनी मानले. कार्यक्रमास काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आयकर विवरणपत्र (आयकर परतावा किंवा आयटीआर) भरण्याची प्रक्रिया सुरू झाली असून, करदात्यांनी फॉर्म भरताना अत्यंत काळजी घेणे आवश्यक आहे. घाईघाईत किंवा अपुऱ्या माहितीच्या आधारे आयटीआर भरल्यास प्राप्तिकर विभागाकडून नोटीस येण्याचा मोठा धोका असतो. कोणतीही अडचण टाळण्यासाठी आयटीआर भरण्यापूर्वी काही महत्त्वाच्या चुका टाळणे अत्यंत गरजेचे आहे.

# ‘आयटीआर’मध्ये भरताना चुका झाल्यास कारवाई होते का?

**अ पुऱ्या माहितीच्या आधारे घाईघाईने आयटीआर भरणे**

आयटीआर फॉर्म ऑनलाईन उपलब्ध होताच अनेक करदाते अगदी सुरुवातीच्या काळातच तो भरण्याची घाई करतात. परंतु, आर्थिक वर्ष संपल्यानंतर लगेचच सर्व कंपन्या किंवा वित्तीय संस्थांचा टीडीएस (टॅक्स डिडक्टेड अॅट सोर्स) डेटा प्राप्तिकर विभागाच्या पोर्टलवर अपडेट झालेला नसतो. साधारणपणे मे महिन्याच्या अखेरपर्यंत किंवा जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत हा डेटा पूर्णपणे जोडला जातो. जर डेटा अपडेट होण्यापूर्वीच आयटीआर दाखल केला, तर तुमच्या दाव्यात आणि विभागाच्या रेकॉर्डमध्ये तफावत निर्माण होऊन नोटीस येऊ शकते.

**■ ‘एआयएस’कडे दुर्लक्ष करणे**

प्राप्तिकर विभागाकडून करदात्याच्या सर्व आर्थिक व्यवहारांची नोंद ’एआयएस’ (अखड) आणि ’टीआईएस’ मध्ये ठेवली जाते. यामध्ये वर्षभरात मिळालेले बँक व्याज, लाभांश (डिव्हिडंड), शेअर्स किंवा म्युच्युअल फंडमधील खरेदी-विक्री आणि इतर मोठ्या व्यवहारांची सविस्तर माहिती असते. आयटीआर भरताना या विवरणातील आकडेवारी आपल्या कागदपत्रांशी जुळवून




पाहणे आवश्यक आहे. जर एआयएसमध्ये नोंदवलेले उत्पन्न आयटीआरमध्ये दाखवले नाही, तर इलेक्ट्रॉनिक पडताळणी प्रणालीद्वारे ते लगेच पकडले जाते.

**■ फॉर्म २६एएसची पडताळणी न करणे**

फॉर्म २६एएस हा करदात्याचा मुख्य कर कपात दस्तऐवज आहे. तुमच्या वेतनातून किंवा इतर उत्पन्नातून कापला गेलेला टीडीएस बँक किंवा कंपनीने सरकारी तिजोरीत जमा केला आहे की नाही, याची खात्री या फॉर्मद्वारे होते. आयटीआर

**■ जाणून घ्या**

भरण्यापूर्वी फॉर्म २६एएस मधील टीडीएसची रक्कम आणि आपल्या फॉर्म १६ मधील रक्कम तंतोतंत जुळत असल्याची खात्री करून घ्यावी. यामध्ये तफावत असल्यास कर परतावा (रिफंड) अडकू शकतो किंवा अतिरिक्त कराची मागणी केली जाऊ शकते.

**■ सर्व बँक खात्यांची आणि उत्पन्नाची माहिती न देणे**

अनेक करदात्यांचे एकापेक्षा जास्त बँकांमध्ये खाते असते. आयटीआर भरताना केवळ मुख्य खात्याची माहिती देणे आणि इतर खात्यांकडे दुर्लक्ष करणे ही मोठी चूक ठरते. नियमांनुसार, सर्व सक्रिय बँक खात्यांची माहिती देणे बंधनकारक आहे. याशिवाय, बचत खात्यावर मिळणारे व्याज किंवा फिक्स्ड डिपॉझिटवरील व्याज हे करपात्र उत्पन्न मानले जाते. ’इतर स्रोतांकडून मिळणारे उत्पन्न’ (इन्कम फ्रॉम अदर सोर्सेस) या पर्यायांतर्गत या सर्व व्याजाची अचूक नोंद करणे आवश्यक आहे.

**■ चुकीचा आयटीआर फॉर्म निवडणे**

प्राप्तिकर विभागाने वेगवेगळ्या उत्पन्नाच्या स्रोतानुसार आयटीआर १, आयटीआर २, आयटीआर ३ आणि आयटीआर ४ असे विविध फॉर्म निश्चित केले आहेत. उदाहरणार्थ, केवळ पगार आणि एका घरापासून उत्पन्न असणाऱ्यांसाठी आयटीआर १ आहे, तर शेअर्समधील भांडवली नफा (कॅपिटल गेन्स) असणाऱ्यांना आयटीआर २ किंवा व्यवसाय करणाऱ्यांना आयटीआर ३ अथवा ४ भरावा लागतो. जर चुकीचा फॉर्म निवडला, तर तो परतावा अवैध (डिफेक्टिव्ह रिटर्न) मानला जातो आणि प्राप्तिकर कायद्याच्या कलम १३९(९) अन्वये दुरुस्तीची नोटीस पाठवली जाते. ◆◆◆

# निवृत्तीची शिदोरी मोठीच हवी

नि वृत्तीनंतरचे आयुष्य आर्थिकदृष्ट्या सुरक्षित आणि चिंतामुक्त असावे, अशी प्रत्येकाचीच इच्छा असते. परंतु, अनेकदा तरुण वयात किंवा नोकरीच्या सुरुवातीच्या काळात निवृत्तीच्या बचतीकडे गांभीर्याने पाहिले जात नाही. काही प्रमुख घटक आपल्या निवृत्तीच्या बचतीमध्ये त्वरित वाढ करण्यासाठी प्रवृत्त करणारे ठरतात. ते वेळीच समजून घेतल्यास भविष्यातील मोठी आर्थिक कोंडी टाळता येऊ शकते.



**१. वाढते आयुर्मान**

वैद्यकीय क्षेत्रातील प्रगती आणि सुधारलेल्या आरोग्य सुविधांमुळे मानवाचे सरासरी आयुर्मान सातत्याने वाढत आहे. दीर्घायुष्य लाभणे ही आनंदाची बाब असली, तरी आर्थिक दृष्टीने ती एक मोठी जोखीम मानली जाते. एखादी व्यक्ती वयाच्या ६० व्या वर्षी निवृत्त झाली आणि ती ८५ किंवा ९० वर्षांपर्यंत जगली, तर तिला निवृत्तीनंतर तब्बल २५ ते ३० वर्षे कोणत्याही नियमित उत्पन्नाशिवाय काढावी लागतात. तुमची निवृत्तीची शिदोरी लहान असेल, तर वाढत्या वयात पैसे संपण्याची भीती असते. हा विचारच गुंतवणूकदारांना त्यांची सध्याची बचत वाढवण्यास भाग पाडतो.

**२. वैद्यकीय खर्चातील प्रचंड वाढ**

वाढत्या वयासोबत आरोग्याच्या समस्या निर्माण होणे स्वाभाविक असते. सध्याच्या काळात सामान्य महागाईच्या तुलनेत वैद्यकीय क्षेत्रातील महागाईचा दर (हेल्थकेअर इन्फ्लेशन) दुप्पट वेगाने वाढत आहे. हॉस्पिटलायझेशन, शस्त्रक्रिया, औषधोपचार आणि गंभीर आजारांवरील उपचारांचा खर्च दिवसेंदिवस सामान्यांच्या आवाक्याबाहेर जात आहे. केवळ साधे हेल्थ इन्शुरन्स कव्हर वाढत्या वयात पुरेसे ठरत नाही, कारण अनेक व्याधी किंवा खर्च विम्याच्या कक्षेत येत नाहीत. निवृत्तीनंतरचा एक मोठा हिस्सा केवळ आरोग्यावर खर्च होऊ शकतो, हे धक्कादायक वास्तव लक्षात आल्यावर निवृत्ती निधीचा आकार मोठा असणे किती गरजेचे आहे, हे पटते.

**३. जीवनशैलीतील बदल आणि महागाई**


निवृत्तीनंतर केवळ अन्न, वस्त्र आणि निवारा एवढ्यापुरताच खर्च मर्यादित राहत नाही. आजची पिढी निवृत्तीनंतरही आपली जीवनशैली राखू इच्छिते. यामध्ये प्रवास करणे, छंद जोपासणे आणि सामाजिक सुखांचा उपभोग घेणे समाविष्ट असते.

**■ अर्थसल्ला**

योसोबतच महागाईचा विचार केला जातो, तेव्हा भविष्यातील खर्चाचे आकडे थक्क करणारे असतात. आज ज्या जीवनशैलीसाठी महिन्याला ५० हजार रुपये लागतात, तीच जीवनशैली २० वर्षांनंतर टिकवण्यासाठी महागाईमुळे कदाचित दीड ते दोन लाख रुपये लागू शकतात. हा गणिताचा फरक समजून घेताच, सध्या सुरू असलेली बचत पुरेशी नाही याची जाणीव होते आणि गुंतवणूकदार एसआयपी किंवा इतर माध्यमांतून आपली निवृत्ती गुंतवणूक वाढवण्याचा निर्णय घेतात. ◆◆◆

# एसआयपीचा परतावा नकारात्मक दिसतोय?

व्हा ईटओक कॅपिटल म्युच्युअल फंडच्या मे २०२६ मधील एसआयपी विश्लेषणात्मक अहवालानुसार, बीएसई सेन्सेक्स टीआरआयच्या रोलिंग एसआयपी परताव्याचा अभ्यास केला असता एक महत्त्वपूर्ण बाब समोर आली आहे. अनेक गुंतवणूकदार असा विचार करतात की एसआयपीमध्ये दीर्घकाळ गुंतवणूक केल्यास शेअर बाजार नेहमीच चांगला परतावा देतो. हे बरेचसे खरे असले तरी ’दीर्घकाळ’ म्हणजे नक्की किती काळ, हे समजून घेणे आवश्यक आहे. केवळ नियमित गुंतवणूक करणे पुरेसे नसते; कमी कालावधीच्या एसआयपीमध्ये गुंतवणूकदारांना बाजारपेठेतील उतार-चढावांमुळे नुकसानीचा सामना करावा लागू शकतो.




**● तीन वर्षांसाठीच्या एसआयपीमध्ये नुकसान?**

ऑगस्ट १९९६ ते एप्रिल २०२६ या कालावधीतील आकडेवारीनुसार, ३ वर्षांच्या एसआयपीने जवळपास १२ टक्के ऐतिहासिक कालावधीत उणे म्हणजेच निगेटिव्ह परतावा दिला आहे. याचा अर्थ असा की प्रत्येक वेळी ३ वर्षे गुंतवणूक करणाऱ्यांना फायदा झालाच असे नाही. अत्यंत वाईट परिस्थितीत ३ वर्षांच्या एसआयपीचा परतावा उणे २४.५९ टक्क्यांपर्यंत खाली घसरला होता, ज्यामुळे गुंतवणूकदारांना मोठ्या भांडवली नुकसानीला सामोरे जावे लागले. केवळ ३ वर्षेच नव्हे, तर ५ वर्षांची एसआयपी देखील पूर्णपणे सुरक्षित नव्हती; काही कालावधीत ५ वर्षांच्या एसआयपीचा परतावा उणे ९.४८ टक्क्यांपर्यंत खाली आला होता.

**● किमान आठ वर्षे गरजेची**

गुंतवणुकीचा कालावधी वाढल्यास परिस्थिती पूर्णपणे बदलते. या अहवालानुसार, ८ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त काळ चाललेल्या एसआयपीने कधीही उणे परतावा दिलेला नाही. म्हणजेच ८ वर्षे, १० वर्षे, १२ वर्षे आणि १५ वर्षे अशा सर्व रोलिंग एसआयपी कालावधीत गुंतवणूकदारांना नेहमीच सकारात्मक परतावा मिळाला आहे.

तसेच, कालावधीनुसार सर्वात खराब कामगिरीचे आकडेही सुधारत गेले. ३ वर्षांच्या एसआयपीचा किमान परतावा उणे २४.५९ टक्के असताना, ८ वर्षांच्या एसआयपीचा किमान परतावा ३.०३ टक्के आणि १५ वर्षांच्या एसआयपीचा किमान परतावा ७.३ टक्के नोंदवला गेला. यावरून असे दिसून येते की काळानुरूप बाजारातील अस्थिरतेचा परिणाम कमी होतो आणि नुकसानीची शक्यता संपते.

**● सर्वाधिक परतावा अल्प कालावधीत**

या अभ्यासातील एक रंजक बाब म्हणजे सर्वात जास्त परतावा दीर्घ मुदतीत नाही, तर कमी कालावधीत पाहायला मिळाला. ३ वर्षांच्या एसआयपीचा कमाल परतावा ५५.५६ टक्क्यांपर्यंत पोहोचला होता, तर त्या तुलनेत १५ वर्षांच्या एसआयपीचा कमाल परतावा १८.१८ टक्के

**■ निरीक्षण**

राहिला. मात्र, अल्प कालावधीत परताव्यातील चढ-उतार आणि जोखीम खूप जास्त होती.जसा गुंतवणुकीचा कालावधी वाढला, तसा परताव्याचा टप्पा अधिक स्थिर आणि अंदाज लावण्याजोगा बनला. विविध कालावधीत सरासरी एसआयपी परतावा साधारणपणे १४ ते १६ टक्क्यांच्या दरम्यान राहिला. दीर्घ कालावधीमुळे प्रचंड नफा किंवा प्रचंड तोटा या दोन्ही टोकाच्या शक्यता कमी झाल्या.

**● दोन अंकी परताव्याची शक्यता वाढली**

दीर्घकालीन एसआयपीमध्ये १० टक्क्यांपेक्षा जास्त परतावा मिळण्याची शक्यता अधिक मजबूत होत जाते. ३ वर्षांच्या एसआयपीमध्ये केवळ ६७ टक्के प्रकरणांमध्ये गुंतवणूकदारांना १० टक्क्यांपेक्षा जास्त परतावा मिळाला. याउलट, १२ वर्षे आणि १५ वर्षांच्या एसआयपीमध्ये हे प्रमाण वाढून ९८ टक्क्यांपर्यंत पोहोचले.

या अहवालाचा निष्कर्ष एसआयपी पूर्णपणे जोखीममुक्त आहे असा नाही. बाजारपेठेतील जोखीम एसआयपीमध्येही कायम राहते. तसेच कमी कालावधीत तिचा प्रभाव अधिक स्पष्ट दिसतो. परंतु, गुंतवणुकीचा कालावधी वाढल्यास यश मिळण्याची शक्यता वाढते. अल्प कालावधीत बाजाराची स्थिती परताव्यावर परिणाम करू शकते, मात्र दीर्घ कालावधीत नुकसानीची शक्यता वेगाने कमी होते. एसआयपीमधील यश हे बाजाराची अचूक वेळ साधण्यात नसून, बाजारात दीर्घकाळ टिकून राहण्यात आहे, हाच या अभ्यासाचा सर्वात मोठा धडा आहे. ◆◆◆

# रिटर्न भरताना शेतीउत्पन्न विसरू नका




शे तीप्रधान असलेल्या आपल्या देशात शेतीपासून मिळणारे उत्पन्न पूर्णपणे करमुक्त आहे, हा नियम सर्वसामान्य नागरिकांना आणि शेतकऱ्यांना चांगलाच ठाऊक आहे. प्राप्तिकर कायद्याच्या कलम १०(१) अंतर्गत शेती उत्पन्नाला करातून सूट देण्यात आली आहे. परंतु, अनेकदा या नियमाचा असा गैरसमज केला जातो की शेती उत्पन्न करमुक्त असल्यामुळे त्याची माहिती सरकारला किंवा प्राप्तिकर विभागाला देण्याची काहीच गरज नाही. हा विचार पूर्णपणे चुकीचा असून, आयटीआर म्हणजेच आयकर विवरणपत्र भरताना शेती उत्पन्नाची योग्य नोंद न केल्यास सर्वसामान्य करदाते किंवा शेतकरी मोठ्या कायदेशीर अडचणीत येऊ शकतात.

सर्वप्रथम हे समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे की, जर तुमचे शेती व्यतिरिक्त इतर कोणतेही उत्पन्न नसेल आणि शेतीचे उत्पन्न कितीही मोठे असले, तरी तुम्हाला आयटीआर भरण्याची कायदेशीर सक्ती नसते.

**■ लक्षात ठेवा**

परंतु, आजकाल अनेक शेतकरी किंवा त्यांच्या कुटुंबातील सदस्य नोकरी, व्यवसाय, बँक व्याज, शेअर्स किंवा इतर माध्यमांतूनही कमाई करत असतात. जेव्हा एखाद्या व्यक्तीचे शेती व्यतिरिक्त इतर स्रोतांतून मिळणारे उत्पन्न करपात्र मर्यादेपेक्षा जास्त असते, तेव्हा त्याला आयटीआर भरणे बंधनकारक असते. अशा परिस्थितीत, जर त्या व्यक्तीचे शेतीचे वार्षिक उत्पन्न ५ हजार रुपयांपेक्षा जास्त असेल, तर आयटीआर भरताना त्याची स्वतंत्र नोंद करणे कायद्याने अनिवार्य आहे.

आयकर विवरणपत्रामध्ये शेती उत्पन्नाची माहिती मागवण्यामागे प्राप्तिकर विभागाचा एक महत्त्वाचा हेतू असतो. कर रचनेमध्ये ’अंशतः एकत्रीकरण’ म्हणजेच पार्शियल इंटिग्रेशन नावाचा एक नियम आहे. या नियमानुसार, प्रत्यक्ष शेती उत्पन्नावर कोणताही कर लावला जात नाही, मात्र करदात्याचा टॅक्स स्लॅब ठरवण्यासाठी या उत्पन्नाचा विचार केला जातो. सोप्या भाषेत सांगायचे तर, शेतीचे उत्पन्न आणि इतर करपात्र उत्पन्न एकत्र करून कराचा दर निश्चित केला जातो, ज्यामुळे करदात्याला काही प्रमाणात जास्त कर भरावा लागू शकतो. जर तुम्ही हे उत्पन्न लपवले, तर प्राप्तिकर विभागाच्या स्वयंचलित प्रणालीद्वारे विसंगती शोधून काढली जाते आणि तपासणीची नोटीस पाठवली जाते.

शेती उत्पन्न दाखवण्याचा दुसरा मोठा फायदा म्हणजे तुमच्या संपत्तीला मिळणारी कायदेशीर मान्यता. एखादी मोठी मालमत्ता, घर किंवा गाडी खरेदी करताना अथवा बँक कर्जासाठी अर्ज करताना आपल्याकडे पैशांचा अधिकृत स्रोत असणे गरजेचे असते. दरवर्षी आयटीआरमध्ये आपले शेतीचे उत्पन्न प्रामाणिकपणे दाखवले असेल, तर तो तुमच्या पांढऱ्या पैशाचा एक भक्कम कायदेशीर पुरावा बनतो. याउलट, आयटीआर न भरल्यास किंवा त्यात शेतीचे उत्पन्न न दाखवल्यास, प्राप्तिकर विभाग त्या पैशांना ’अघोषित उत्पन्न’ मानू शकतो, ज्यावर प्रचंड मोठा दंड आणि कर आकारला जाऊ शकतो. अनेकदा लोक काळा पैसा पांढरा करण्यासाठी शेती उत्पन्नाचा खोटा आधार घेतात, त्यामुळे आता प्राप्तिकर विभाग शेती उत्पन्नाच्या दाव्यांची अत्यंत कडक तपासणी करतो. ◆◆◆

**काही गोष्टींची विशेष काळजी घ्या**

शेती उत्पन्न दाखवताना तुमच्याकडे सातबारा उतारा, आठ अ चा दाखला, पिकांची नोंदणी आणि पीक विक्रीच्या अधिकृत पावत्या किंवा बँक खात्यातील नोंदी असणे आवश्यक आहे. जर कधी प्राप्तिकर विभागाने चौकशी केली, तर हे दस्तऐवज सादर करावे लागतात. त्यामुळे चालू आर्थिक वर्षात आयटीआर भरताना, आपल्या इतर उत्पन्नासोबतच शेती उत्पन्नाची अचूक नोंद शेड्युल ईआय म्हणजेच एक्झम्प्ट इन्कम अंतर्गत नक्की करा. हा प्रामाणिकपणा तुम्हाला भविष्यातील मानसिक त्रासापासून आणि प्राप्तिकर विभागाच्या नोटिसीपासून पूर्णपणे सुरक्षित



# अपेक्षेनुसार परतावा मिळवण्यासाठी...

नि योजित ध्येयानुसार योग्य फंडची निवड करणे आणि बाजारातील चढ-उतारांमध्येही संयम राखणे हा म्युच्युअल फंड गुंतवणुकीतील यशाचा मार्ग मानला जातो. परंतु, अनेकदा गुंतवणूकदार पोर्टफोलिओ तयार करताना होणाऱ्या काही चुकांमुळे दीर्घकाळ गुंतवणूक करूनही अपेक्षेप्रमाणे परतावा मिळत नाही. कोणत्या आहेत या चुका?

**१. अवाजवी विविधीकरण :** गुंतवणुकीतील जोखीम कमी करण्यासाठी ’डायव्हर्सिफिकेशन’ म्हणजेच विविधीकरण करणे गरजेचे असते, हा नियम सर्वश्रुत आहे. परंतु, अनेक गुंतवणूकदार या नियमाचा अतिरेक करतात आणि आपल्या पोर्टफोलिओमध्ये २० ते ३० पेक्षा जास्त फंडस्‌चा समावेश करतात. एकाच श्रेणीतील (उदा. अनेक लार्ज कॅप किंवा अनेक मिड कॅप) विविध फंडस् खरेदी केल्यामुळे पोर्टफोलिओमध्ये ’ओव्हरलॅपिंग’ वाढते. म्हणजेच, वेगवेगळ्या फंडांच्या नावाखाली शेवटी बाजारातील सारख्याच शेअर्समध्ये तुमचे पैसे गुंतवले जातात. यामुळे जोखीम कमी होत नाही, उलट पोर्टफोलिओचा परतावा सरासरी पातळीवर (अॅव्हरेज) येतो आणि चांगल्या फंडस्‌च्या कामगिरीचा फायदा मर्यादित होतो.

**२. केवळ मागील कामगिरीच्या (पास्ट परफॉर्मन्स) आधारे निवड** : अनेक गुंतवणूकदार फंड निवडताना केवळ गेल्या १ ते ३ वर्षांत कोणत्या फंडाने सर्वाधिक परतावा दिला आहे, हे पाहतात आणि त्यात गुंतवणूक करतात. हा गुंतवणुकीतील एक मोठा धोका ठरू शकतो. एखाद्या फंडाने भूतकाळात उत्कृष्ट कामगिरी केली म्हणजे तो भविष्यातही तसाच परतावा देईल, याची कोणतीही शाश्वती नसते. अनेकदा विशिष्ट बाजारपेठेच्या चक्रामुळे (मार्केट सायकल्स) एखादी थीम किंवा फंड तात्पुरती चांगली कामगिरी करतो. केवळ वरवरचा परतावा पाहण्याऐवजी फंडाची सातत्यपूर्ण कामगिरी (कन्सिस्टन्सी), फंड मॅनेजरची रणनीती आणि जोखमीचे व्यवस्थापन या घटकांचा अभ्यास करणे गरजेचे असते.

**३. सातत्याने पोर्टफोलिओमध्ये बदल करणे:** म्युच्युअल फंडमधील गुंतवणूक ही प्रामुख्याने दीर्घकालीन


**■ गुंतवणूक**

उद्दिष्टांसाठी असते. मात्र, काही गुंतवणूकदार बाजारातील प्रत्येक लहान-मोठ्या घसरणीला किंवा वाढीला पाहून आपल्या पोर्टफोलिओमध्ये सतत फेरबदल करत राहतात. एखादा फंड काही महिने अपेक्षेप्रमाणे चालला नाही की तो विकून दुसऱ्या फंडात जाणे, किंवा नवीन फंडस्‌च्या मागे धावणे यांमुळे गुंतवणुकीचे चक्र विस्कळीत होते. सततच्या खरेदी-विक्रीमुळे एक्झिट लोड आणि कर (कॅपिटल गेन्स टॅक्स) या रूपाने गुंतवणूकदाराचे आर्थिक नुकसान होते. पोर्टफोलिओचा आढावा वर्षातून एकदा किंवा दोनदा घेणे योग्य ठरते, मात्र त्यात वारंवार बदल करणे दीर्घकालीन संपत्ती निर्मितीच्या आड येऊ शकते. ◆◆◆

# ‘रीट’मध्ये गुंतवणूक करताना...

म्यु च्युअल फंड किंवा थेट शेअर्सप्रमाणेच आता भारतात रिअल इस्टेट इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट म्हणजेच ‘रीट’ चा आणखी एक पर्याय गुंतवणूकदारांसाठी उपलब्ध झाला आहे. व्यावसायिक रिअल इस्टेट क्षेत्रात कमी भांडवलात गुंतवणूक करण्याची आणि नियमित उत्पन्न मिळवण्याची संधी रीटच्या माध्यमातून मिळते. पण हा पर्याय तुमच्यासाठी योग्य आहे की नाही, हे समजून घेणे महत्त्वाचे आहे.

ज्याप्रमाणे म्युच्युअल फंड सामान्य गुंतवणूकदारांकडून पैसे गोळा करून ते शेअर्समध्ये गुंतवतात, त्याचप्रमाणे ‘रीट’ गुंतवणूकदारांचे पैसे गोळा करून मोठे ऑफिस पार्क, आयटी पार्क, शॉपिंग मॉल्स किंवा कमर्शियल कॉम्प्लेक्स अशा व्यावसायिक मालमत्तांमध्ये गुंतवणूक करतात. या मालमत्तांमधून मिळणारे भाडे



आणि नफा हा लाभांश किंवा व्याजाच्या स्वरूपात गुंतवणूकदारांना वाटला जातो. भारतात रीट प्रामुख्याने शेअर बाजारात लिस्टेड असतात, त्यामुळे शेअर्सप्रमाणेच त्यांची खरेदी-विक्री करता येते.

नियमांनुसार, रीट कंपन्यांना आपल्या करपात्र उत्पन्नातील किमान ९० टक्के हिस्सा गुंतवणूकदारांना लाभांश किंवा व्याज म्हणून वाटणे कायदेशीररीत्या बंधनकारक असते. तरीही प्रत्येक गुंतवणूकदारासाठी ‘रिटस्’ हा योग्य पर्याय ठरेलच असे नाही. तुम्ही आर्थिक आयुष्याच्या कोणत्या टप्प्यावर आहात, यावर रीटमधील गुंतवणूक अवलंबून असावी:जे गुंतवणूकदार तरुण आहेत आणि ज्यांचे उद्दिष्ट पुढील १० ते १५ वर्षांत मोठी संपत्ती निर्माण करण्याचे आहे, त्यांनी रीट ऐवजी ‘इक्विटी’ म्हणजेच शेअर्स किंवा म्युच्युअल फंडला प्राधान्य दिले पाहिजे. इक्विटीमध्ये दीर्घकाळात मिळणारी चक्रवाढ वाढ (कॅपिटल अप्रिसिएशन) ही रीटच्या तुलनेत जास्त असते.

**रिटायरमेंट किंवा रेग्युलर इन्कम फेज :** ज्या गुंतवणूकदारांना त्यांच्या भांडवलावर नियमित आणि सुरक्षित परतावा हवा आहे, त्यांच्यासाठी रीट उपयुक्त ठरू शकतो. मुदत ठेव (एफडी) किंवा डिबेंचर्सपेक्षा काही प्रमाणात चांगला आणि महागाईला मात देणारा परतावा रीटच्या माध्यमातून मिळू शकतो.पण रीटमध्ये गुंतवणूक करताना केवळ मिळणाऱ्या

**■ अर्थसल्ला**

उत्पन्नाचा विचार न करता त्यातील जोखमींचाही अभ्यास करणे गरजेचे आहे:

रिअल इस्टेट क्षेत्र हे व्याजदरांशी जोडलेले असते. जेव्हा मध्यवर्ती बँकेकडून व्याजदर वाढवले जातात, तेव्हा रीटच्या कामगिरीवर आणि त्यांच्या युनिटच्या किमतींवर नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

आर्थिक मंदी किंवा वर्क फ्रॉम होमच्या ट्रेंडमुळे कार्यालयांची मागणी कमी झाली आणि इमारती रिकाम्या राहिल्या, तर रीटचे भाड्यापासून मिळणारे उत्पन्न कमी होते, ज्याचा थेट फटका गुंतवणूकदारांच्या लाभांशावर होतो.रीट कडून मिळणाऱ्या लाभांश आणि व्याजावर कर रचनेनुसार टॅक्स लागू होतो. त्यामुळे आपल्या टॅक्स स्लॅबचा विचार करूनच यात गुंतवणूक करावी.

थोडक्यात बाजारात उपलब्ध असलेला नवीन रीट हा तुमच्या पोर्टफोलिओला विविधीकरण (डायव्हर्सिफिकेशन) देण्याचा एक चांगला मार्ग ठरू शकतो. परंतु, संपत्ती वाढवण्याच्या सुरुवातीच्या टप्प्यात असाल, तर इक्विटीवर अधिक भर देणे फायदेशीर ठरेल.

# घर टू घर संवाद ठेवा मतदार यादी पुनर्निरीक्षण अभियान यशस्वी करा

## शिवसेना निवडणूक विभागप्रमुख प्रशांत घोरपडे यांचे आवाहन

**इचलकरंजी,ता.३१**

हातकणंगले लोकसभा **मतदारसंघात ३० जून पासून पुढील एक महिना मतदार यादी पुनर्नरीक्षण कार्यक्रम सुरू होत आहे. यावरती विशेष लक्ष ठेवा घराघरात पोहोचून लोकांना मार्गदर्शन करा, शिवसेनेच्या वतीने हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कोणताही आळस करू नका, असे आवाहन शिवसेना निवडणूक विभाग प्रमुख प्रशांत घोरपडे, अविनाश सणस यांनी केले.**



**शिवसेनेच्या बीएलए प्रशिक्षण कार्यक्रमाप्रसंगी प्रशांत घोरपडे, रविंद्र माने, अजितसिंह पाटील, अतिश सिंगे व इतर मान्यवर**

हातकणंगले लोकसभा मतदारसंघातील हातकणंगले, शिरोळ, शाहूवाडी आणि इचलकरंजी विधानसभा मतदारसंघातील शिवसेनेच्या बीएलए यांचे इचलकरंजी येथील मराठा मंडळ भवनमध्ये शिवसेना जिल्हाप्रमुख रवींद्र माने यांनी प्रशिक्षण आयोजित केले होते याप्रसंगी ते बोलत होते.

सुरुवातीला रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून शिबिरास सुरुवात झाली.

शिवसेना जिल्हाप्रमुख रवींद्र माने यांनी स्वागत केले. आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि युवक नेते डॉ. श्रीकांत शिंदे यांचा विचार घरोघरी पोहोचण्यासाठी मतदार यादी पुनर्नरीक्षण कार्यक्रम हा महत्त्वाचा टप्पा आहे. या माध्यमातून शिवसेनेचा विचार प्रत्येकापर्यंत पोहोचवण्याची ही संधी आहे. शिवसैनिकांनी यासाठी वेळात वेळ काढून काम करावे असे आवाहन रवींद्र माने यांनी केले.

मतदार यादी पुनर्नरीक्षणामध्ये मोठा गोंधळ आहे. लोक गडबडून गेले आहेत. नेमकी कोणती माहिती द्यावी, अधिकाऱ्यांना काय सांगितले पाहिजे या संदर्भात त्यांना मार्गदर्शनची गरज आहे. आणि ही गरज ओळखून आपले नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बूथनिहाय शिवसेनेचे बीएलओ नेमण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार सर्वच मतदारसंघांमध्ये मोठ्या प्रमाणात हा कार्यक्रम राबविला जात आहे. प्रत्येक ठिकाणी शिवसैनिक स्वतःहून हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सहभागी होत आहेत. इचलकरंजी शहरांमध्ये रवींद्र माने यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेचे अतिशय चांगल्या पद्धतीने नियोजन होत आहे. याची दखल उपमुख्यमंत्री शिंदे यांनी घेतलेली आहे. त्यामुळेच आम्ही खास करून यासाठी आज येथे आलो आहोत. २००२ आणि २०२४ या दोन मतदार यादी मध्ये लोकांचा संभ्रम आहे. आजच्या प्रशिक्षणाच्या माध्यमातून यादी मधील समानता आहे का तपासावी, मतदारांना नोंदणी करताना मार्गदर्शन करा. शिवसेनेच्या माध्यमातून यासाठी एक ॲप तयार केलेला आहे. ते मतदारसंघातील प्रत्येक घरातील प्रत्येक व्यक्तीच्या मोबाईल वरती पोहोचले पाहिजे. अशी व्यवस्था करा आणि हे करत असताना शिवसेनेचा विचारही मतदारापर्यंत पोहोचला पाहिजे याकडेही कटाक्षाने लक्ष द्या, भविष्यातील होणाऱ्या विधानसभा लोकसभा निवडणुकीत फक्त भगवा झेंडा फडकला पाहिजे यासाठी सुद्धा जीवाचे रान करा असे आवाहन प्रशांत घोरपडे आणि अविनाश सणस यांनी केले. या तब्बल चार तास चाललेल्या या प्रशिक्षण शिबिरास हातकणंगलेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष अजित सिंह पाटील, जिल्हा परिषद सदस्य आतिश शिंगे, डॉ. सावर्डेकर तसेच लोकसभा मतदारसंघातील जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, सरपंच आधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आमदार डॉ. सुरेशभाऊ खाडे यांच्या वाढदिवसानिमित्त एमटीडीके रन २०२६ उत्साहात

**मिरज,ता.३१**

**माजी कॅबिनेट मंत्री तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री आमदार डॉ. सुरेश (भाऊ) खाडे यांच्या वाढदिवसानिमित्त एमटीडीके शैक्षणिक संकुलातर्फे आयोजित करण्यात आलेली 'एमटीडीके रन २०२६' ही आरोग्य जनजागृती धाव उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. 'हेल्दी मिरज, फिट मिरजकर' या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला सांगली, मिरज आणि परिसरातील हजारो नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.**

यंदाच्या धाव स्पर्धेची 'वारकरी संप्रदाय भक्ती, शक्ती आणि आरोग्याची धाव' ही संकल्पना विशेष आकर्षण ठरली. वारकरी संप्रदायातील शिस्त, समर्पण, एकोपा आणि सकारात्मक जीवनमूल्यांचा संदेश या उपक्रमाच्या माध्यमातून समाजापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यात आला.



**एमटीके रन २०२६ च्या शुभारंभप्रसंगी आम. सुरेश खाडे**

महिला सक्षमीकरणाला प्राधान्य देत यंदाच्या धावेत महिलांच्या सहभागासाठी विशेष नियोजन करण्यात आले होते. एमटीडीके शैक्षणिक संकुलाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. स्वातीताई सुशांत खाडे यांच्या नेतृत्वाखाली महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. श्रद्धा, संस्कृती आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देणाऱ्या या रॅलीने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आमदार डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, एमटीडीके शैक्षणिक संकुलाच्या संचालिका सौ. सुमनताई खाडे, सुशांत खाडे, मुख्याध्यापिका सौ. संगीता पाटील, सौ. करुणा माने, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, स्वयंसेवक तसेच पोलीस प्रशासन यांनी विशेष परिश्रम घेतले.

भक्ती, शक्ती आणि आरोग्याचा संगम घडविणारी 'एमटीडीके रन २०२६' मिरजकरांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे अविस्मरणीय ठरल्याची भावना सहभागी नागरिकांनी व्यक्त केली. यावेळी भाजपा प्रदेश अल्पसंख्यांक सचिव फारूक जमादार, माजी नगरसेवक योगेंद्र कांबळे व इतर मान्यवर उपस्थित होते.

# शिराळा विधानसभा मतदारसंघात 'पी. एम. सूर्य घर योजना' प्रचाराला वेग

**शिराळा,ता.३१ (प्रतिनिधी)**

**केंद्र सरकारच्या 'पी. एम. सूर्य घर योजना' अंतर्गत शिराळा विधानसभा मतदारसंघात सौरऊर्जा प्रकल्प उभारणीसाठी जनजागृती मोहीम सुरू करण्यात आली आहे. या योजनेद्वारे घरांवर सोलर सिस्टम बसवून वीज बिलातून कायमची सुटका करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.**

या योजनेच्या पत्रकानुसार, आमदार सत्यजित देशमुख यांच्या विशेष प्रयत्नांतून मतदारसंघातील नागरिकांना कमी खर्चात सोलर सिस्टम उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न सुरू आहे. केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून ३ किलोवॅट सोलर सिस्टमसाठी अंदाजे १ लाख २५ हजार खर्च असून त्यावर ७८ हजार अनुदान मिळणार आहे. त्यामुळे लाभार्थ्यांना केवळ ४७ हजार खर्च करावा लागणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

योजनेअंतर्गत सोलर प्रणाली बसवल्यानंतर वीज बिलात मोठी बचत होणार असून पर्यावरणपूरक ऊर्जेला चालना मिळणार आहे. तसेच सबसिडी थेट खात्यात जमा होणार असून प्रक्रिया सोपी व जलद असल्याचा दावा पत्रकातून करण्यात आला आहे. योजनेसाठी अर्ज करताना लाईट बिल, आधार कार्ड, पॅन कार्ड, बँक पासबुक व घराचा उतारा अशी आवश्यक कागदपत्रे द्यावी लागणार आहेत. नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आमदार सत्यजित देशमुख यांनी केले आहे.

# शेतकऱ्यांनी अनुदानावरील बियाणांचा लाभ घ्यावा : आम.शशिकला जोल्ले

**निपाणी,ता.३१ (प्रतिनिधी)–**

**चालू खरीप हंगामात शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी शासनाने अनुदानावरील सोयाबीन बियाणे उपलब्ध करून दिले आहे. शेतकऱ्यांनी अनुदानावरील बियाणांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आमदार शशिकला जोल्ले यांनी केले.**



**अनुदानावरील सोयाबीन बियाणे वितरणप्रसंगी आम.शशिकला जोल्ले, अण्णासाहेब जोल्ले,सिद्धू नराटे,राजेंद्र कानडे व इतर.**

तालुका कृषी विभाग व वेदगंगा फार्मर प्रोड्युसर कंपनी,तालुका मार्केटींग सोसायटी यांच्यातर्फे एपीएमसी मार्केटमध्ये राज्य शासनाच्या अनुदानावरील सोयाबीन बियाणे वितरण झाले.स्वागत तालुका मार्केटिंग सोसायटीचे चेअरमन राजेंद्र कानडे यांनी तर प्रास्ताविक वेदगंगा फार्मर प्रोड्यूसर कंपनीचे चेअरमन सिध्दू नराटे यांनी केले.आम.जोल्ले पुढे म्हणाल्या, शेतकऱ्यांना सोयाबीन, मूग, उडीद, बियाणे वितरण केले जाणार आहे.अधिकाऱ्यांनी जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत हे बियाणे पोहोचवण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करावेत.

कृषी अधिकारी दीपक कौजलगी म्हणाले, यावर्षी मान्सूनचे प्रमाण कमी आहे.त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीसाठी घाई करू नये.

चांगला पाऊस पडल्यानंतरच पेरणी करावी.याप्रसंगी बीडीसी बँकेचे अध्यक्ष अण्णासाहेब जोल्ले, हालशुगरचे संचालक महालिंग कोठीवाले, रावसाहेब फराळे, सुहास घुगे, आनंदा यादव, निरंजन कमते, सुबोध शाह, सुनील वडगावे, मधुकर पाटील, किशोर हरदारे, मनोहर मगदूम यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

**६ केंद्रावर वितरण**

सध्या संपर्क केंद्रात ८० टन सोयाबीन उपलब्ध असून पाच क्विंटल मूग उपलब्ध आहे.सध्या निपाणी, कुर्ली, बुध्दीहाळ, सौंदलगा, बेनाडी बेडकिहाळ या सहा केंद्रांवर बियाणे वितरण केले जाणार आहे. शेतकऱ्यांना सोयाबीन खरेदीसाठी आधार कार्ड झेरॉक्स सोबत आणणे आवश्यक आहे.

# माणकापूरच्या युवकाची हंचीनाळ येथे आत्महत्या

**निपाणी,ता.३१(प्रतिनिधी)**

**माणकापूर (ता.निपाणी) येथील पदवीधर युवक प्रशांत तायगोंडा गायकवाड (वय ३८ ) या युवकाने हंचीनाळ,के.एस.(ता.निपाणी) येथे गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना रविवारी उघडकीस आली.घटनेची नोंद ग्रामीण पोलीसात झाली आहे.**



प्रशांत गायकवाड याचे मुळगाव हंचीनाळ (केएस) ता.निपाणी असून तो आपल्या कुटुंबियासमवेत माणकापूर येथे मामाच्या गावी राहावयास होता.त्याचे डीएड (पदवीपर्यंत) शिक्षण झाले होते.शिवाय त्याने एमपीएससीची परीक्षाही दिली होती.सध्या तो इचलकरंजी येथे एका खासगी शिक्षण संस्थेत शिक्षक म्हणून सेवेत होता.प्रशांत हा शनिवारी आपल्या आई समवेत दुचाकीवरून मूळगावी हंचीनाळ,केएस येथे चुलतेच्या घरी आला होता.

दरम्यान त्याने आपले चुलते बाळासाहेब गायकवाड यांच्या जनावरांच्या गोठ्यात गळफास घेतल्याचे दिसून आले. घटनास्थळी उपनिरीक्षक शिवराज नायकवडी यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.याबाबत मयत प्रशांत यांचा भाऊ प्रवीण गायकवाड यांनी याबाबत फिर्याद दिली आहे.

# सत्ताकाळात शहाणपण का सुचले नाही? - डॉ. सुरेश भोसले

**▪ सहकार पॅनलच्या प्रचाराचा शुभारंभ :**
**▪ एफआरपीपेक्षा अधिक दर देणार**

**कराड,ता.३१(प्रतिनिधी) –**

**निवडणुकीच्या तोंडावर पाणीपट्टी आणि शेतकरी हिताच्या मुद्द्यांवर विरोधकांकडून मोठमोठ्या घोषणा केल्या जात आहेत. मात्र सत्तेत असताना पाणीपट्टी कमी करण्याचे शहाणपण त्यांना का सुचले नाही, असा सवाल कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन डॉ. सुरेश भोसले यांनी उपस्थित केला.राज्यातील अनेक सहकारी साखर कारखाने अडचणीत असतानाही कृष्णा कारखाना यंदाही एफआरपीपेक्षा अधिक दर देईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.**

यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वडगाव हवेली (ता. कराड) येथे सहकारमहर्षी जयवंतराव भोसले सहकार पॅनलच्या प्रचाराचा शुभारंभ झाला. अध्यक्षस्थानी माजी सरपंच सत्यवान जगताप होते.



डॉ.भोसले म्हणाले,अडचणीत असलेला कारखाना ताब्यात घेतल्यानंतर अवघ्या सहा वर्षांत तो आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यात यश आले. त्यानंतरच्या काळात विस्तारीकरणामुळे ऊस वेळेत गाळपासाठी नेणे शक्य झाले असून आता १५ लाख टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.आज कारखान्यातून एक लाख लिटर उत्पादन होत आहे.

साखरेच्या मूळ उत्पन्नात वाढ करण्यातही ते अपयशी ठरले. ऑडिटरने पाच वर्षे कारभारावर पांघरूण घातल्याने कारखान्याची स्थिती बिकट झाली होती. सभासद सुज्ञ आहेत आणि योग्य निर्णय घेतील. सहकार क्षेत्र अडचणीत असताना राजकारण बाजूला ठेवून विश्वजीत कदम, पृथ्वीराज चव्हाण, जयंत पाटील आणि उदयसिंह पाटील यांनी सहकार्याची भूमिका घेतली.

शासनाच्या विविध योजनांतून निधी उपलब्ध करून देण्यासाठी आ.अतुल भोसले प्रयत्नशील आहेत.

कराड दक्षिण मतदारसंघात पाणंद रस्त्यांसाठी ४५ कोटी रुपयांचा निधी आणण्यात आला असून त्याचा शेतकऱ्यांना मोठा लाभ होत आहे.

आ.डॉ.अतुल भोसले यांनी, बोगस कर्जवाटपामुळे कारखाना अडचणीत आला होता.

मात्र डॉ.सुरेश भोसले यांच्या नेतृत्वाखाली कारखान्याला नवी दिशा मिळाली. शेतकऱ्यांना उच्चांकी दर देण्यात आला, विस्तारीकरण करण्यात आले आणि गेल्या अकरा वर्षांत ७८ कोटी रुपयांची ६० किलो साखर घरपोच देण्यात आली. विरोधकांच्या काळात उसाला टनामागे ३०० रुपये कमी दर देण्यात आला होता, असा आरोप केला.

व्हा. चेअरमन जयवंत जगताप यांनी, आज कार्यक्षेत्रातील शेतकरी एकरी १०० ते १२० टन ऊस उत्पादन घेत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाच्या साहाय्याने हेच उत्पादन १५० ते २०० टनांपर्यंत नेण्याचे स्वप्न डॉ. सुरेश भोसले यांनी पाहिले असल्याचे सांगितले. प्रास्ताविक अशोकराव जगताप यांनी केले.

यावेळी कारखान्याचे माजी चेअरमन मदनराव मोहिते, प्रा. धनाजी काटकर, दयानंद पाटील, मनोहर शिंदे, तेजस सोनवणे यांच्यासह सहकार पॅनलचे सर्व उमेदवार, कारखाना कार्यक्षेत्रातील शेतकरी सभासद, विविध संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# गर्दीचा फायदा घेत मंगळसूत्र चोरी करणारी महिला अटकेत

## दोन चोरींचा उलगडा; २८ ग्रॅम दागिने जप्त

**कोल्हापूर, ता. ३१ (प्रतिनिधी)**

**मध्यवर्ती बसस्थानक परिसरात एसटी बसमध्ये चढणाऱ्या महिला प्रवाशांना लक्ष्य करून त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्रे लंपास करणाऱ्या सराईत महिलेला स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने अटक केली. सविता गोविंद अवताडे (वय ४०, सध्या रा. सिंहगड रोड, पुणे, मूळ रा. आष्टा कासार,( धाराशिव) असे तिचे नाव असून, तिच्याकडून चोरीतील २८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत.**

मध्यवर्ती बसस्थानकातून आदमापूरकडे जाणाऱ्या एसटी बसमध्ये चढताना गर्दीचा फायदा घेत दोन महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्रांची चोरी झाली होती. विद्युलता धनंजय जाधव (रा. ईश्वरपूर, जि. सांगली) आणि छाया श्रीपती मलप (रा. कदमवाडी, कोल्हापूर) यांनी याबाबत शाहूपुरी पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती. या दोन्ही घटना २४ मे रोजी नोंदविण्यात आल्या होत्या.

गुन्ह्याचा तपास सुरू असताना स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने बसस्थानक परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची छाननी केली. त्यातून संशयित महिलेची ओळख पटली. पुढील तांत्रिक व गोपनीय तपासातून ती पुण्यातील सिंहगड रोड परिसरात वास्तव्यास असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिस उपनिरीक्षक जालिंदर जाधव यांच्या पथकाने पुण्यात जाऊन कारवाई करत तिला ताब्यात घेतले.

चौकशीदरम्यान अवताडे हिने दोन्ही चोरीच्या घटनांमध्ये सहभाग असल्याची कबुली दिली. तिच्याकडून चोरीतील २८ ग्रॅम वजनाचे दागिने हस्तगत करण्यात आले असून पुढील तपासासाठी तिला शाहूपुरी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# ट्रकची पाच कारसह ट्रकला धडक

## लाखोंचे नुकसान

**निपाणी,ता.३१(प्रतिनिधी)**

**पुणे–बंगळुर राष्ट्रीय महामार्गावर तवंदी घाट उतारावर हॉटेल अमरनजीक भरधाव ट्रकची पाच कारसह एका ट्रकला मागुन धडक बसल्याने लाखोंचे नुकसान झाले.हा अपघात शनिवारी रात्री घडला.घटनेची नोंद शहर पोलीसात झाली आहे**

ट्रकचालक राजेश एमके (वय ३८) रा केरळ हा बंगळूर येथून मुंबईच्या दिशेने जात होता.त्याचे वाहन तवंदी घाट उतारावरील हॉटेल अमरनजीक आले असता वाहनावरील चालक राजेश याचा ताबा सुटल्याने पुढे निघालेल्या पाच कारना या ट्रकने धडक दिल्याने सुमारे लाखो रुपयांचे नुकसान झाले.यामध्ये कोल्हापूर येथील किशोर फुलचंद पाटील (वय ५१) रा इंगळेनगर, कोल्हापूर त्यांच्या कारचेही मोठे नुकसान झाले.

शिवाय त्यांच्या कुटुंबातील एकाला गंभीर दुखापत झाली.याबाबत किशोर पाटील यांनी ट्रक चालक याच्याविरोधात शहर पोलिसात फिर्याद दिली.

# आईस्क्रीम विक्रेता जखमी

**कोल्हापूर ,ता.३१(प्रतिनिधी)**

**सायकलवरून बांबवडे येथे आईस्क्रीम विक्रिसाठी जात असताना आडवे कुत्रे आल्याने घसरून पडल्याने युवक जखमी झाला.** रविवारी सकाळी ११.३० वाजता हा प्रकार घडला. सुरज शंभू गौतम (वय २१ रा. वारणा कोडोली, ता. पन्हाळा ) असे जखमीचे नाव आहे. सीपीआर पोलीस चौकीत याची नोंद झाली आहे.

# शेती पाणीपुरवठा संस्थांच्या प्रश्नांवर निर्णय घ्या अन्यथा आंदोलन

## आम.अरुण लाड

**पलूस,ता.३१ (प्रतिनिधी)–**

**क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर सांगली जिल्हा सहकारी पाणी पुरवठा सहकारी संघ यांच्या वतीने महाराष्ट्रातील सर्व शेती पाणीपुरवठा संस्था व इरिगेशन फेडरेशनच्या पदाधिकाऱ्यांची बैठक फेडरेशनचे अध्यक्ष आमदार अरुण लाड यांच्या अध्यक्षतेखाली झाली.**

बैठकीस उपाध्यक्ष डॉ. भारत पाटणकर, आर.जी. तांबे, कोल्हापूर जिल्हा इरिगेशन फेडरेशनचे अध्यक्ष विक्रम पाटील–किणीकर, कोल्हापूर बाजार समितीचे माजी सभापती भारत पाटील–भुयेकर, राजारामबापू साखर कारखाना इरिगेशन विभागाचे अध्यक्ष प्रदीप पाटील, सह्याद्री साखर कारखान्याचे संचालक संभाजीराव साळवे यांच्यासह विविध जिल्ह्यांतील पाणीपुरवठा संस्थांचे पदाधिकारी, कर्मचारी तसेच शेतकरी उपस्थित होते. बैठकीदरम्यान शेतीसाठीच्या पाणीपुरवठ्याशी संबंधित विविध समस्या व अडचणींवर चर्चा झाली. जल नियमन प्राधिकरणाने विभागीय स्तरावर शेतकऱ्यांचे मेळावे व सुनावण्या घ्याव्यात, जोपर्यंत विभागीय सुनावण्या होत नाहीत तोपर्यंत सन २०२६ ते २०२९ या कालावधीतील जलदर निश्चित करू नयेत, अशी मागणी करण्यात आली. यावेळी मुळात जलमीटर पद्धतीला विरोध दर्शवत क्षेत्राधारित पाणीपट्टीची आकारणी पूर्वीप्रमाणेच करण्यात यावी, अन्यथा पाणीपट्टी भरणार नसल्याचा इशारा देण्यात आला.

महावितरणकडून सध्या लागू असलेले वीजदर सहकारी पाणीपुरवठा संस्थांसाठी पुढील तीन वर्षे कायम ठेवावेत व कोणतीही दरवाढ मान्य केली जाणार नसल्याची भूमिका बैठकीत मांडण्यात आली. शासनाने साडेसात हॉर्स पॉवर (एच.पी.) पर्यंतच्या कृषी वीजबिल माफीच्या धर्तीवर सहकारी पाणीपुरवठा संस्था व व्यक्तिगत पाणीउपसा करणाऱ्या शेतकऱ्यांचे वीजबिल माफ करावे, अशी मागणीही करण्यात आली. शक्तिपीठ महामार्गामुळे बाधित होणारे असंख्य शेतकरी व अत्यंत कष्टातून उभारलेल्या पाणीपुरवठा संस्था जमीनदोस्त होण्याचा धोका असल्याने हा महामार्ग रद्द करावा, जबरदस्तीने शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या जाणार नाहीत, अशी ठाम भूमिका व्यक्त करण्यात आली.

# हातास कोयता लागून जखमी

**कोल्हापूर, ता.३१(प्रतिनिधी)**

**कोयत्याने झाडाच्या फांद्या छाटत असताना कोयता हातावर लागल्याने वृध्द जखमी झाला.**

कृष्णा हरिषचंद्र बिरुधनगर (वय ६६, रा. मुरुडवाडा रत्नागिरी) असे जखमीचे नाव आहे. रविवारी सकाळी ८.३० वाजण्याच्या सुमारास हा प्रकार घडला. जखमीला उपचारासाठी सीपीआर रुग्णालयात दाखल केले आहे. सीपीआर पोलीस चौकीत याची नोंद झाली आहे.

# मराठा समाजाला न्याय देण्यासाठी सरकार प्रयत्नशील :नाम. सावंत

**कोल्हापूर, ता. ३१ (प्रतिनिधी)**

**मराठा समाजाच्या आरक्षण प्रश्नावर सरकार सकारात्मक असून मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलन मागे घेतल्याबद्दल त्यांचे आभार मानतो. मराठा समाजाला न्याय देण्याची महायुती सरकारची भूमिका कायम असून ओबीसी समाजाच्या आरक्षणालाही कोणताही धक्का लागणार नाही, असे स्पष्ट करतानाच आगामी गोकुळ निवडणूक आणि कोल्हापूरच्या राजकीय समीकरणांबाबत भाष्य करण्यास उद्योगमंत्री उदय सामंत यांनी सावध भूमिका घेतली.**

पत्रकार परिषदेत बोलताना सामंत म्हणाले, मनोज जरांगे पाटील यांनी सरकारच्या शिष्टमंडळाशी चर्चा करून आंदोलन मागे घेतले, ही स्वागतार्ह बाब आहे.

भाजप नेते प्रसाद लाड यांच्या भेटीनंतर जरांगे पाटील आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात दोन वेळा चर्चा झाली होती. शिंदे यांनी त्यांना रणरणत्या उन्हात उपोषण करू नये, असे आवाहन करत सरकार सकारात्मक निर्णय घेईल, अशी भूमिका मांडली होती.

मराठा समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे प्रयत्नशील आहेत. विखे पाटील यांनी दिलेले आश्वासन जरांगे पाटील यांनी मान्य केले असून सरकारला ५ जुलैपर्यंतची मुदत दिली आहे. या कालावधीत आवश्यक अभ्यास करून निर्णय घेतला जाईल.

ओबीसी आरक्षणाच्या प्रश्नावर बोलताना ते म्हणाले, लक्ष्मण हाके यांना त्यांची भूमिका मांडण्याचा अधिकार आहे. मात्र ओबीसी समाजाच्या आरक्षणात कोणतीही कपात होणार नाही.

लक्ष्मण हाके यांचीही मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांसोबत बैठक आयोजित करण्याचा प्रयत्न केला जाईल.

गोकुळ निवडणूक आणि कोल्हापूरमधील राजकीय घडामोडींविषयी विचारले असता सामंत यांनी थेट भाष्य टाळले. ''कोल्हापूरच्या राजकारणाचा मला अजून अभ्यास करावा लागेल. आमचं ठरलंय आणि आपलं ठरलंय यातील फरक मला समजलेला नाही.

हा फरक दहा–पंधरा वेळा कोल्हापुरात आल्यावर समजेल. त्यानंतरच यावर बोलता येईल,'' असे ते म्हणाले. त्यांच्या या विधानामुळे गोकुळ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उपस्थितांमध्ये चांगलीच चर्चा रंगली.

## इयत्ता 10 वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन

RISING FOR WISDOM
VYANKATESHWARA ENGLISH SCHOOL

# व्यंकटेश्वरा इंग्लिश स्कूल अँण्ड ज्युनिअर कॉलेज, कबनूर-इचलकरंजी.

**३८ वर्षापासून इंग्रजी माध्यमातून गुणवत्तापूर्वक व दर्जेदार शिक्षण. २७ वर्षे १००% निकालाची अखंड समृद्ध परंपरा**



कु. स्वरांजली निखील पडते
99.00%



कु. उन्नती अमित हेडा
98.20%



कु. उज्वल अमित हेडा
98.00%

**मार्च 2026 S.S.C. परीक्षेत शाळेचा निकाल 100 %**

एकूण परीक्षार्थी 92

90% हून अधिक 27 विद्यार्थी (95% हून अधिक 08 विद्यार्थी)

* विशेष गुणवत्ता 63 विद्यार्थी * प्रथम श्रेणी - 23 विद्यार्थी * द्वितीय श्रेणी-06 विद्यार्थी



कु. भक्ती विशाल मोरे (97.00 %)



कु. योगेश्वरी दीपक शर्मा (96.80%)



कु. विवांता दीपक रेपे (96.60%)



कु. सौख्या सचिन शिंदे (96.20%)



कु. निश्रा ललितकुमार तातेड (95.60%)



कु. रीत पवन जाजू (94.80%)



कु. स्वयम संग्राम नरंदेकर (94.80%)



कु. वर्धन प्रसाद खुटाळे (94.60%)



कु. प्रतिग्या सचिन गागडे (94.40%)



कु. माधव अनिल व्यास (94.40%)



कु. ओम सचिन अडावकर (93.80%)



कु. अवनी किरण सुतार (93.40%)



कु. काव्या सुशील दायमा (93.00%)



कु. गौरव नरेंद्र कुमार (92.80%)



कु. निष्ठा मनोजकुमार इनानी (92.40%)



कु. अनन्या मयूर सावंत (92.20%)



कु. रक्षिता सचिन पाटील (92.00%)



कु. आस्था राजेंद्रकुमार बोथरा (91.40%)



कु. राजदीप राजेश दायमा (91.40%)



कु. शरण्या सुरेश कांबळे (91.20%)



कु. रुद्रकुमार कृष्णगोपाल राठी (91.20%)



कु. ईशा नंदकुमार माने (90.60%)



कु. सुमेशा शितल कागवाडे (90.60%)



कु. दिशा अशोककुमार डागा (90.40%)

**हार्दिक अभिनंदन..!**

गणित (मॅथ्स) विषयामध्ये 100 पैकी 100 गुण मिळवून राज्यात प्रथम आलेली विद्यार्थिनी



कु. स्वरांजली निखिल पडते

## * इचलकरंजी व परिसरातील पालकांची प्रथम पसंतीची शाळा *

• प्रदीर्घ अनुभवी उच्च शिक्षित व प्रशिक्षित अध्यापक वर्ग. • तीन वर्ष INTEGRATED PROGRAM • अत्याधुनिक कॉम्प्युटर लॅब व सायन्स लॅब • रोबोटिक्स प्रशिक्षणाची सुविधा • IIT, NEET, C.A, CS ऑलिम्पियाडसारख्या परीक्षांसाठी विद्यार्थी-विद्यार्थिनी मध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी CBSE आणि NCERT अभ्यासक्रमाच्या माध्यमातून तज्ञ शिक्षकांकडून विशेष मार्गदर्शन. • अनेक विद्यार्थी दहावी बोर्ड, शिष्यवृत्ती HTS, NTS, MTS, शासकीय चित्रकला अशा परीक्षांमध्ये गुणवत्ता यादीत. • संगीत, नृत्य, योगासने, मेडिटेशन, एरोबिक्स विविध स्पर्धा व इतर अनेक उपक्रम तसेच सर्व क्रीडा प्रकारांतून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास. • असंख्य माजी विद्यार्थी देश विदेशात विविध क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत तसेच उद्योजक व व्यावसायिक.

## * ट्रस्टीज *

**दीपक राठी** चेअरमन | **राम मुंदडा** व्हा. चेअरमन | **श्रीकिसन भुतडा** कॉलेज कमिटी चेअरमन | **कमलेश राठी** सेक्रेटरी | **महेशकुमार भुतडा** ट्रेझरर | **राजेश लोया** जॉ. सेक्रेटरी

•भीमकरण छापरवाल, • बुध्दराज सोनी, • रामेश्वरलाल राठी,
• श्यामसुंदर मर्दा, • सत्यनारायण नवाल, • डॉ. लक्ष्मीकांत तोसनीवाल,
• श्यामसुंदर बिर्ला, • अशोककुमार नवाल, • उमेशचंद हेडा,
• नौरतमल लढ्ढा, • दीनदयाल झंवर, • दिनेश लोया, • अमित सोनी

ॲडमिनिस्ट्रेटर - • संजय देशपांडे , मुख्याध्यापिका - • सौ स्मिता बेडक्याळे
चिफ कोऑर्डिनेटर्स - • सुभाष मगदूम, • कृष्णा हुपरे
कोऑर्डिनेटर्स - • सौ. रूपाली नवाळे, • सौ. विजया पाटील,
• सौ. अनुजा कुलकर्णी, • सौ. गौसिया नवाब, • सौ पूनम तोतला

सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी, व्यंकटेश्वरा इंग्लिश स्कूल

**इयत्ता ११ वी प्रवेश सुरू-सायन्स व कॉमर्स (इंग्रजी माध्यम)**